

# बयरी

संजय येरणे



# बयरी

लेखक

संजय वि.येरणे

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com



# बयरी

लेखक : संजय येरणे

नागभीड, जि. चंद्रपूर

9404121098

sanjayyerne100@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा  त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य किंवा चित्रपट रुपांतर करण्यापुर्वी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक :-- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन :- ३१ ऑक्टोबर २०१७

©esahity Pratishthan®2017

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता

हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

# मनोगत :

‘बयरी’ ही माझी दुसरी कादंबरी होय. यापुर्वी ‘संताजी जगनाडे एक योद्धा’ ही कादंबरी महाराष्ट्रभर गाजली. त्याला कारणही तसंच होतं. कारण सदर संत तेली जातीतील असून या संतावर आजतागायत कुणीही कादंबरी लिहीली नव्हती किंवा दहा वीस पानांच्या पलीकडे त्यांचं चरित्र उपलब्ध नव्हतं. मात्र मी यावर सारासार विचार करून जगातील संताजीवर पहिली कादंबरी साकार केली. साहित्यमूल्याच्या अनुषंगाने ती उत्तम व दर्जेदार झाली नि वाचकांनी तिला डोक्यावर घेतले. परंतु बयरी ही कांदबरी माझी लेखनात्मकदृष्ट्या पहिली कादंबरी होय. ती आता इ साहित्याच्या रूपाने आपणासमोर येत आहे.

यापुर्वीही अनेक प्रकारचे लेखन करीत आजतायगत माझे चौदा पुस्तके प्रकाशित झाले आहेत. यात चारोळी, बालकथा, समीक्षा, कविता, वैचारिक ग्रंथ, कादंबरी व कथा असे अनेक प्रकारचे लेखन समाविष्ठ आहे. यातून माझ्या डफरं या कथासंग्रहाला चार संस्थात्मक राज्यपुरस्कारही लाभले. दोन्ही समीक्षा ग्रंथाला राज्यपुरस्कार मिळाले. तर वैचारिक ग्रंथ इतरही पुस्तकाला रसिकांनी दाद दिली आहे.

बयरी हे कथानक काल्पनिक, मनोरंजनात्मक असले तरी ही कथा ग्रामीण जीवनातील वास्तव व करूणामयी विचाराला जपणारी आहे. यात प्रसंग हे नाविण्यपूर्ण असून काही प्रसंग हे प्रयोगात्मक साकार केले आहेत. आमची झाडीबोली यातील बरेचसे संवाद यात डोकावतात. यामुळे या कादंबरीला प्रादेशिकतेचा दर्प आलेला आहे. ही साहित्याप्रांतात रसिकांना आवडेल अशीच कथा आहे. जन्माला आल्यानंतर काही वळणावर माणसांना अलगद प्रेरणा मिळते. मार्गात आलेले अनेक अडसर तो जिद्दीच्या जोरावर पूर्ण करतो तर कधी त्या प्रवासात अंहकारत्वाचा दर्प उगाळतांना दिसतो. मात्र

काही माणसे अनुभवाच्या शिदोरीतून हे सारं जीवन समजून घेत एक माणूसपण सांगतात नव्हे तर जपतात. असंच माणूसपण रूजवणारी ही संदर्भकथा करूणामयी होत आपल्या मनाच्या कोपऱ्यात दडून बसेल याचा विश्वास वाटतो आहे.

ही कादंबरी पुस्तक रूपाने येण्यापूर्वीच इ साहित्याच्या रूपाने दाखल होत आहे. या करीता इ साहित्य टिमचे आभार मानन‌ं माझं कर्तव्य आहे. त्यांचा मी सदैव ऋणी असेन.

**संजय वि. येरणे**

नागभीड, जि. चंद्रपूर

मो. 9404121098

# संजय येरणे यांचा परिचय :



**नाव :** संजय विस्तारी येरणे.
**पत्ता :** 'येणू भिकाजी' सदन, वार्ड नं. 6, शिवाजी चौक, मु. पो. तह. नागभीड.
जि. चंद्रपूर. पिन 441205]
संपर्क - 9404121098-
**शिक्षण :** एम. ए. (मराठी, समाज, डॉ. आंबेडकर थॉटस्)
डी. एड, डी. एस. एम.
**जन्म :** 19 नोव्हेंबर 1976
**व्यवसाय :** प्राथमिक शिक्षक, नागभीड. जि. चंद्रपूर
**प्रकाशित साहित्य :**
1) चारोळी : 'काटेरी निवडुंग' भरारी प्रकाशन, नागभीड. 2008
2) कथासंग्रह : 'डफरं' मायबोली प्रकाशन, मुंबई, 2014
3) वैचारिक ग्रंथ : 'सूडाचा प्रवास' भरारी प्रकाशन, नागभीड. 2014
4) कवितासंग्रह : 'जागल' भरारी प्रकाशन, नागभीड. 2011
5) बालकथासंग्रह : 'एक आहे अनिकेत' (मराठी व इंग्रजी आवृत्ती) भरारी प्रकाशन, नागभीड. 2012
6) समीक्षाग्रंथ : 'ना. गो. थुटे यांच्या चारोळी कवितेची समीक्षा' श्रेयस प्रकाशन, हिंगणघाट, 2014
7) समीक्षाग्रंथ : 'काव्यफुलांचे अंतरंग' डॉ. राजन जयस्वाल यांची कविता, भरारी प्रकाशन, नागभीड. 2014
8) शैक्षणिक : 'संजय येरणे इंग्लिश पॅटर्न' भरारी प्रकाशन, नागभीड. 2016
9) काव्यसंपादन : 1. अंगार 2. उधान 3. आरसा.
भरारी प्रकाशन, नागभीड.

9) कादंबरी : संताजी जगनाडे एक योद्धा, भरारी प्रकाशन, नागभीड २०१६
9) संपादन : घाण्याचे अभंग, पुस्तिका भरारी प्रकाशन, २०१६
१०) कादंबरी : 'यमुना' संताजी जगनाडे महाराजांची सावली प्रकाशन २०१७
११) समिक्षाग्रंथ : 'मधुघट' मधुकर गराटे यांच्या कवितेचा अभ्यास प्रकाशन २०१७

**साहित्यविशेष :**

1) लेखक, कथाकार, कादंबरीकार, कवी, संपादक, प्रकाशक, वक्ता म्हणून परिचित.

2) अनेक वाङ्.मयीन नियतकालिकांतून, वृत्तपत्रातून लेख, कथा, कविता प्रसिद्ध.

3) संस्थापक-अध्यक्ष : भरारी साहित्य शिक्षण कला सेवा संस्था. ज. तु. सा. प. द्वारा साहित्य कार्य, समाजसेवा, बहुजन चळवळीचे कार्य, साहित्यसंमेलन आयोजन, कवीसंमेलन आयोजन, नवोदितांना साहित्य मार्गदर्शन, शैक्षणिक चळवळ व संघटनात्मक कार्य, अनेक संस्था व संघटनांचा पदाधिकारी. अनेक संमेलनात कविता वाचन तथा कथा सादरीकरण. शैक्षणिक मार्गदर्शन.

**पुरस्कार :**

शिक्षण गौरव सन्मान, विदर्भ युवा गौरव सन्मान, कर्मवीर भाऊराव पाटील सन्मान, अंतरंग सन्मान, म. फुले राज्यस्तरीय शिक्षक सन्मान, बौद्धसमाज पंचकमेटी सन्मान, सर्वज्ञ साहित्यरत्न पुरस्कार तथा विविध साहित्यिक, शैक्षणिक, सामाजिक संस्थाकडून सन्मानित. तेली समाज नवखळा, नागभीड, ब्रम्हपुरी, तळोधी, भिसी, नेरी कडून समाजभूषण सन्मान.

**विशेष पुरस्कार :**

1) 'डफरं' या कथासंग्रहास स्व. वसंतराव दांदळे स्मृती राज्यस्तरीय मराठी वाङ्.मय पुरस्कार 2015 डॉ. विठ्ठल वाघ यांचे हस्ते साद बहुद्देशीय संस्था, अकोला द्वारा दि. 20 डिसेंबर 2015. ला प्राप्त.

2) 'डफरं' कथासंग्रह व 'सूडाचा प्रवास' वैचारिक ग्रंथास राज्यपुरस्कार अंकुर साहित्य संघ, महाराष्ट्र द्वारा 55 वे अखिल भारतीय अंकुर मराठी साहित्य संमेलन अकोला येथे डॉ. फुला बागूल संमेलनाध्यक्ष यांचे हस्ते प्राप्त. दि. 28 ऑगष्ट 2016-

3) 'ना. गो. थुटे यांच्या चारोळी कवितेची समीक्षा' या समीक्षाग्रंथास तिसरे राज्यस्तरीय रसिकराज मराठी साहित्य संमेलन नागपूर. श्री विश्वास पाटील संमेलनाध्यक्ष यांचे हस्ते पुरस्कार प्राप्त. दि. 20 मार्च 2016-

4) कथास्पर्धेत प्रथम पुरस्कार अंकुर साहित्य संघ गडचिरोली द्वारा दि. 12 मार्च 2016-

5) जिल्हास्तरीय काव्यस्पर्धा पुरस्कार 2014 नक्षत्राचं देणं काव्यमंच पुणे, जिल्हा शाखा चंद्रपूर द्वारा दि.23 ऑगष्ट 2014.

6) राजेश्वरजी बोढे स्मृती साहित्य साधना पुरस्कार, राष्ट्रसंत विचार साहित्य परिषद केंद्रीय समिती चंद्रपूर द्वारा कढोली, पिंपळगाव येथे प्रदान. 10 जानेवारी 2016.

7) विदर्भ तेली समाज महासंघ शाखा नवखळा, येथे दि. 8 डिसेंबर २०१६ ला 'संताजी जगनाडे एक योद्धा' या कादंबरीचे प्रकाशन तथा शाखा नवखळा वतीने समाजभूषण पुरस्कार देवून गौरविण्यात आले. डॉ. क्रिष्णा देव्हारे सर यांचे वतीने.

8) दि. ११ डिसेंबर २०१६ ला विदर्भ तेली समाज महासंघ शाखा नागभीड द्वारा तेली समाजभूषण पुरस्कार देवून गौरविण्यात आले. प्रा. रमेश पिसे यांचे हस्ते.

तथा येरडेंल तेली समाज ब्रम्हपुरी वतीने दि.१8 डिसेंबर २०१६ ला पुष्पगुच्छ द्वारा अभिनंदन व दि. २५ डिसेंबर ला विदर्भ तेली समाज शाखा ब्रम्हपुरी द्वारा अभिनंदन करण्यात आले. तसेच निवाडा साप्ताहिक द्वारा अतिथी संपादक म्हणून प्रशस्तीपत्र तसेच तळोधी (बा). ब्रम्हपूरी, भिसी, नेरी येथेही समाजसन्मान.

9) वस्ताद लहूजी साळवे ट्रस्ट गुंधा. जि. बुलढाणा द्वारा 'डफरं' या कथासंग्रहास राज्यपुरस्कार दि. २७ नोव्हेंबर २०१६

१०) दुसरे अभंग साहित्य संमेलन राजुरा द्वारा प्रशस्तीपत्र दि. १८ डिसेंबर १६.

११) द. सा. बोरकर स्मृती साहित्य पुरस्कार 'काव्यफुलाचे अंतरंग' या समीक्षाग्रंथास २४ वे झाडीबोली साहित्यसंमेलन राका पळसगाव जि. गोंदिया येथे.

१२) ७ वे ग्रामीण मराठी साहित्य व लोककला संमेलन सावरला येथे दि. १ एप्रिल २०१७ ला मराठी वाड्.मय पुरस्कार 'संताजी जगनाडे एक योद्धा' या कांदबरीस.

११) मनापासून मनापर्यंत या कथास्पर्धेत राज्यस्तरीय पुरस्कार सेवाव्रती या कथेस डफरं कथासंग्रहात समावेशित कविता. दि. २८ मार्च २०१७.



जीवनाचं माळरान फुलविण्यास आपुलकीची जिव्हाळयाची साथ मिळावी पण सारं व्यर्थ ठरतं, मन उदास होत जातं,

तरीपण असच जगावं

जीवनाशी झुंज देत,

बयरीसारखं........

# बयरी





# १

**'आयुष्य** पहावं जगुनी' पण आयुष्य जगतांना खडतर पायवाटा मनाच्या अंतरंगात सदाच बोचत राहाव्यात. जगतांना मरण्यासाठी आणि मरतांना जगण्यासाठी व्दिधास्थितीत अभिलाषा कोण बाळगणार नाही? अशाच संबंधातून एक जीवनातील साफल्य उदयास येतं.

काही नातेसंबंध असेच असतात. ज्यांना नाव की गावही नाही. ना कुणाचा आधार की ना कुणाचा सहवास. त्या संबंधाची आठवण सदैव मनात रेंगाळत राहावी असच घडतं. जे काही झालं ते एक सत्य होतं की आभास?

कडक उन्हाळ्याची आग अस्ताला जात होती. पावसाच्या नक्षत्राचं आगमन होणार होतं. सगळीकडे शेतकऱ्यांचा कलकलाट ऐकू येवू लागला. शेतीचे काम सुरू होणार म्हणून कामाला लागलेलं. नांगर, वखर, खुरप्या लोहाराकडं नेवून पाणी देवू लागले. आभाळाचं रंग काळ्या पांढऱ्या छटांनी बुजून यायला लागले. सगळ्यांचे डोळे आभाळाकडे होते. अचानक दोन तीन दिवसातच पावसाच्या हलक्या सरीचं आगमन झालं. मातीचा गंध दरवळू लागला. सर्वत्र जमीन शेणामातीनं सारवल्यागत वाटू लागली. वरूण आगमनाने शेतकरी आपआपल्या कामाला लागले होते.

झाडांवर हिरवीकंच पालवी फुटली. पक्षांचा चिवचिवाट ऐकण्यास गोड वाटू लागला. पाखरांनी आपली घरटी पावसाची चाहूल लागताच झाडाला टांगून सजवून घेतली

होती. शेतकरीही आपली घरे गवतानं, पडारानं सजवू लागले होते.उन्हाळयाच्या दिवसात झालेली अंगाची लाही आता थंड व्हायला लागली होती. पोटाची खळगी भरण्यासाठी पुढच्या प्रपंच्याची ही सुरवात होती. लहान मुलं शाळेत जावू लागली. शाळेच्या सुट्ट्या संपल्यात. गावातील दोन चार मुलं तालुक्याला शिकायची. गाव तसं खेड, पण अशिक्षितपणा जास्त प्रमाणात होता. गावात चौथी पर्यंत शाळा होती. दोन मास्तर तिथचं खोली करून राहात असत. शाळेत मुलंही फार कमी होती. इतक्या वर्षात गावात एकही मुलगा गुणवान झालाच नाही याची मात्र खंत वाटत होती. थोडंफार शिकलं की झालं, जीवनाचा खेळ बघा असाच असतो. पोटाची खळगी भरण्यासाठी काय नाही करावं लागत आणि खूप शिकून फायदा काय? शून्य.... अशीच समजूत असायची.

गावातील पडवीवजा गवतांनी बांधलेल्या घराशिवाय दोनचार दगडविटांची कौलारू घर मोजकीच दिसायची. गावाचं नाव तसं साजेसं ‘आबादी’ आबादीचा विकास मात्र कधी झालाच नाही. आबादी पासून तालुक्याला जाणारा मुख्य रस्ता दोन मैलावर होता. तिथपावेतो पायदळ गेलं की तालुक्याला जायला गाडी मिळायची. आबादीत सर्व जाती धर्माचे लोक राहायचे. सर्व आपआपल्या परीने सुखी होते.

आबादीत पन्नासच्या जवळपास घरे असावीत. जवळूनच नदी वाहायची. जुनं गाव नदीच्या पलीकडे वसलेलं असतांना दुथडी भरून वाहणाऱ्या नदीने गावाची नासधूस झाली होती. हळूहळू जुनं गाव ओसांडून वरचढ भागाला आबादी वसली. आता ह्यांना पुराचा धोका नव्हता की समस्याही नव्हती.

आबादीत सकाळच्या रवीकिरणापूर्वीच इथल्या बायाबापड्यांना जाग यायची. सर्व सकाळी घरची कामे आटोपून शेतीकडे निघायचे. प्रत्येकांच्या घरी गायीम्हशी असल्याने गावातील दोनचार गुराखी गायीसारखा ‘गायी सोडा’ हंबरडा फोडत रानाच्या वाटेनं निघून जात.

आबादीच्या प्रमुखाला ‘आबा’ म्हणायचं. आबाच त्यागावचा सर्वकाही होता. सरपंच, न्यायदान करणारा, वा इतर समस्या सोडवणारा, काही अवघड वाटलं की,

प्रत्येक व्यक्ती आबाकडे धाव घ्यायचे. आबा तसा सर्वगुणी माणूस, आबाचा गावात दरारा होता. उंचधिप्पाड, दाढी, भरदार मिशा, जाड भुवया, कपाळाला लाल कुंकवाचा लांब टिळा लावून, हातात धोतराचा शेला पकडून, झपाझप पावले टाकणारा हा माणूस त्याचा शब्द जीव की प्राण होवून जायचा. दररोज रात्रो वट्ट्यावर बुजरूक मंडळी जमायची. ह्यात आबाही असायचा. सगळ्यांनी मिळून मिसळून माणसावानी वागावं. ह्याकरीताच तो धडपडत असे. आबाला एकच मुलगी होती. वंश चालवायला निशान सुद्धा उरलं नव्हतं. आबाला ह्या बाबीची आठवण झाल्यास एकटाच हिरमुसून रडत बसायचा. मागल्या जन्मात कोणतं ना कोणतं पाप केलं असावं. असचं त्यांना वाटायचं. आबाला मुलगाही झाला होता. दहा वर्षापूर्वी... आबाच्या बायकोनं ऑपरेशन केलं. गावातील पहिली स्त्री होती. ऑपरेशन करणारी. सगळं बरोबर चालू होतं. आबाचे वडील मरण पावले नि सर्व हक्क पाच सहा वर्षापासून त्यांच्याकडे आले होते. अचानक आबाला धक्का बसला. उन्हाळ्यात आंबे तोडतांना झाडाच्या शेंड्यावरणं खाली पडला. तालुक्याला दवाखाण्यात नेलं. पण काहीही उपयोग झाला नाही. आबाचा मुलगा त्यांच्यापासून कुठंतरी दूरवर गेला होता. आबानं धीर धरला. मुलीलाच सर्वकाही मानत असे. गावातील लहान मुलांवर त्यांची अपार माया. मुलाची आठवण झाली की शेजारच्या मुलांना बोलावून त्यांच्याशी खेळत बसायचा. आबा गावातील सर्वात श्रीमंत व्यक्ती. पण त्यांचे दुःख अपार होते. आबाच्या वडिलांचा स्वभाव मात्र तापट होता. पण आबा सर्वांमध्ये मिसळला. शांत स्वभावाचा माणूस, कुणीही त्यांच्यावर टीका केली नव्हतीच.

ooo



# २

**बनी** किती सुंदर नाव? नावाप्रमाणं तिचं वागणं बोलणं. गवताच्या मऊमऊ पात्याप्रमाणं, कोमल किरणाच्या तेजाप्रमाणं मनात ठसणारं सौंदर्य, खेड्यातील काबाडकष्टानं ढेकलाप्रमाणं झालं होतं. स्वतःच्या अस्तित्वाची पर्वा नसतांना दिवसभर राबराब राबून कावळ्याप्रमाणं काव-काव करणारं उदर भरण्याच्या नादातच मंगऱ्यासोबत ती जगत राहिली. बनीला प्रेमाची भूक की नशीबाचं सुखही मिळत नव्हतं. नवऱ्यासोबत मिरवून थोडसं अल्याडपल्याड हसणं... आणखी राबराब राबणं.

दारिद्र्यानं तिला माखलं होतं. थोडंफार मंगऱ्या कमवायचा तोही जुगार व बिडीत नष्ट करायचा. मंगऱ्या राबराब राबून यायचा. बनीसोबत लग्न झाल्यावर धट्टाकट्टा असलेला मंगऱ्या सगळा काडीप्रमाणं वाकासारखा दिसू लागला. बनीची कूस भरून पहावी या तळमळीनं जगतच राहिला. विडीचा नाद जडला. नाका तोंडातून सोडलेला धूर त्याचं सारं शरीर पोखरत होतं. त्याला कळलच नाही. गेल्या कित्येक दिवसापासून मंगऱ्या आजारी होता. दम, खोकला त्याची पाठ सोडत नव्हता. गावातील वैद्यानं थोडंफार इलाज करावं. डॉक्टरकडे जायला पैसे तरी कुठून येणार. बनी दिवसभर राबून मंगऱ्याचं पोट भरत राहिली. पण रोजच्या कामाची झालेली सवय तिला काहिही त्रासदायक ठरली नाही.

बयरी आज कामावरून आली. चटणीभाकर करून मंगऱ्याला दिलं. मंगऱ्याचा दम खूप वाढला होता. पेटित चारदोन पैसे असतील म्हणून बघू लागली. फक्त दिड रूपया मिळालं. पदराला गाठ पाडत तशीच वैद्याकडं गेली. वैद्य बनीसोबत आला. मंगऱ्या

खाटेवर तडफडतच निजला होता. वैद्यानं नाडी बघितली, दोनचार झाडांच्या पानाचा रस करून पाजलं. मंगऱ्याला शांत झोप आली. वैद्य निघून गेला होता. बनीने दोन घास जेवण केलं. अंथरूण टाकून झोपी गेली. मनात सारखे विचार येत होते. मंगऱ्या आता जास्तकाळ टिकणार नाही. तिला कळून चुकलं होतं. दहावर्षापासून तिची कूस भरली नव्हती. बनीनं त्याला समजावलं. दुसरी बायको करण्याचा आग्रह केला. पण मंगऱ्या ह्याला तयार नव्हता. मंगऱ्याचे शब्द नं शब्द तिला आठवत होते.

"दुसरी बायको करून तुला हाकलून देवू म्हणतेस."

"तसं नाय व्हय, पण आपल्याले मुलंबाळं होईल म्हणून..."

"बने, आपल्या नशीबातच देवानं लिहलं असल तसं व्हईलच, प्रत्येकाले का लवकरच पोर व्हतेत व्हयं."

बनी विचार करत राहायची. मंगऱ्याचं बोलणं, थोडसं मनात हसू यायचं. लग्न झालं तेव्हा मंगऱ्याचं प्रेम पाहून खूप खूश होती. पण आता सगळं लयास गेलं होतं. बनीला एकटीच जगावं लागणार. नकळत तिचं हात कपाळाच्या कुंकवाकडे गेलं. मनाची धकधक वाढली. काय काय वाईट विचार यायचे तिच्या मनात? डोळा लागला नव्हता. झोपेचं सोंग घेवून आणखी झोपली. हळूच एक हात पोटावरती सरकलं. स्वतःची कूस भरावी तिचं स्वप्न होतं. आणखी तेच आठवत होतं. सारंकाही मंगऱ्याचं जीवन, खोपडी समोर सकाळच्या रामप्रहरी विड्या ओढत असलेला मंगऱ्या...

"बने, आंग धुवायला पाणी गरम केलस कायं?"

"थोडसं काटंकोमट झालयं."

"मले का बकरा भाजायचा आहे व्हयं. मघापासून चार विड्या ओढलं.

त्या कंठ्या खात्याकडं जायचं होतं. म्हणे कामबीम भेटलं तं जावू बाहेरगावालं.
"

“मग जावा की, आल्यावर धुवाचं आंग.”

“ये बने, आंग धुतल्याबिगर कोणत्या कामाची सुरवात करतेत व्हयं. देव काय म्हणेल वं आपल्याले. कशीतरी दोन वेळची भाकर मिळते व्हयं.”

मंगऱ्या असं वाचाळ बोलत हसायचा, बनीनं आंघोळीला पाणी टाकलं होतं. आंघोळ झाल्यावर चार दोन घास खावून कामाच्या शोधात निघून जायचा. बनी मंगऱ्याकडं पाहात गालातल्या गालात हसायची. पुन्हा आपल्या कामास लागायची.

बनीला अजून जाग आली. सारखे मनात विचार येत होते. मंगऱ्याचा आवाज आला. आतापर्यंत शांत झोपलेला मंगऱ्या उठला होता. खोकला अजून यायला लागला.

“बने...ब...ने... पाणी देतेस व्हयं.”

बनी पटकन उठली. माठातलं थंडगार पाणी दिलं

“आराम वाटते व्हयं?”

“वाटते थोडसं...बने, आता मी काही जगू शकत नाय.”

बनीनं मंगऱ्याले आधार दिलं. खाटेवर झोपवलं. मंगऱ्या खों..खों करून झोपायचा प्रयत्न करू लागला. बनीही अंथरूणावर पडली. मंगऱ्याचा खोकला चालुच होता. रात्र वाढत चालली होती. बनीचा डोळा लागला. मंगऱ्याही झोपला. इकडचं-तिकडचं आठवून बनीही तशीच पडून राहिली. आकाशात चांदणे फुलून आले होते. पण आज चंद्र उगवला नव्हता. सगळीकडे काळाकुट्ट अंधार पडला होता. सगळं काही शांत-शांत होतं.

कुठून तरी खळबळल्याचा आवाज आला. बनी चटकन भानावर आली. सगळीकडे अंधारही अंधार... रात्रो पेटत असलेला दिवा विझला होता. बनी उठून बसली. मंगऱ्या शांत निजला होता. तिच्या डोळ्यावर धुरकट अंधार पसरला होता. बनीनं दिवा लावला. दिव्याच्या मंद प्रकाशात झोपडीत भांड्याकडं पाहू लागली. मांजरीनं

भांड्यांना धक्का लावला होता. इकडे-तिकडे नजर वळवून मंगऱ्याकडं पाहू लागली. दाराच्या फटीतून मांजर बाहेर गेल्याचं दिसलं. दिवा तसचं ठेवून अंथरूणावर पडली. उद्याच्या उषःकालाची वाट बघत.

बनीला आज खूप त्रास वाटायला लागला. रात्रभरात दोनतीनदा उठली होती. आता पहाटही लवकरच होणार. सकाळी उठून आणखी काम करावं लागणार, ह्याचं भान न ठेवता तशीच पडून होती. रात्रोचं काळाकिट्ट अंधार..कुठूनतरी कुत्र्यांच कोल्हेकुईप्रमाणे भुंकणं ऐकू येत होतं. सारं शिवार अगदी शांत शांत. अधूनमधून काजवे चमकत होती. क्षणाक्षणाने सकाळचा सूर्योदय जवळ येत होता. आणखी तिच पहाट बनीला पहावी लागणार, जणू रोजचच रडगाणं तिच्यामागे लागावं. क्षणभरही उद्याच्या सुखस्वप्नाची आशा मनात आली नाही. दारिद्र्याचं पांग कधीही न फिटणारं होतं. तिच्या कुसितल्या चंद्राचं आगमन जर होणार नव्हतं तर उद्याचा आधारस्तंभ... वंशाचा दिवा, मुळीच नव्हता. असचं रानडुकराप्रमाणे रानोरान भटकत दररोज पोटाची शिकार पाहात जगावं लागणार होतं. आज मंगऱ्या सोबतीला पण पुढं एकटच अर्धमेलं होवून जगावं. कोणत्याही स्वप्नाची आशा न करता. तिला गाढ झोप लागली. मंगऱ्याही रात्रभर उठलेल्या दमा खोकल्यानं बेजार होवून निद्रिस्त झालेला. त्याच्याही मनात अनेक काहुर माजायचे. माझ्यानंतर बनीचं काय? पण मन मोठं खंबीर करायचा. तिच्या कमावलेल्या पैशातनं घर चालायचं. बिडीचा नाद असतानांही आजारपणात मंगऱ्याचा बिडीचा हट्ट पाहून बनी रडवेली व्हायची.

“अशा आजारातही बिडी ओढता काय जी?”

“बने, माह्या तोंडाले लागलेली चव बंद कर म्हणतेस. आता माह्यं जीव सारं काही बिडीच हाय.”

“ओढायचं म्हणून आपल्या जीवाची काळजी करू नये व्हय?”

“बने, आता तुच माह्यं आधार, दोन दिस जगावं म्हणतो. ह्या बिडीनं...कधी रडावं म्हणतो. ह्या बिडी पायी.”

बनी क्षणभर गोंधळून जायची. मंगऱ्याचं बोलणं तिच्या डोक्यात कुठेच शिरत नव्हतं. असच दहाबारा वर्षे उलटली होती, साध्यासुध्या जीवनाच्या

धीरगंभीर आठवणी साकारत.

पहाटेच्या मंद वाऱ्याची झुळूक अंगाला जानवावी असा वारा मंदगतीने वाहू लागला. आभाळ निरभ्र स्वच्छ झालं होतं. हवेच्या झोकात ढग कुठे पळाले तेही कळले नाही. टपोर चांदणं, टपोऱ्या डोळ्यात बनीच्या इवल्याशा गावात जणू मंगऱ्याचं स्वागत करण्यासच आल्या होत्या. रात्रीचा एक प्रहर राहिला होता. मंगऱ्याला जाग आली. मंगऱ्या कण्हत उठून बसला. नेहमीच्या खोकल्यानं नरडा सुकून आला. पाणी प्यावं म्हणून बनीला आवाज दिलं.

“बने, पाणी देतेस व्हयं.”

बनीचं उत्तर आलच नाही. बनी गाढ झोपली होती. दोन्ही हात छातीवर ठेवून मंगऱ्याच्या आवाजाकडं कानाडोळा केल्यागत. रात्रभर दोनतीनदा उठावं लागलं होतं. दिवसभरच काबाडकष्ट, अंगात कुठही तिच्या त्राण उरलं नव्हतं. डोळे चुरचुरायला लागले होते. ती तशीच पडून होती. मंगऱ्यानं खाटेखाली पाहिलं. पाण्याचा ग्लास भरलेला दिसला. खाटेवरून हात खाली करून ग्लास घेतला. सुकलेल्या नरड्याची आग शांत करावी म्हणून घटाघटा पाणी पिऊ लागला. मनात विचाराचं काहुर...... मंगऱ्याचा पाणी पितांना दम दाटला. खोकला आला. पाणी सारं नाकातून पडलं. हात थरथरलं. ग्लास घरंगळत बनीच्या अंगावर गेलं. बनी मांजरीनं अंगावर यावं त्याप्रमाणं दचकून उठली. मंगऱ्याकडं पाहू लागली. मंगऱ्याला दम लागला होता. मंगऱ्या धापा टाकीत खों..खों.. जोरजोराने करीत होता. रात्रीपेक्षा जास्तच खोकला वाढला होता. बनी तशीच उठली. मंगऱ्याच्या पाठीवर हात फिरवून मानेखाली वाकर लावीत खाटेवरती झोपवलं. मंगऱ्याचा चेहरा लालबुंद झाला. बनीला क्षणभरच काय सुख मिळालं? आणखी सुरू झालं होतं तेच रडगाणं, मंगऱ्या खों खों करतच राहिला बनी खूप घाबरली. काय करावं? तिलाही

सुचेना. रातच्याला वैद्याच्या घराकडं जावं, मंगऱ्याला सोडून, बनीला घाम फुटला. मंगऱ्या तुटक-तुटक शब्दात बनी सोबत बोलत होता.

"बने...बने...खों...खों..."

"आव, चुप रहा वं जरासं. म्या हाय ना! तुम्हास काहीबी होणारनाय?"

"बने ...तो...बघ....देवाचा...दू...त....माही वाट....बघ...तोय..बने.... माह्या...ह्या बिडीपायी...माह्यानंतर...कुणासोबत तरी...लग्न करशिल...बने...मी... चाललो...व्हयं. तूही...तूही...कूस...भरून पाहाची...खूप...इच्छा...होती...बने,....तू बने.... "

बनीचं मंगऱ्याच्या बोलण्याकडे काहीही लक्ष नव्हतं. सारं विचाराचं काहुर माजलं होतं. मंगऱ्या तुटक-तुटक बोलतच राहिला. अधून-मधून खोकलत दम दाटला होता. नरड्याची आग शांत केली. जोराचा दम भरीत मोठ्या जोरात खोकलला. अखेरचा.... बनीसमोर पडला होता. बनीच्या दोन्ही खांद्यावर हात ठेवून, बनीला जोराचा हुदंका आला.

"माह्यं राजा.....!"

बनी खूप रडायला लागली. तिला क्षणभर मंगऱ्या गेल्याचा विश्वासच बसत नव्हता. बनीनं मंगऱ्याच्या छातीवर डोकं ठेवलं. जणू मंगऱ्या अखेरचा तिला कुरवाळत होता. मंगऱ्याचं खापराप्रमाणं झालेले गाल, पिकल्या काकडीप्रमाणं शरीर दिव्याच्या मंद प्रकाशात पिवळसर भासत होतं. छातीचा पिंजरा खों..खों.. करून अगोदरच अर्धमेला झाला होता. साऱ्या सापड्या तिला दिसायला लागल्या. बनीचे अश्रू वाहातच राहिले. मंगऱ्याचे डोळे बंद होते. हृदयाची धकधक अखेरची बंद झाली होती. कायमचाच झोपला होता मंगऱ्या.....

बनी स्वतःवरच विश्वास राखू शकत नव्हती. मंगऱ्यासाठी सारखी रडत होती. रडणं तिच्याच्याने रोखणं झालं नसतं. जोरजोराने हुदंके देत.... आकाश मोकळं

होतं. टपोर चांदणं मंगऱ्याचं स्वागत करीत होते. मांजरीचं अपशकुन, कुत्र्याचं भुंकणं.... सारं काही ... खरचं! जीवनाचं रान करून गेला. सगळीकडे निर्जीव वाळलेल रान असावं असच तिला मंगऱ्याच्या मरणाणं झालं होतं.

बनी धो-धो पडणाऱ्या पावसानं आकाशाला गवसल्यागत मंगऱ्याला बिलगून रडत होती. कुत्र्याच्या भुंकण्यातही बनीचा जोरजोरानं फुटणारा हुंदका स्पष्ट ऐकू येत होता. सारं गाव जागं झालं नि पहाट बनीकरीता जणू नवी दिशा घेवून आली होती. बनी अर्धमेली होवून तशीच रडत होती. मंगऱ्याच्या शेवटालाही पैसे नव्हते. सगळं गावातील लोकांनी गोळा करून मंगऱ्याला स्मशानाकडे घेवून गेले. बयरी अखेरचं त्याच्याकडे पाहातच राहिली. ह्यापुढं कदापीही मंगऱ्या दिसणार नव्हता. कदापिही मंगऱ्या येणार नव्हता. तिची कूस भरायला....

दोन चार दिवस उलटले होते. बनी आपल्याच झोपडीत अर्धमेली पडून राहायची. शेजारच्या बायाबापड्यानींही समजावून पाहिलं पण तिनं काहीही ऐकलं नाही. जणू मंगऱ्यासाठी वेडी झाली होती. एकसारखी विचार करीत. सारखा मंगऱ्याचा चेहरा तिच्यापुढं येत होता. दोन दिवसापासुन काहीही खाल्लं नव्हतं. पोटात भूकेची तळमळही तिला जाणवली नाही. आज ती सकाळीच उठली होती. नव्या आशेची वाट बघत, नव्यानं जगण्यासाठी. फक्त स्वतःसाठी जगावं लागणार होतं. तिच्या मनात पुसटशा भावना अजूनही तरंगत होत्या. गावानं तिला आधार दिला होता. असाच आधार पुढेही मिळणार याच विचारात.....

ooo



# ३

**गावातील** शाळेजवळील मोकळी जागा, त्या शाळेला लागून वट्टा होता. तिथचं रात्रोला लोक जमायचे. त्यापासून तीन चार घर आड एक पडकी झोपडी होती. गवताने शेकारलेल्या झोपडीत जी स्त्री राहायची ती ‘बनी’ होती. समधं गाव तीला ‘बयरी’ म्हणायचे. त्या गावाने तिला आधार दिलं होतं. पण तिच नाव तिलाच खटकायचं, सगळे बयराबाई म्हणून आवाज द्यायचे.

पूर्वी बयरीचं कौलारू घर होतं. ते वादळानं पडल्याने आबानी तिच्याकरीता ही झोपडी बांधुन दिली. बयरी फारशी कुणासोबत बोलत नव्हती. काही लोक तिची थट्टा करायचे. समधं ऐकुण ती फक्त हसायची. तिचं हसणं लोकांना आवडायचं, बयरी पस्तीशीत गेली होती. तारूंण्यात तिच्या फक्त स्मित हास्याने तिच्यावर अनेकांचा डोळा असायचा. पण, ते तारूंण्य रूप वय आता नष्ट झालं होतं. दोघेही काबाडकष्ट करून सुखी होते. तिला मुलंबाळं झाले नव्हते. लग्नाला दहा बारा वर्षे लोटली. मंगऱ्या फार दुःखी राहायचा. पण देवाची कृपा म्हणून गप्प बसायचा. त्यानं बयरीला कधीही त्रास दिला नाही. पण लवकरच बयरीला सोडून गेला. मंगऱ्याला विड्या ओढण्याचा फारच नाद. त्याची तब्येत खालावत गेली. छातीचा पिंजरा दिसू लागला. रात्रंदिवस खों... खों... करून त्याने दम सोडला. बयरी स्वतःला सावरू शकली नाही.

मंगऱ्यावर जीवापाड प्रेम होतं. मंगऱ्यासाठी वेडी असणारी बयरी, आबादीनं तिला आजपर्यंत आधार दिलं होतं. बयरी फाटकी-तुटकी लुगडी घालायची. गावातील बाया तिला कपडेही द्यायच्या. ती तशीच कायमची जगत राहणार होती.

बयरीचं तारूंण्य किती नाजुक होतं. बयरी रूपाची राणी होती. तिच्या रूपाला आज शाप मिळाला होता. ह्या क्षणभंगूर जीवनातील दुःखाची व्यथाही ती जाणू शकली नाही. कितीतरी मर्दगळी तिच्या लोचनाने घायाळ केले असते. पण ते तारूंण्य, रूप, वय काहीही उरलं नव्हतं. मंगऱ्या गेल्यापासुन ती अशीच अर्धमेली जगत आली. जगणं म्हणजे काय? हे सुद्धा तिला कळलं नव्हतं.अर्धमेली नव्हे! ती शरीराने संपूर्ण मेली होती. हाडामासाचा सांगाडा तेवढा उरला होता.

मंगऱ्या गेल्यावर काबाडकष्ट करू लागली. पोटभरून जगू लागली. पण तिच्या जीवनाला ग्रहण लागलं होतं. ते ग्रहण तिच्या जीवनाची राखरांगोळी करेल अशी साधी कल्पनाही करता येत नव्हती. ती सारखी दुःखी मनानं रडत बसायची.

ती आज कपडे धुवायला नदी घाटाकडे गेली होती. दुपारचं ऊन पडलं होतं. सूर्य डोक्यावर येत होता. सगळ्या बाया कपडे धुवून जात होत्या. बयरीने झटपट कपडे साफ केले. कपडे तिथचं वाळू घातले. आणि शेजारीच असलेल्या ढोकाच्या शेताकडे भाजी आणायला गेली. सायंकाळच्या स्वयंपाकाला भाजी न्यावी म्हणून वाडीत घुसली. ढोकाचं बयरीकडे लक्ष होतं. तेवढ्यात कुणीही नव्हतं. ढोकानं बयरीला आवाज दिलं.

“बयरे कुठं चाललीस व्हयं एवढ्या ऊन्हात?”

“तुझ्याकडेच आलती रं, म्हणलं रातच्याला जरासी भाजी न्यावं, देशिल का रं मन्या.”

“ने की, थोडश्यानं काय कमी होतं. वाटेल तं सारीच घेवून जा.”

“नको रे बाप्पा, म्या एकटीच, आणं एवढं कायले रे नेवू.”

बयरीनं पांधन वरचा विळा उचलला. झरझर मूठभर भाजी कापली. गवताच्या पात्यानेच जुडी बांधून जायला निघाली. कपडे धुवून ऊन्हानं गळा कोरडा पडला होता. तहान लागली, पाणी प्यावं म्हणून ढोकाच्या झोपडीकडं निघाली. ढोक वावरातील खाटेवर आराम करीत होता. ढोकाची नजर तिच्याकडं एकटक भिरभिरत होती. बयरीनं माठातील पाणी घटाघटा पीलं. बयरीचा जीव शांत झाल्यासारखं वाटलं. पदराच्या शेल्याने ऊन्हानं निघालेल्या घामाच्या धारा पुसू लागली. ढोकाचा जीव खालीवर होवू लागला. ढोकानं तिचा हात पकडला.

“ये बयरे, बस की थोडा वेळ, एवढ्या लवकर कुठं चाललीस?”

ढोक तिरक्या नजरेने पाहात बोलला. बयरी क्षणभर विचलित झाली. तिचा धरलेला हात ढोकानं सोडला होता. तिला आणखी घाम फुटू लागला होता. घाबरटपणा तिला चढू लागला. त्याला काहीतरी बोलणार पण, तोंडातून शब्दच फुटत नव्हता. तरीपण धीर धरीत पुढं पाय टाकला. ढोकाची वासना विस्कटली. ढोकानं आणखी एकदा घट्ट हात पकडला. आपल्याकडं मिठीत ओढलं.

“सोड रे कुत्र्या, मला वाटलच तुझी वाईट नजर हाय म्हणून माझ्यावर...... सोड...सोड.... कुत्र्या...नायतं ओरडीन मी!”

“असं कसं सोडणार बयरे, तुह्यासाठी तं माह्या जीव वेडा हाय. त्या मंगऱ्यानं काय दिलं तुले. मी देईन की, ये अशी जवळ ये, माझ्या मनाची आज.....”

बयरीच्या तोंडावर ढोकानं हात ठेवला. बयरी धडपडू लागली. ओढतान सुरू होती. बयरी ढोकाच्या हातातून सुटण्याची धडपड करीत होती. ढोकाच्या मर्दानी हाताने तिला घट्ट पकडलं होतं. तोंडावरचा हात काढून तिला कंबरेला घट्ट पकडलं. पीळदार हातानं तिला खाटेवर ढकललं. किच-किच आवाज झाला.....खाटेचा..बयरी जोरात पडली होती. तिच्यावर ढोक निजला होता. चार दिवसाचा उपाशी भिकारी अन्नाला भकाभका झोंबतो त्याप्रमाणं. बयरीचं रडणं ओरडणं सुरू होतं. तिची किंकाळी ऐकण्यास कुणीही नव्हतं. पातळाच्या निऱ्या सैल झाल्या. बयरीनं खुप विरोध केला. बयरीचं

सर्वकाही लुटलं होतं ढोकानं. त्याची कामना पूर्ण झाली होती. मर्दासारखा उठून कपडे चढवू लागला. बयरी रडत होती. केस विस्कटले होते.

“झालं गेलं विसरून जा बयरे, म्या असं केलं कुणाला सांगू नकोस. वाटल तं मी पैसेही देईन. नाहीतर तुझं नाक जाईल. कुणीबी हुंगणार नाय. गावात राहायला मुश्किल होईल.”

“आरं मुडद्या माझं नाश केलंस.”

बयरी धुसफूस रडत एवढच बोलली. पदराने डोळे पुसले, खाटेवरून उठली. ढोकाकडं नजरही फिरली नाही. डोक्याचं दुःखणं वाढायला लागलं. हाताचा थरकाप वाढला. खाटेच्या बाजुकडे पडलेल्या काडीकडे नजर गेली. दोन्ही हातानं काडीला घट्ट पकडलं. ढोक हसत होता. बयरीकडे त्याची नजर नव्हती. बयरीनं त्याच्या डोक्यावर वार केला.

“धाड.........”

“मेलो.........धावा......., ब...बयरे...”

ढोक खाली कोसळला. मन्या चारीचीत झाला होता. बयरी वेड्यासारखी त्याच्याकडे पाहू लागली. बयरीला काही सुचेनासं झालं. हातातील काडी बाजुला फेकली. आणि धावत सुटली. मागे फिरूनही पाहिलं नाही. या शेताकडून दुसऱ्या शेताकडं नदीच्या विरूद्ध दिशेने. कपड्यांची आठवण झाली नाही. गावापासून दूरवर जात होती. क्षणभर थबकली, कुणाची तरी सावली अंगावर पडल्याचा भास झाला. इकडे-तिकडे नजर फिरवू लागली. डोक्याचे केस सुटले होते. हृदयाचे ठोके वाढले होते.

एका झाडाच्या सावलीत थबकली. झाडाच्या वाऱ्याने हलणाऱ्या पानांचा आवाज येत होता. खूप दमली होती. बयरी झाडाच्या बुंद्याला टेकून बसली. आंब्याचं झाड होतं. क्षणभर झालेली कर्मकहाणी आठवली. ढोकाचा चेहरा समोर येवू लागला. किळस यायला लागली होती स्वतःची, स्वतःच्या अंगाची..., थोडासा विसावा मिळाला

होता तिला. खूप धावली होती. डोळे घट्ट मिटून घेतले. ढोकाची कर्मकहाणी डोळ्यावरून तरळू लागली. ऊन्हाचे चटके लागत होते. कपडे नदिवर तसेच वाळत होते. बयरी निद्राधिन झाली होती.

ढोक चारीमुंडया चित झाला... तसाच पडून राहिला. अखेरचा... बयरीच्या काठीनं जोरदार झटका बसला होता. डोक्याला, क्षणभर हसता-हसताच त्याला काहिही समजलं नव्हतं. डोक्यातून रक्त वाहात होतं. थोड्यावेळापूर्वीच मनाची झालेली फूर्ती, निद्राधीन होवून बयरीसोबत घडलेल्या प्रणयक्रीडेचे तो जणू स्वप्नच पहात होता. असाच तो पडला होता. काही क्षणापर्यंत त्याच्या हृदयाची ठोके चालू होती. डोक्यातून खूप रक्त गेल्याने 'पाणी ....पाणी' करून शेवटचा श्वास सोडला. ढोक मेला होता. एकटाच होता तिथं. आणि सोबतीला होतं बयरीनं दिलेलं क्षणभर दिलेलं सुख.

दुपारचं ऊन रखरखत होतं. शेजारच्या गोठ्यात ढोकाची बैलं बांधली होती. बैलही विसावा घेत होती. त्यांनाही क्षणभरसुद्धा ढोकाची चाहुल लागली नव्हती. ऊन उतरणीवर बैल सोडावयास गेला नव्हता. ढोक अखेरचा निजला. जणू स्वतःला संभोगसम्राट पदवी घेवून कायमचा भोगविलासी झाला होता.

ढोकाला एक मुलगा व एक मुलगी होती. बायको जनी गव्हान दाताची. तशी ती रूपवान नव्हती. शेतीवरचं काबाडकष्ट करायचं, शेतीतून मिळालेल्या धान्यावर जगायचं. शेतीनेच त्याला पोसलं होतं. इथं ढोक अखेरचा निद्रिस्त झाला होता. नदीचं पात्र डोलत होतं. पाण्याची बारीकशी धार, गड्ड्यात असलेलं थोडंफार पाणी, बयरी भाजी तोडायला गेली होती. सायंकाळच्या जेवणाची सोय करण्याकरीता, कपडे वाळत होते. वाळूवर तिचं लुगडं... ढोकाची बायकोही नव्हती आली शेताकडे. बैलानी हंबरडा फोडला. त्यांना पाण्यावर आणण्याची वेळ झाली होती. सूर्य अस्ताला जात होता.

नदीचं नागमोडी वळण, सूर्य अस्ताला जातांना पाण्यात पडणारं पिवळसर ऊन, चमकदार पाणी, रात्रीच्या चंद्राप्रमाणं भासणारा संध्याछायेचा सूर्य, क्षणाने नाहिसा होणार होता. गुराख्यांची ढोरं गावाकडे परतायला लागली होती. गायीचे वासरं गायीची

वाट पाहात होते. शेताकडे गेलेले सर्व व्यक्ती आबादीकडं परतत होते. नदीचा घाट सुनासुना होता. कुणीही दुपारपासनं आलं नव्हतं तिथं. बयरीच्या स्पर्शानी नदीचं पात्र डोलत होतं. पाण्याची बारीकशी धार, गड्ड्यात असलेलं थोडंफार पाणी, बयरी भाजी तोडायला गेली होती. सायंकाळच्या जेवणाची सोय करण्याकरीता, कपडे वाळत होते. वाळूवर एक लुगडं पडलं होतं. एक छोटिशी टोपली तिथचं पडलेली होती. बयरीची वाट बघत.

बयरी फार दूरवर धावत गेली होती. गावापासून दोनचार मैलावर, अंधार पडायला अजूनही अवधी होता. आंब्याच्या झाडाखाली बयरी बसली होती. बयरीचं अंग ठणठणत होतं. झोप लागली तिला, कशाचाही विचार न करता पडून राहिली. त्या झाडाची माया तिच्यावर पांघरून घालीत होती. आंब्याला बहर आला होता. लहान-लहान कैऱ्या येत होत्या. बयरीला जाग आली. अंग ठणकायला लागलं. ती इकडे-तिकडे भिरभिर पाहू लागली. ती झाडाखाली बसली होती. सूर्य अस्तास जात होता. डोकं दुखायला लागलं. डोक्यावर ताण पडला. मी कुठं आली? जणू तिला भास झाला होता. एकदम आठवलं तिला. हे आंब्याचं झाड. आबा गावचा प्रमुख, आबाचा मुलगा ह्याच झाडावरणं खाली पडला होता. आंबे तोडतांना आबाचा एकुलता एक मुलगा आबाला सोडून गेला होता. मेला होता तो...तिचं अंग शहारलं.

क्षणभर डोकं ठणकलं. आठवलं तिला, ढोक मेला होता. मघाशी घडलेला सारा प्रकार तिच्या लक्षात आला. रडू यायला लागलं. ती उठून उभी झाली. खरचं ढोक मेला होता काय? तिने स्वतः मारलं होतं. तिच्या अंगाचा रस न रसाचा मध चाखणाऱ्या त्या पारध्याला मारलं होतं.

आबादीच्या दिशेनं पाऊल चालू लागले. क्षणभर ती थांबली. आणखी आठवण झाली. तिचं लुगडं वाळत होतं नदीवर, नदीच्या दिशेने गाव... नदीही खूप दूरवर गेली होती. इकडे-तीकडे बघत बसली. सायंकाळ झाली होती. ढोकाच्या वाडीतली भाजी सायंकाळच्या स्वयंपाकास आणायला गेली होती. तिचीच भाजी ढोकाने करून खाल्ली होती.

खूप खूप धावून थकली होती. भुकेची जाणीव झाली. रडून-रडून सारखा गळा सुकून आला. पाणी प्यायची इच्छा झाली. इकडे-तिकडे पाहू लागली. आबादीकडे तिचे पावलं वळले होते. डोळ्यासमोर सारखा तिचा चेहरा येत होता. तिला दुपारचे शब्द आठवू लागले.

“ये बयरे, जवळ ये, मंगऱ्यानं काय दिलं तुला? वाटेल तं म्या, माह्या दिलाची राणी बनवतुया तुला.”

ढोकाचे वासनेनं बरबटलेले शब्द वारंवार तिच्या समोर येत होते.

“सोड रं ......सोड मला...... कुत्र्या, माझ्या अंगाला हात लावू नगस.”

बयरी ने जोरदार सुस्कारा सोडला होता. रडण्याचा जोरदार हुदंका आला होता.

तशीच भुकेपाण्यावीना आबादीकडे झपझप पावलं टाकित निघाली. भूक जोरात लागली होती. सायंकाळच्या स्वयंपाकाची भाजी कुठं फेकली तेही कळलं नाही. हं! आठवलं. खाटेच्या बाजुला पडली होती. गवताने बांधलेली जुडी विखुरली होती. तिच्या झालेल्या छिन्न विछिन्न देहाप्रमाणं. मध चाखला होता ढोकानं. परस्त्रीचा, आजपावेतो बहुतेकांनी बयरीकडे नजर फिरवली होती. पण कुणाचेही स्वप्न साकार झाले नव्हते.

चालता-चालता शेतातील ढेकलाला अडकळली. पडली. कुणीही पाहात नसल्यागत खात्री करून उठली. उजव्या पायाच्या अंगठयातून रक्त सांडलं होतं. पण वेदनेचा जराही भास झाला नव्हता. यापेक्षाही ढोकाने दिलेली जखम खूप मोठी होती. ती जखम तिच्या मनात घर करून बसली होती. तशीच पुढं चालणार एवढ्यात थांबली.

‘कुठं जावं? आबादीत, नाही..... आता आबादी आपल्यासाठी नाही, ढोकाला मारलं मी? आबाचा न्याय. शिक्षा होईल. वाटेल तर तोंडाला काळही फासतील.

उघडी-नाघडी करून धींड काढतील गावात. आबादीत जावू नये. कुठतरी दूर जावं. वासनेने भरकटलेल्या गावापासून खूप दूर...’

तशीच मागल्या पायानं वळली. तिथुनच तालुक्याच्या दिशेनं जावू लागली. तहान लागली होती. नदिजवळ आली. पाणी प्यावं म्हणून नदीच्या पात्रात शिरली. तिच्या लुगड्याची आठवण झाली तिला. अंधार पडलं होतं. आता लुगडं पाहणार तरी कुठं? पाणी नदीच्या पात्रात चकाकात होतं. आंजोळीने घटाघटा पाणी प्यायला लागली. पोटभर पाणी प्याली. मन कसं बर्फासारखं शांत झालं होतं. पण ढोकाच्या वासनेच्या ज्वालाने मन अजूनही तडफडत होतं. परत फिरली होती. कुठतरी दूर जायला. तालुक्याच्या दिशेने, मनाचा मोठेपणा करून, जे काही घडलं ते विसरून नवं जीवन जगण्याच्या आशेनं बयरी पुढं-पुढं जात होती....

०००

# ४

**रात्र** झाली. रातकिड्याचा किरकिर आवाज वाढत चालला होता. आबादीचं लोक जेवण-खावण आटोपून बसली होती. लहान मुलंबाळं झोपी गेले होते. आबाचंही नुकतच जेवण आटोपलं होतं. तालुक्यावरून आबा सायंकाळीच परतला होता. झोप डोळ्यात दाटत होती. आज वट्ट्याकडे जाण्याची इच्छासुद्धा नव्हती. अंथरूणावर अंग झोकून आबा निजला होता.

चारचौघं गावातील मंडळी वट्ट्यावर जमली होती. शेती, पीक पाण्याच्या गोष्टी सुरू होत्या. वट्ट्याच्या तीन-चार घर आड बयरीचं घर होतं. बयरी घरी नव्हती. तिच्या घरी दिवाही पेटला नव्हता.

ढोकाची बायको धन्याची वाट पाहून थकली. आज खूप उशीर झाला होता. चटणीभाकर केली होती. ढोकाची लहान मुलं जेवण करून झोपी गेली होती. धन्याची वाट पाहात तशीच बसून होती. रातच्याला शेताकड जावं, पण अंधारात एकटं जाणं. फार भीती वाटली असती. कुणाची तरी विचारपूस करावी म्हणून वट्ट्याच्या दिशेनं निघाली.

वट्ट्यावर गावातले, चारपाच व्यक्ती बसली होती. नजर भिरभिर भिरकावित वट्ट्याजवळ आली. सगळ्याचं लक्ष तिच्याकडे गेलं. जवळ जावून हळुच म्हणाली.

“आमचं धनी दिसलं काय जी? अजून आलं नाही शेताकडनं.”

“कवा गेलं शेताकडं?” त्यांच्यातला एक म्हणाला.

“सकाळपासून गेलं होतं वाडीवर, अजून आलच नाय जी. बैलही आलं नाय.” ती रडकुंडीस येवून हलक्या स्वरात म्हणाली.

“येईल की नवं उशीर पाशीर.” त्यांच्यातील ढेकल्या तिला धीर देत म्हणाला.

मन्याची बायको काहीही बोलली नाही. डोळ्यात आसू आले होते. अजूनपावेतो त्याला कधीही उशीर झाला नव्हता. घराच्या दिशेनं जाणार एवढ्यात ढेकलू काडी धरून उभा राहिला.

“चला की रं, वाडीच्या शेतामधनं येवू.”

“चला की. ”

सगळे जन उठले होते. हातात काठ्या घेवून नदीच्या काठानं निघाले. मन्याची बायको घराकडं गेली. रातच्या अंधारात मन्या येईल ह्या आशेनं. तिला भूकेचीही जाणीव झाली नाही. मन्याच्या आठवणीत.

आबा झोपला होता. रात्र वाढत होती. अचानक कुणीतरी आरडाओरड करण्याची चाहुल लागली. आबा स्वप्नातून जागा झाल्याप्रमाणे दचकून उठला. आबाला भास झाला होता. एकटक खिडकीवाटे बाहेरच्या दिशेने पाहू लागला. कुत्र्याच्या भुंकण्याचा आवाज कानी येत होता. चारपाच लोकांचं ओरडणं आता त्यांच्या लक्षात आलं होतं. बैलाप्रमाणं हंबरडा फोडीत कुणीतरी बाई रडत होती. आबा तसाच उठला. दार किर्र.....आवाज करीत उघडलं. पायात पादत्राण टाकून अंधाऱ्या वाटेनं चालू लागला. समधं गाव जागं झालं होतं. मन्या ढोक मेला. कुणीतरी मारलं होतं. मन्याची बायको रडत होती. तिची लहान मुलही तिला बिलगून रडत होती. समधी आबादी दिवस उजाळल्या प्रमाणं जागी होवून हळहळत होती.

बयरी कुठतरी दूर निघाली. अंधाऱ्या वाटा तुडवित कुठं जात आहे? तिलाही कळलं नव्हतं. ती तशीच चालत राहिली. अर्धी अधिक रात्र गेली होती. शेतातनं चालतांना दोन काटी पायात रूतली होती. कशाचही भान उरलं नव्हतं. पडल्यामुळं अंगठ्यातून रक्त गेलं होतं. अंगठा ठणठणू लागला होता. चालण्याची हिंमत उरली नव्हती. तरीपण एकएक पावलं पुढे टाकत तशीच जात होती.

सकाळचा उजेड पसरत होता. कावळे, चिमण्या कावकाव, चिवचिव करीत रानाच्या वाटेनं जावू लागले. समधी आबादी रात्रभर झोपली नव्हती. मन्याच्या बायकोचं रडणं अजूनही थांबलं नव्हतं. गावातले लोक मन्याच्या शेवटच्या लग्नाची तयारी करत होते. शेवटचं लग्न होतं. बयरीसोबत नव्हे! एकट्याचं. प्रत्येकाचेच एकदा शेवटचे लग्न असते. गाजावाजा असतो पण आनंद मात्र नसतो.

सर्वत्र असं दुःख नदी दुथडी भरून वाहावं तसं वाहात होतं. आबादीनं लग्नाला हातभार लावला. आबानं सर्व तयारी केली. नव्याकापडाचा साज चढविला होता. नववस्त्राने नटून-थटून अनंतात विलिन झाला होता. दोन बैलगाडी लाकडं भरून समोर जात होती. चार लोकांच्या खांद्यावर तिरडी होती. मागून बाया माणसं जात होती. मन्याचा चार वर्षाचा पोरगा समोर आकटं धरून चालत होता. आबा त्याला हाताने आधार देत होता. सरणाची राख होत होती. मन्याची बायको रडतच बसली. अखेरची, मन्याच्या वासनेनं तिचही जीवन नष्ट झालं होतं.

दोन दिवस उलटले होते. आबादीत मन्या ढोकाची चर्चा दररोज चालू होती. मन्या ढोकाला मारलं तरी कुणी? आबा दररोज जावून वड्यावर चर्चा करीत होते. आबा आणि पाचसहा व्यक्ती वाडीच्या शेताकडं निघाली. चारपाच व्यक्तींनीं त्याला रात्रोला आणलं तेव्हापासनं कुणीही तिकडे फिरकला नव्हता. दोन दिवसापासून बयरीचाही पत्ता नव्हता. नदीवर तिचं लुगडं वाळत होतं. कपडे धुवायला गेलेल्या बायांना मिळालं होतं.

गावात बयरीचीही चर्चा चालू होती. पण मन्याला बयरीनं मारलं असेल अशी कल्पना कुणाच्याही मनात आली नसेल. आबानी सगळ्या झोपडीची नीट चौकशी केली होती. भाजी वाळून विखुरली होती. त्या दिवशी रात्रोलाच बैल घरी आणली होती. आबा एकसारखा विचार करीत होते. अचानक आबाच्या डोळ्यात ऊन पडल्यागत चकाकी दिसली. हातातली अंगठी होती. आबानं ओळखलं. ती बयरीचीच अंगठी होती. आबाच्या डोळ्यात कल्पनाचा उद्रेक माजला होता. 'ती बयरी दोन दिवसापासून बेपत्ता.. बयरीची अंगठी, नदीवर वाळलेलं लुगडं..., टोपली, भाजीची वाळून विखुरलेली जुडी.'

आबाला क्षणभर झटका बसला. मन्याच्या खाटेवर बसून आबा विचार करू लागले. आबाचा राग भडकत होता.

"खंड्या, ती बयरी कुठं दिसली का रं?" आबानं खंड्यास विचारलं होतं. खंड्या आबाच्या हातातील अंगठीकडे पाहातच राहिला होता.

"आबा, हे समधं बयरीचं लफडं असावं, ह्या मन्याचा जीव..."

"हो, बयरी शिवाय मन्या मेला नाय. आर ! मुडद्यासारखं का बघता? चला गावात, जा शोधा तिला. सारं शिवार धुंडून काढा...."

आबा त्वेषाने चढला होता.

बयरीने मन्या ढोकाला मारलं. चर्चा सुरू झाली. बयरीसाठी लोकांनी सारं शिवार धुंडलं पण तिचा पत्ता लागत नव्हता.

बयरीचं माहेर आबादीवरनं चार मैलावर होतं. आई बाप तर नव्हतेच. बयरीच्या वडिलांनी बांधलेलं घर होतं. कुणीही तिथं राहात नव्हतं. पडकी झोपडी होती. त्यादिवशी बयरी इथंच आली होती. रात्रभर वेड्यासारखी भटकत होती. कुठं जाव? कुणाचाही आसरा नव्हता. बयरी तिथं खूप वर्षांनी आली. पहाटेलाच तिचा चुलता शिवा एकसारखा तिच्याकडे पाहातच बसला. बयरी हिरमुसली होती. रडकुंडीस आली होती. धावतच शिवाच्या कुशित गेली. मनसोक्त रडली. शिवा आधार देत होता. संपूर्ण

कर्मकहाणी सांगितली. शिवाचेही डोळे पानावले होते. शिवाच तिचा मायबाप होता. पुढील जीवनाचा आधारस्तंभ होता. बयरी आता कायमच इथं राहणार होती.

आणखी दोन दिस गेलेत. बयरी सारं काही विसरली होती. ती नदी, लुगडं, भाजी, मन्या ढोक... सारं काही विसरली होती. नव्या जीवनाला सुरवात केली. मन्याला काडीने मारलं. तो मेला म्हणून घाबरली होती. मन्याच्या वासनेला, त्याच्या अत्याचाराला घाबरली नव्हती. कितीतरी रात्री मंगऱ्यासोबत घालवल्या होत्या. तिचा पती होता तो. खूपच दिवस झाले होते. मंगऱ्याच्या स्पर्शाविना असह्य होवून जगत होती. तिची कामना पूर्ण झाली, ढोकानं तीची कामना पूर्ण केली पण तिला ते पटलं नव्हतं. परपुरूषाशी घडलेला हा प्रकार...म्हणुणच बयरीनं मारलं होतं. रात्रो खाटेवर पडल्या पडल्या तिच्या डोळ्यात स्वप्न तरळत होते. मंगऱ्याचे....

तिच्या नवऱ्याचे स्वप्न, मंगऱ्यासोबत लग्न झालं होतं. मंगऱ्या बनीला बयरीच म्हणायचा. ‘ बनी...बने..’ कुठूनतरी हाक आल्यासारखी वाटली. तिचंस्वप्नं भंगलं होतं. इकडे-तिकडे भिरभिर पाहू लागली. कुणीही नव्हतं. भास झाला होता. मंगऱ्याचा आवाज होता. मंगऱ्या बिडी ओढून दमा दाटून मेला. त्यादिवशी मरण्याअगोदर बयरीसोबत खूप प्रेमानं बोलत होता. आजपावेतोचं सर्व प्रेम त्यादिवशीच केलं होतं.

“बने, मी तुला सोडून जातूया. मला विसरशिल बने?”

“नाय जी मी तुमाले कसं विसरू. तुम्ही असं वाईट बोलू नका. काहीबी नाय होणार तुम्हास. मी आहे की नवं.”

“बने मी जातुया...ह्या बिडीपायी. माह्यानंतर कुणासोबत तरी लग्न करशिल. मी

तुला कायमचं पोसू शकलो नाय. पण पुढल्या जन्मात नक्की भेटीन. बने .... तू... तू ... भेटशिल नं!”

मंगऱ्याला पाहून बयरी रडली होती. चार घटकेचा पाहुणा होता तो. बयरी त्याला आधार देत होती. स्वतःच्या कुंकवाची पर्वा न करता. रडतांना कपाळावर हात गेलं. हात रक्ताने माखल्यागत झालं होतं. कपाळाचे कुंकू पुसल्या गेले होते. ती मनातच घाबरली होती.

“नाय! तुम्ही मला सोडून जाणार नाय.....”

“बने, तुही कूस भरून पाहायची इच्छा होती. आता काहीही होवू शकणार नाही. बने, तुला पोटचा पोरगा देवू शकलो नाही. या नाही तं पुढच्या जन्मात तुझे अधुरं स्वप्नं...”

“तुमचंबी तं स्वप्नं अधुरच राहिलं. म्या पापीन हाय जी. माही कूस रिकामीच राहिली.”

बनी हुदंका देत रडत होती. मंगऱ्या तिच्याकडे एकटक पाहात होता. कदाचित कधीही दिसणार नव्हती त्याला. तिच्या रूपाकडे सारखा पाहू लागला. तिच्या गालावर स्पर्श केला. बयरी त्याच्या कुशित शिरली. हुंदके देत जोरजोराने रडत होती. “बने...ब...ने..”

शेवटचा शब्द निघाला होता. अंग कसं हलकं पडलं. बयरी एकसारखी पाहातच राहिली. हंबरडा फोडून रडली. कुंकू पुसलं होतं कायमचं, एक अधुरी कहाणी... कुणीही उरलं नव्हतं. कुणासाठी जगणार होती ती?

रात्र खूप झाली. बयरी मंगऱ्याच्या आठवणीत तल्लीन झाली. रडवेल्या दुःखी मनानेच झोपी गेली. डोळा केव्हा लागला तेही कळलं नाही तिला.

शिवाही रातच्याला विचार करतच झोपी गेला. बायकोसंगे खूप वेळ बोलत बसला होता. बयरीचं दुर्भाग्य त्या दोघांनाही आठवत होतं. शिवाची पुतनी होती ती. सख्खी नव्हे! मानलेली. बयरीचं मायबाप असता पासून जीवापाड प्रेम केलं होतं तिच्यावर. शिवालाही मुलं मुली होते. साऱ्यांचे लग्न झाले होते. शिवाचे मुलं तालुक्याला राहायची. शिवा त्याची बायको दोघच फक्त इथं राहायची. ज्या मातीत जन्मला त्या मातीचे उपकार फेडण्यासाठी. शिवा मुलाकडं गेला नव्हता. गावातच राहून दोन कष्ट करून खाणं त्याला जमणार होतं. पण शिकलेल्या मुला नातवासोबत राहणं जमलं नसतं. मुलगा कधी फिरकूनही पाहात नव्हता. स्वतःचा

मुलगा असूनही खूप दूर होता. त्याला कधी आठवणही येत नव्हती. त्या रात्रो शिवाची बायको बयरी विषयी बोलत होते.

"बयरीनं मन्याला मारलं, गावात जर माहीत झालं तर...ते येथपर्यंत येतील. मग काय करायचं वं?"

"पाहू पुढं सध्या तर माहीत नाही ना!"

"पण पोलिसात गेल्यावर."

शिवाचं काळीज जोरजोरात धडकू लागलं. पोलिसाचं नाव घेताच. "खरच! पोलिसांना माहीत झालं तर बयरी कायमची जाईल. नाही, पोलिसांना माहीत होणार नाय. आपणच तिला बोलावलं म्हणून सांगायचं. मन्या मेला तेव्हा कुणीही पाहिलं नाही. बयरीसाठी आपण खोटं बोलू."

"पण, बयरी..."

"तिचं समधं बरोबर होईल."

शिवा त्याची बायको रात्रभर विचार करीत बसले होते. त्यांचाही डोळा केव्हा लागला त्यांनाच कळलं नाही. बयरीसाठी शिवाची तळमळ सुरूच राहणार होती.

महाग्या, नंद्या, खंड्या, झिंगऱ्या झपझप चालत होते. एका हातात काठी, खांद्यावर घोंगडं होतं. त्यांचा चेहरा कसा लाल बुंद झाला होता. गावातील दिशेने घुसली होती. रस्त्यावरनं जातांना एका विहिरीवर थांबली. बाया पाणी भरत होत्या. पाणी काढलं. आंजोळीने चौघेही पाणी प्याली. खांद्यावरच्या दुपट्ट्यानं हात पुसलेत. त्यांची नजर सारखी इकडे-तिकडे भिरभिरत होती. विहिरीवर पाणी भरणाऱ्या बाया त्यांच्याकडे पाहू लागल्यात. ते गावात नवीनच होते. पण कुणीही त्यांच्याशी बोलले नव्हते. हातात काठ्या घेवून सरळ चालली. शाळेजवळ येवून थांबली. इकडे-तिकडे आणखी पाहिलं. समोरून कुणीतरी येत होतं.

“काय र ं? बयरी दिसली का तुला?” महाग्या कडक आवाजात बोलला.

“कोण बयरी, म्या ओळखत नाय...” त्यानं नम्रपणे उत्तर दिलं.

“आरं! या शाळेजवळ घर होतं पाहा तिचं. आबादीत तिचं लगीन झालं हाय. ”.

खंड्या त्याला समजावित होता.

“हं! त्या किसनाची पोर काय? पण मेला की नव तो. बयरी इथं येत बी नाय, लई दिस झाले.”

तो सरळ जावू लागला. चौघही त्या माणसाकडे पाहातच राहिले. आणखी कुणाला तरी विचाराचं ह्या विचारात. चौघही तिथच थांबलेत. रस्त्याच्या कडेनं वडाचं झाड होतं. त्या झाडाच्या सावलीत विचार करत उभे होते. आणखी कुणीतरी येण्याची चाहूल लागली.

“ह्याला विचार की?” खंड्यानं झिंगऱ्यास म्हटलं होतं. ती व्यक्ती त्याच्या जवळून जावू लागली होती.

“अहो राव! ” त्या माणसाची त्याच्याकडे नजर गेली.

“काय र? कशाला आवाज दिलं?”

“काम होतं तुमच्याकडं.”

“कोणतं?”

“ह्या इथं किसना राहात होता.”

“मेला तो, दहा बारा वर्ष झालीत.”

“त्याचं कुणी नातेवाईक नाय का इथं?”

“हं! आहे ना! आबादीला त्याची मुलगी राहते बयरी, कालच दिसली त्या शिवाच्या घरी. तिचा चुलात व्हय ना तो!”

“घर कुणाकडं आहे त्याचं?”

“हेच समोरचं व्हयं की.”

ती व्यक्ती समोर गेली. महाग्या, खंड्या, झिंगऱ्या लालबुंद झालेत. बयरीमुळं खूप फिरावं लागलं त्यांना. चौघेही शिवाच्या घराकडं निघाली. शिवाची लहान झोपडी होती. आतमध्ये कुणाचं तरी बोलण्याचं आवाज येत होतं. चौघही दारात थांबले. एकमेकाकडे नजर फिरवली. झिंगऱ्यानं जोरात आवाज दिलं.

“शिवा हाय का घरात?”

शिवा दारातून बाहेर आला. कुणीतरी बोलवल्याचा आवाज आला होता. त्याचं काळीज ठणकलं. हृदयाचा थरकाप उडाला. आबादीचं चौघं जण त्याच दारात उभी होती.

"बयरी कुठं हाय?" नंदयानं रागात विचारलं.

"कोण बयरी... इथं बयरी राहात नाय?"

"खोट बोलतुयास, त्या किसनाची पोर, आण तिला बाहेर. नाय तं तुझा मुडदा पाडल्यागत राहणार नाय."

महाग्या शिवावर धावून गेला. शिवानं दारात असलेल्या काठीनं वार करणार तोच झिंगऱ्यानं काठी अडवली. शिवा रागात बोलत होता.

"माह्या घरी येवून मलाच दम देतोस का रं? हिंमत असल तं ये की एकटा. आबादीच्या गिधाडांनो तुमचं मुडदच धाडीनं."

"थांब शिवा, आमचं म्हणणं ऐकूण घे. आम्ही मारपिठ करण्यास आलो नाय."

झिंगऱ्या शिवाला समजावित होता. त्याच्याच गावात जावून त्यांना मारणं म्हणजे, गावाशी विरोध करणं होतं. समध्या गावातील लोकांनी त्याला सोडलं नसतं. शिवा बोलला ते बरोबर होतं. गिधाडालाही त्यांची तुकडे पुरली नसती. शिवा शांत झाला होता. ते पुढं काय करणार याची वाट पाहात होता. पण शिवाचं काळीज अजूनही धकधक करत होतं. बयरीचं पुढं काय? शिवाची बायको आतमधनं डोकावून पाहात होती. सोबत बयरी रडत बसली. धुसफूस चालू होती. बयरीलाही धडकी भरली होती. इथूनही पळून जावं, तिच्या मनात विचार आला. पण आता वाटा थिजल्या होत्या. पुढं देवाची कृपा होती. त्या खंडोबाची... क्षणभर डोळे बंद केले आणि बयरी, शिवा व त्या चौघाकडे पाहतच राहिली.

झिंगऱ्यानं शिवाला बयरीची कहाणी सांगितली. ते लुगडं, अंगठी, भाजी... या साऱ्या बाबीचा शिवाच्या काळजाला धक्का बसला. बयरीही ऐकत होती. पडद्यामागून आवाज यावं तसंच भिंतीला कान लावून बसली. बयरीचं काळीज धडकलं. अंगठी... तिचं बोटाकड लक्ष गेलं. अंगठी नव्हती. तिच्या सारंकाही लक्षात आलं. मंगऱ्यानं पै – पै जमवून बयरीला अंगठी केली होती. तिला घाम येवू लागला होता. शरीराचं पाणी पाणी

झाल्यागत दिसू लागलं होतं. शिवाची बायको तिच्या जवळ जावून तिच्याकडे एकसारखी पाहू लागली. कदाचित बयरीच्या डोळ्यातच तिचं भविष्य दिसत होतं. अंधाऱ्या वाटा... बयरीच्या जीवनातील पुढची कर्मकहाणी..... आणि प्रकाश पडल्यागत शब्द आठवला पोलिस.

शिवा ने बयरीबद्दल समधं खरं खरं ऐकवलं. चौघांनाही त्याचं म्हणणं पटलं. बयरीनं स्वत:साठी ढोकाला मारलं होतं. पण बयरीला आबादीत पंचासमोर जाणं भाग पडलं. सोबत शिवाही निघाला. बयरीसोबत काय घडतं ते पाहण्यास. शिवा मंगऱ्याच्या मरणास आला होता. कदाचित तो बयरीच्या मरणालाच निघाला होता. बयरी, शिवा, चौघही निघाले होते आबादीकडं. बयरी शिवाला धरून जात होती. महाग्या, खंड्या शिवाला आधार देत होते. जणू शिवाच त्याचा सोबती होता. पुढचं काय होईल ते होईल. पण बयरी स्वत:साठी जीवनाला झुंज देत होती. झाशीच्या राणीप्रमाणं बयरी माहेरातून निघाली होती. शिवाच्या घरासमोर वडाचं झाड होतं. लग्न झालं तेव्हा बयरीनं वडाला तीन फेऱ्या मारल्या होत्या. गावातील ती प्रथा होती. आजही ती वडाला तीन प्रदक्षिणा मारण्यास गेली होती. स्त्रीचं सौभाग्य कायम राहतं. पण सारं काही नष्ट झालं होतं. सौभाग्य परत मिळेल ह्या आशेनंच जणू फेऱ्या मारल्या होत्या. बयरी पुढं पुढं चालत होती. जुन्या आठवणी दाटून येत होत्या. डोळ्यातून अश्रू पडले. शिवाची बायकोही रडली. बयरीकडं एकसारखी पाहात राहिली. गावातली सगळी बाया - माणसं शिवाकडं पाहत राहिली. गावाचं शिवार संपलं होतं. आबादी जवळ करण्यास झपाझप पावलं पडत होती. दुपारचं ऊन चढलं होतं......

०००



# ५

**आबादी** शांत होती. ढोक मेल्यापासून आबा सारखा विचार करीत असायचा. बयरीनं का मारलं असेल? आबा घरीच थांबला होता. वरांड्यातल्या पाळण्यावर बसून हवेच्या झोकात तरंगत होता. गावातलं दुःख जणू त्याचच दुःख होतं. आबाची मुलगी सुरेखा खेळत होती. एका वर्षाची झाली असेल. खेळण्याशी खेळतांना रांगत-रांगत येत होती. आबाला क्षणभर हसू आलं. आबा एकसारखे सुरेखाकडे पाहातच राहिले. वऱ्हांड्यातल्या पायऱ्याजवळ गेली. वारंवार उभं राहायच्या प्रयत्नात होती.

आबाची नजर चुकली. आबा आपल्याच विचारात मग्न झाला. सुरेखा उभी झाली. एकाएकी तोल जावून पायऱ्यावरून पडली. तिच्या रडण्याचा आवाज ऐकूण आबा घाबरला. आबाने धावत जावून तिला उचललं. तिची पाठ थोपटली पण रडणं मात्र थांबलं नव्हतं. तिची आई आली. तिला सोबत घेवून गेली. आबाची बायको, पाटलीनबाई म्हणायचे सगळे, शांता नाव होतं सुरेखाच्या आईचं. आबाचं खूप प्रेम होतं तिच्यावर. सासुसासरे गेल्यावर ह्या घराला तिनच सांभाळलं होतं. दुःखाची कधी पर्वाही केली नव्हती.

दुःख प्रत्येकाच्याच नशीबात असतात. 'पाटलानेच जर दुःख करीत बसले तर गावाचं काय?' नेहमी म्हणायची ती. आबा पाळण्यावर येवून बसले. सुरेखा पडली, रडली, आबाच्या मनाला क्षणभर धक्का बसला. जुन्या आठवणी तरंगत होत्या. आबाचा मुलगा असाच निघून गेला होता. जुन्या काळाचं पाप भोगतोय म्हणून आबा गप्प बसायचे. त्यांचा ह्या जन्मात तरी पुण्य मिळवायचा ध्यास होता. आबाची बायको

पाटलीनबाई फार दुःखी झाली. अन्न पाणी सुटलं होतं. पण आबानं सावरलं तिला प्रेमाचा आधार दिला. आबा असाच आबादीलाही आधार देत राहिला.

आबाला दुपारचं थकवा आला होता. डोळे लागत होते. तसाच विचार करीत पाळण्यावर पडून राहिला. आबाला स्वतःचं बालपण आठवायला लागलं. थोड्यावेळापूर्वीच पडलेल्या सुरेखाचं....आबाची एकुलती एक मुलगी....

आबाचं नोकर रंग्या गडी आला. दुपारचं बैल वासरांना पाणी पाजून... रंग्या लई ईमानदार... घरच्या व्यक्तीप्रमाणे होता. आबाला त्यानं हाक दिली.

“मालक”

आबाचा डोळा लागला होता. आबाला जाग आली.

“काय रं! कोणत काम होतं?”

“मालक, थोडसं पैसे पाहिजे होतं. माही घरवाली बाळंतपणासाठी माहेराला जातं म्हुणं .... खर्चापाण्याला...”

“किती पैसे पाहिजे रं तुला.”

“पंचेविस-तिस रूपये पाहिजे जी.”

“होईल का रं एवढ्याशा पैशानं? थोडसे जास्त पाठवून दे, वेळेवर सांगता येतं व्हयं. आणं तुही चाललास काय र?”

“नाय जी? तिचा भाऊ आलाय नेवाया. आता दुपारणं जाणार हाय.”

“बरं! मालकीन कडून मागून घे!”

“व्हय जी मालक.”

आबाचा डोळा आणखी लागला. पाटलीनने दुपारचं चहा आणला. रंग्या तिथचं होता. आबा उठून बसलेत. आतातरी झोप जाणार होती. आबाने रंग्याने चहा घेतला.

“रंग्या त्या ढेकल्याच्या पोराले बोलावलं म्हणून सांग.”

मालकीन रंग्याला सांगत होती.

“व्हय जी,” रंग्या चुपचाप मान हलवत ढेकल्याच्या घराकडं जाण्यास निघाला.

“त्याला कुठं पाठवून राहिलीस. त्याची बायको गावला जाणार हाय. तो पैसे मागायला आला होता.”

रंग्या गेला होता. लवकरच ढेकल्याच्या मुलाला बोलावून आणलं. घरीच मिळाला होता तो. दोघेही मिळूनच आले होते. ढेकल्याचा मुलगा तालुक्याला शिकायचा. त्याच्या मनात भीती तयार झाली होती. आबानं का बरं बोलावलं असेल? चुपचाप रंग्याच्या मागे-मागे आला. आबा समोर जावून उभा राहिला. पाटलीनने नोटाचं पुडकं आणून दिलं. आबानं रंग्याला पन्नास रूपये दिलेत. रंग्या निघून गेला होता. ढेकल्याचा मुलगा घाबरट नजरेनं पाहात तसाच उभा राहिला.

“काय रं? कोणत्या वर्गात आहेस.”

“दहाविला आहे जी.”

“ढेकल्या कुठं हाय.”

“शेताकडं गेला जी.”

आबाचा धाक होता आबादीवर. समधं गाव मानानं बोलायचं. काल आबा वट्ट्यावर बसले असतांना समजलं. ढेकल्या फार गरीब होता. मुलाला राहायला, खायला पैसे लागतात. इकडनं-तिकडनं ऐकलं होतं आबानी, आबानी शंभर रूपये मोजलेत.

"हे घे शंभर रूपये, खर्चाला ... अभ्यास कर... पास हो, काही अडचण भासली तर येत जा."

त्याने आबाच्या हातून पैसे घेतले. आबाच्या पाया पडला आणि विचार करीत निघून गेला. आबासारखा देवमाणूस गावात नाही. आबानेच पाटलीनला ढेकल्याच्या मुलाची गोष्ट सांगीतली. पाटलीन कपबशी घेवून आत गेली. आबा आपल्याच पत्नीकडे पाहात राहिला.

आबादीत पावसाचं आगमन होवून जवळपास एक महिना गेला होता. ऊन्हाची लाही वाढता-वाढता थांबली होती. पण पंधरा दिवसापासून आणखी ऊन वाढतच होतं. समधे शेतकरी कामधंद्याला लागले होते. शेतात सोनं उगवण्यासाठी.

एखाद्या दिवशी काळ्या-काळ्या ढगांनी आबादी झाकली जायची. ऊन सावलीचा खेळ दररोज सुरू होता. मातीची आग पहिल्या पावसानं कमी झाली नव्हती. ऊन्हाळ्यात शेतात पडलेल्या भेगा तशाच कायम होत्या. जणू आबादीच्या दुःखाप्रमाणे दोनचार दिवसात पाऊस येईलच. धान्याची पेरणी होईल असचं समध्यांना वाटत होतं.

आबादीत दोनच रस्ते होते, गावाच्या मध्ये दोनही रस्ते जोडले होते. खामदयात दुपारी गावातील सगळी पोरं बसायची. गप्पा गोष्टी करत खेळायची.

आणि रातच्याला वट्टयावर... आबानीच बांधला होता वट्टा, गावातल्या सभा, न्यायनिवाडा सर्वासमक्ष तिथचं केला जायचा. खामदयात फक्त लोक मनोरंजनासाठी बसायची, खेळायची.

खामदा गवतानं शेकारलेल्या झोपडीप्रमाणं होता. त्याच्या बाजुनेच हनुमानचं मंदिर होतं. आबाच्या वडिलांनी बांधलं होतं. सगळ्या गावकऱ्याचं एकच मंदिर होतं. सगळ्या गावकऱ्यांचा एकच खामदा. खामदयात ऊन्हाळ्यात चौरस, पत्ते दररोज

खेळायचे. पण आबाला न दिसता. आबाचा सक्त विरोध असायचा. पत्ते खेळण्यामुळं आबादीतील तीन चार गडी जुगारापायी बरबाद झाले होते. तेव्हापासून आबा गावात कुणालाही जुगार खेळू देत नसत. जे काही खेळत ते आबाच्या मागेच. आबा कधी खामदयात येत नसत. पण एखादया दिवशी तरूण मुलासोबत गप्पा करायला येवून बसायचे. आबा तरूण असतांना दररोज इथं खेळायचे.

त्या दिवशी असेच पाय फिरलेत खामदयाकडे, खामदयाच्या मागच्या बाजुला दोनचार मुले जुगार खेळत होती. आबाला कळलं होतं. तसेच ते खामदयाकडे गेले. पैशाचा डाव चालू होता. आबा जावून तिथं थांबले, कुणाचेही त्यांच्याकडे लक्ष नव्हतं. आबा त्यांची गंमत पहात बसला. कुणीतरी त्यांच्याकडे पाहिलं. आबा आले म्हणून हळूच पुटपुटला. सर्वांच्या अंगाची लाही-लाही झाली होती. सगळे एकटक पाहू लागले. आबाला खूपच राग आला होता. त्यांना काहीतरी म्हणणार पण गप्पच राहिला. हे सगळं पाहून परत फिरला, ती मुलही एकमेकाकडे पाहू लागली. आबानी त्यांना काहिच म्हटलं नव्हतं. तसाच निघून गेला. सगळ्यांना नवल वाटलं. पण आबा शिक्षा दिल्याशिवाय राहणार नाही याची खात्री होती. कदाचित वट्ट्यावर सर्व गावासमोर शिक्षा देतील. असही वाटलं त्यांना, चौघही आपसात कुजबुजत होते. खामदयात असलेली बाकीची मुलं हसू लागली.

आबाला खूप भित, त्यांचा मान राखत असत. आबा आपल्या गावाच्या भल्यासाठी करतो. आपल्याही भल्यासाठी.... दुसरं पाटील असतं तर त्यांच्या वडिलाप्रमाणं धनदौलत खूप कमावली असती. स्वतःचा फक्त विचार करून चैनीने जगले असते. कुणी नाव ठेवलं, विरोधही केला तर प्राणाला मुकावं लागलं असतं त्यांच्यासमोर... पण असं ते कधीही वागले नाही. न्यायदान करतांनाही गावाच्या मताप्रमाणेच करीत. स्वतःचा विचार शक्यतो बाजुलाच ठेवत असत. चौघही माफी मागायला जाण्याच्या विचारात होते. आबाच्या घरी जावून माफी मागावी, पाय पकडावे. आबाचं मन मेणाप्रमाणे विरघळणारं होतं. याची जाणीव त्यांना होती. चौघही आबाच्या घराकडे निघाले होते. आबाच्या घरी पोहचलेत. पाटलीन दारातच होती.

“आबाजी हायत काय जी घरी?”

त्यातील एकाने निउत्साही मनानं पाटलीनला विचारलं होतं.

“आत्ताच तर बाहेर गेलेत, पण काय रं काही खास काम?”

चौघांनीही मालकीनला खामदच्यातल्या जुगाराबद्दल सांगितलं. मालकीन मनातच हसली.

“एवढं घाबरता व्हयं. मी समजाविन त्यांना. पण ह्यापुढं असले धंदे सोडून द्या म्हणजे झालं.”

“व्हय जी!”

सगळे माघारी फिरले होते. पाटलीनबाईला क्षमा मागून त्यांची भीती नाहिसी झाली होती. आणखी निघालेत खामदच्याकडे, जुगार न खेळण्याचा संकल्प करीत.

सूर्य अस्ताला जाणार होता. गायीवासरं रानातून यायची वेळ झाली होती. शाळेचीही सुट्टी झाली होती. लहान मुले उड्या मारत घराकडे पळत होती. आबा खामदच्याकडुन सरळ शाळेतच गेला होता. दोनच मास्तर होती तिथल्या शाळेत. वीस-पंचेविस मुलं शिकायची तिथं. आबा मास्तर सोबत परत येत होते. त्यांचं लक्ष बयरीच्या घराकडे गेलं. बयरीची व मन्याढोकाचीही आठवण झाली त्यांना. आबा मास्तरासोबत बोलत-बोलत तसेच निघाले. मास्तरांनाही त्यांच्या मनात तरंगणाऱ्या आठवणीची कल्पना नव्हतीच. मास्तर आपल्या घराकडे निघून गेले. आबा हातात धोतराचा शेला पकडून सगळीकडे चौफेर नजर फिरवित घराकडे जात होते. दुरूनच कुणीतरी धावत येतांना दिसलं. पंधरा सोळा वर्षाचा मुलगा

धापा टाकीत येत होता. आबाचं लक्ष त्याच्याकडे होतं. खामदच्यात दुपारी जुगार खेळत असलेला तो मुलगा होता. आबासमोर येवून थांबला. त्याला काय सांगायचं होतं तेही तो धड सांगू शकला नसता.

“काय रं काय झालं? एवढं धापा का टाकतोस.”

"आबा, बयरी येत हाय जी. शिवारापर्यंत आलीया. सोबत महाग्या, खंड्या चौघंही हाय."

आबाला क्षणभर हर्ष झाला. बयरी चौघासोबतच येत होती. पाच-सात दिवसापासून खूप तपासलं तिला. कुठही पत्ता लागला नव्हता. आबा पावलं टाकीत घराकडं निघाले. पुढल्या तयारीसाठी.....

चौघेही आबादीत आली होती. सोबत बयरी व शिवा होता. सगळी आबादी बयरीकडं पाहू लागली. बयरी खाली मान घालून शिवा सोबत जात होती. आबादीचं लोक बयरी आली, बयरी आली म्हणून एकमेकास सांगू लागले. गावात दवंडी पिटली. आज रात्रो वट्ट्यावर सगळ्यांना बोलावणं होतं. बयरीनं ढोकाचा खुन का केला? आबादीसाठी एक कोडं होतं. एक वासनेत भरकटलेलं कोडं.

आबादीत सर्वत्र बयरीची चर्चा चालू होती. सगळीकडे बयरी, बयरी हेच शब्द गुंजत होते. मंगऱ्याची बयरी नव्हे! बयरी होती फक्त आबादीची. वट्ट्यावर आबा, गावातले चारपाच व्यक्ती नि मास्तर बसले होते. सगळा गाव जमा झाला होता. बयरीला पाहायला. शिवाही बयरीसोबत होता. समधं गाव आबाच्या न्यायदान पद्धतीला पाहणार होतं. समध्याचं लक्ष आबाकडे होतं. आबानं बयरीला विचारलं.

"ही अंगठी तुझीच आहे ना!"

बयरी घाबरली तिचं काळीज धकधक करत होतं. तिच्या अंगाला थरकाप सुटला होता. सगळी आबादी तिच्याकडे पाहात होती. तिच्या तोंडून शब्दही फुटत नव्हता. शिवा तिला आधार देत होता. बयरी काहीही बोलली नाही. आबाचा राग चढला असता एवढ्यात शिवाच बोलला.

“व्हय जी, ती बयरीचीच अंगठी व्हय.”

“मग मन्या ढोकाला बयरीनच मारलं म्हणावं.”

बयरीला जोराचा हुंदका आला होता.

“नाय जी म्या खून नाय केला, ढोकानच माही अब्रू लुटली.”

बयरी रडत होती. तिच्याने बोलनंही होत नव्हतं. मन्याढोकाची बायको, मुले वट्ट्याच्या बाजुला बसली होती. आबाकडे एकसारखी पाहात. मन्याच्या बायकोला बयरीला बघून राग आला होता. बयरीचं तोंडही पाहायची ईच्छा नव्हती. तीचं अंतरंग तडफडत होतं. बयरीने संपूर्ण कर्मकहाणी ऐकवली. मन्याढोकाची वासना, भाजी विखुरलेली होती, ऊन चढत होतं, तिच्या हृदयाची थरकाप, जीव वाचवण्यासाठी फोडलेला हंबरडा, मन्याचं हसणं, दिलाची राणी, खाटेचा किचकिच आवाज, वाहलेलं रक्त, बयरी रडायला लागली.

सर्व गावकरी तिची कर्मकहाणी ऐकत होते. सर्वकाही शांत-शांत होतं. आबादीत अंधार पडला होता. दिव्याला साक्षी ठेवून बयरीनं सर्व कर्मकहाणी सांगितली होती. आबा, मास्तर आणि इतर आपसात विचार करीत होते.

सर्व गावकऱ्याचं लक्ष आबाकडं लागलं होतं. बयरी आबाकडं शांत मुद्रेनं पाहात होती. निस्तेज चेहऱ्यानं आबाच्या शब्दाची वाट पहात होती. आबाने फक्त न्याय द्यावं. आबादीनं पाळावं अशीच रीत होती. आबानं विचारविमर्श केला. सगळ्याचं एकमत झालं असावं. खटल्याची सुनावणी होणार... बयरीच्या अंगातून रक्ताच्या धाराप्रमाणं चरचर घाम जात होता. पण ती डगमगली नाही. तिचं या जगात कुणीही नव्हतं. मंगऱ्याही सोडून गेला होता. मरणाअगोदर क्षणभर मंगऱ्याची आठवण तरी झाली. मंगऱ्याला भेटायला जावं लागणार. जणू तो तिची वाट पहात होता. स्वर्गात सात जन्माची जोडी शोभली असती. मंगऱ्यासोबत लग्न झालं तेव्हा, माहेरच्या वडाला तीन प्रदक्षिणा मारून आशीर्वाद घेतला होता. आजही येतानां वडाला तीन फेऱ्या मारल्या होत्या. मंगऱ्याच्या भेटीसाठी... पण तीचं मन थबकलं. क्षणभर विचार आला. ती

मंगऱ्याची पवित्र बनी, मंगऱ्या स्वीकारणार का तिला? ती अपवित्र झाली होती. ढोकाच्या वासनेची बळी बनलेली बयरी, माझा मंगऱ्या मला स्वीकारेल, क्षणभर तिच्या मनाला आधार मिळाला. मंगऱ्याने तिला मरतांना शपथ दिली होती.

"तू मला विसरू नगस बने,"

बयरी स्वतःच्या क्षणभंगुर जीवनात तल्लीन झाली होती. तिला कशाचही भान राहिलं नव्हतं. अचानक आबा उभा झाला. बयरीचं स्वप्नं भंगलं होतं आबा बोलणार होता. बयरीचे डोळे पाणावले होते.

"दुपारला खामदचात कोण रं जुगार खेळत होतं?" आबानं विषयांतर केलं होतं. सगळी आबादी त्यांच्याकडं पाहू लागली. आबादीतले सगळे लोक त्यांच्यासमोर बसले होते. जुगार खेळणारे चौघही त्यांच्याकडे मागून चालत येत होते. त्यांना कल्पनाही नव्हती. वट्ट्यावर यावेळेस बोलावणार म्हणून. त्यांची घाबरगुंडी उडाली. आबाच्या शब्दाला जागायचं एवढच मान होता. आबासमोर येवून चौघही खाली मान घालून उभी झाली. जणू चौघही अपराधी होते, यांनीच बयरीवर अत्याचार केला होता. ढोकाला मारण्यातही यांचाच हात असावा.

"काय रं पोरांनो मघाशी काय करत होता?"

"आबा, माफ करा आम्हाला. आम्ही घरी माफी मागायला आलतो जी, पण तुम्ही नव्हते."

चौघही घाबरले होते. त्यांच्यातील एकाने वट्ट्यावर येवून पाय पकडले. रडू लागला तो. सगळी आबादी त्यांच्याकडे पाहात होती. आबाने त्याला हाताने वर उचललं.

"मी तुम्हाला काय शिक्षा देणार रं पोरांनो! अरे, तुमचं तुम्हीच पाहायचं. मी तुम्हाला याकरीता बोलावलं नाही. जुगार खेळणारं गुंड समजतात. पण तुम्ही तसे नाहीत स्वतःच्या बरबादीची जाणिव ठेवा म्हणजे झालं?"

आबा आज मुलांशी विचित्रच बोलत होता. आबादीच्या लोकांना ह्यातील गूढ समजलच नाही. जेवणाची वेळ होत होती. खूप उशीर झाला होता.

"सांगा रं पोरांनो, ह्या बयरीला कोणती शिक्षा द्यायची?"

सगळे लोक आबाकडे पाहात होते. आबा आज पहिल्यांदाच दुसऱ्यांना शिक्षा द्यायला लावित होता. चौघामधून कुणीही बोलला नाही. आपणही केलेल्या अपराधाची जाणीव त्यांना होती. सगळं कसं शांत होतं.

"तुम्हा लोकांमधनं कुणीतरी सांगा हं!"

सगळी आबादी शांत होती. कुणीही बोलायला तयार नव्हते. सगळे आबाकडे पाहातच राहिले.

मन्याढोकाची बायकोही बयरीकडे पाहातच राहिली. तिच्याकडं आबाचं लक्ष गेलं. तिच्या कपाळाला कुंकू नव्हतं. याला दोषी कोण असावा? आबा क्षणभर विचार करीत बोलले.

"जने तुच सांग या बयरीचा न्याय. कोणती शिक्षा द्यायची हिला. तुझ्या नवऱ्याचा खून केला हिने, तुच शिक्षा द्यावस."

ढोकाची बायको जनी उभी झाली. आबाकडं पाहू लागली. मन्याच्या आठवणीने हिरमुसली होती. काहीतरी बोलायचं होतं. क्षणभर बयरीकडे पाहिलं. तिचंही बयरीच्या कपाळाकडे लक्ष गेलं. तिलाही कुंकू नव्हतं, विधवा होती ती. तरीही त्या बनीवर मन्यानं जीव टाकला होता. जनीची थोडीशी हिंमत वाढली. आबाकडं बघू लागली.

"आबा बयरीला सोडून द्या, तिचा काहीही दोष नाही."

जनीकडे पाहून कसे सर्व आश्चर्यचकीत झाले. बयरी, शिवाही जनीकडे पाहू लागले. ती आबाच्या मनातलं बोलली होती. बयरीचा काहीही दोष नव्हता.

“जनी माह्यं मनातलं बोलली. बयरी विधवा आहे. विधवेला असं छळणं, तिच्यावर अत्याचार करणं, मला मात्र पटत नाही. मन्या ढोकानं मात्र पाप केलं. त्या पापाची शिक्षा त्याला मिळाली. पण ह्या बयरीची अब्रू कोणी वापस देणार का रं? बयरीची अब्रू वापस भेटत असल तर बयरीला शिक्षा मिळालीच पाहिजे.”

आबा आबादीसमोर रोखठोक बोलत होते. सगळी आबादी त्यांच्यासमोर पाहातच राहिली. बयरीची अब्रू गेली होती. तोंड दाखवायला जागाही राहिली नव्हती. थोड्यावेळापूर्वी मंगऱ्याकडे जाण्याचा विचारही धुळीस मिळाला होता. नवीन वाटा, नव्या दिशा, अंधार वाढतच चालला होता. नवा सूर्य उगवणार होता. बयरीच्या जीवनाचा.... सगळी आबादी घराकडे जावू लागली. बयरीला धरून शिवा उभा होता. शिवाच्या डोळ्यात अश्रू आलेत. बयरी शिवा, आबाकडे पाहातच राहिली. आबा, मास्तर चारपाच पंच वट्ट्यापासून घराकडं जात होती. जनीही आपल्या पोरांना घराकडं घेवून निघाली. बयरीचं लक्ष तिच्या लहान मुलाकडं होतं.

ooo

# ६

आबादीवर काळ्या-काळ्या ढगांची सावली पडू लागली. आबादीच्या नजरा वरच्या दिशेने लागल्या. मागील वर्षी सगळं पीक-पाणी बराबर झालं होतं. आबादीची नदी आपली कूस केव्हा भरणार ह्याच नादात असावी. आठपंधरा दिवसात दोन-तिनदा पावसाच्या सरी कोसळल्या होत्या. मातीची आग शांत झाली होती.

जमिनीने स्वतःला भेगा पाडून आपल्यातच वैर केलं असावं पण ते वैर नष्ट झालं होतं. भेगा मिटल्या. आबादीची नांगरं, वखरं काळ्या ढेकलांना फोडीत होती. पेरणी सुरू झाली होती. कुणालाही क्षणभराची उसंत नव्हती. आबादीचं शिवार हिरवंगार दिसू लागलं. उन्हाळ्याच्या आगीने कमजोर झालेली गायीवासरं हिरव्यागार गवतानं फुलून दिसू लागले. आबादीजवळ असलेलं डोंगर हिरवंगार पानाफुलांनी बहरलं होतं. करकांना पालवी फुटली होती. एक- एक दिवस जात होता. जवळपास महिना उलटला होता. गरीब शेतकरी आबाकडं हंगामास पैसे मागायला जात होती. आबा सर्वतोपरी त्यांना मदत करायचा. हंगाम निघालं की पैसे परत करायचे. नदी भरून वाहू लागली. हंगाम फायद्याचं होणार म्हणून आबादी कशी नखऱ्याने डौलात उभी होती.

बयरी आबादीतच राहू लागली. आबादीनं तिच्यावर उपकार केलेत. काबाडकष्ट करून पोट भरू लागली. झालं गेलं विसरून नव्या जीवनाला सुरवात केली. आबादी जशी नखऱ्यानं डौलात उभी राहिली तसीच बयरीही खंबीरपणे खंबीरपणे जीवनाशी झुंज द्यायला तयार होती. शिवा तिचा चुलता त्या दिवसानंतर निघून गेला होता.

आबादीची रोवणी झाली. आबादी नाचणार गाणार होती. शेतकऱ्यांचा सण आला. सगळे पोळ्याची वाट पाहू लागले. दोन, चार दिवस बाकी होते. नक्षत्राचं

एकमेकावर आगमन होणार होतं. पाऊस थांबला होता. नदी दुथडी भरून वाहात होती. तालुक्याच्या बाजाराला जायची तयारी चालू झाली. पैसा अडका जमा करून पोळा साजरा होणार होता. सगळी आबादी पोळ्याच्या उषःकालाला समोर जाणार. आबादी रात्रो स्वप्नात गुंग होती. दरवर्षी पेक्षा यावर्षी पाऊस चांगला झाला होता. पीक भरपूर येणार असच सर्वांना वाटायचं. वरूणाची कृपा आबादीवर होती. नखऱ्यानं डोलणाऱ्या आबादीला कुणाची तरी नजर लागली असावी. विजेचा कडकडाट, टपोऱ्या थेंबाच्या धारा, वादळ पाऊस सुरू झाला होता. सगळीकडे पावसानं थैमान घातलं होतं.

सकाळचा सूर्य आज उगवलाच नव्हता. सगळं आकाश काळं-काळं होतं. मुसळधार पाऊस सुरूच राहिला. आज आनंदाचा दिवस असाच वाया गेला. कुणीही घराच्या बाहेर निघाले नाहीत. काल बैलांना दिलेलं आमंत्रण तसच राहिलं. सगळी आबादी घरात दडून बसली होती. कोल्ह्या, मांजरानं दडून बसावं तसं. पावसाची गरज नव्हतीच. पावसाची रिपरिप तसीच सुरू राहिली. शेतावरणं पाणी वाहू लागलं. सगळीकडे समुद्रासारखा अथांग सागर तयार झाला. आबादी उंचावर असल्यानं गावात पाणी यायला धीर मिळाला.

चार-पाच दिवसापासून पाणी सुरूच होता. गायीवासरंही गोठ्यात तसेच बसून होते. दोन चार शेतकरी खामद्यात येवून पावसाबद्दल बोलू लागले. आबालाही चिंता लागली. सगळं पीक वाहून जाणार होतं. कुणीही शेतकरी शेताकडं फिरकून पाहत नव्हते. पाच दिवस आकाशातील ढगांना पाहूनच जगण्यात गेले. पीक गेलं तर उपासमारीची पाळी येणार होती. पुढल्या वर्षाची सगळ्यांना चिंता लागली होती.

आज पावसाची रिपरिप थांबली होती. शेतातलं अर्धअधिक पीक वाहून गेलं होतं. आबादीची चिंता आणखी वाढली. उन्हाळ्यात शेकारलेल्या झोपड्यांही ह्या पावसाने गळल्या. आबादीच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. नखऱ्यानं डोलणाऱ्या आबादीला ग्रहण लागलं होतं. सगळीकडे चिंतेचं सावट पसरलं. चारपाच दिवस घरातल्या घरात दडलेली आबादी खुलून दिसायला लागली. सूर्याची किरणं निघाली. आबादीत धुतल्याप्रमाणं नवतेज पसरला होता.

आबादीची शाळाही बंद राहिली. कुणीही तिकडे ढुंकून पाहिलं नाही. रस्त्यावर तर गावातल्या कुत्र्याचाही अभाव होता. उरलंसुरलं खावून जगावं यावरच आबादीचं समाधान होतं. आबा प्रत्येकाला धीर देत राहिला. प्रत्येकाला भेटून चौकशी करायचा. आबाच्या डोळ्यात आबादीला पाहून अश्रू गळत होते.

बयरीनं आबाच्या मदतीनं घर शेकारलं. सतत झालेल्या पावसानं तिच्या झोपडीची नासाडी झाली होती. सगळं पीक वाया गेलं होतं. गावात काम मिळणं कठीण झालं होतं. बयरीलाही काम मिळत नव्हतं. बयरी आबाकडं भेटायला गेली. पाटलीनबाईला कामात मदत करणारी बाई पाहिजे होती. बयरी आबाच्या घरी घरकाम करू लागली. तिची समस्या सुटली होती. आबाच्या इथं जेवण खावण सुरू झालं होतं. तिला मंगऱ्याची कधी-कधी आठवण यायची. कधी रात्रच्या रात्र जागायची. स्वतःवर झालेल्या अन्यायाची आठवण करीत. मन्या ढोकाचा चेहरा तिच्या नजरेसमोर यायचा. आज तिची तब्येत योग्य नव्हती. शरीर कमजोर झाल्यासारखं वाटत होतं. ती आज आबाकडे काम करायला गेली नाही. रंग्या तिला बोलवायला आला. बयरीला आवाज देणार, इतक्यात तोच घाबरला. त्याचा स्वतःवर विश्वास बसत नव्हता. बयरी उलट्या करीत होती. रंग्याला पाहून ती सावध झाली. रंग्यानं तिला आबाचा निरोप कळविला. मागल्या पायानं तसाच परत गेला.

बयरीचं मन घाबरत होतं. बयरीला काही सुचेनासं झालं. बयरीला दिवस गेले होते. मन्या ढोकाचा चेहरा तिला दिसू लागला. मन्याचं बाळ जन्माला येणार होतं. काय करावं नि काय करू नये? बयरीला प्रश्न पडला. स्वतःच्या जीवनातील दारिद्र्याचा, जन्मापासून दारिद्र्यातच वाढलेली बनी, मंगऱ्याची मांगल्यमूर्ती ठरलेली बनी....., खूप इच्छा अधुऱ्याच होत्या. बयरीची कहाणी अधुरीच राहिली. दुःखाचा डोंगर पार पाडायला निघाली. परंतु तिच्या दुःखाचा अंतः होवू शकला नाही. आबादीने सावरलं एवढच तिचं

सुख. पण वासनेची छाप पडली. ढोकाने इच्छातृप्ती करून वैकुंठ गाठला. खूप सुखी झाला होता तो. दारिद्र्यात लोळणाऱ्या पण रूपानं राणी असणाऱ्या एका बयरीला स्पर्श करू शकला होता. बयरीच्या अंतरंगातील हृदयाची टिकटिक वाढली. ढोकाचं हसणं तिच्या हृदयासमोर तरळत राहिलं. एक स्वप्नं अपुरं राहिलं. मंगऱ्याचं.... बयरीची कूस भरावी, खूप इच्छा होती त्याची, पण मंगऱ्या अधुराच राहिला होता.

"बने, तू दुसरं लग्नं करशिल.... बने, तुझी कूस भरल बने..., तुले जगण्याचा आधार भेटलं."

मंगऱ्या मरतेवेळी बनीला समजावित होता. त्याचं भाकीत खरं ठरलं होतं. बयरीचं लग्नं झालं होतं. ढोकाशी... बनीला मुलगा होणार... पण बापाचं नाव काय? 'मंगऱ्या की मन्या' क्षणभर विचारात गुंतली. पूर्वीच्या आठवणी मनात दाटून येत होत्या. क्षणभर बयरीला आनंद झाला. 'मुलगा होणार, माझा मुलगा, माह्या जगण्याचा आधार.'

बयरी वेगळ्याच विचारात गुंतली होती. 'पण आबादीचं काय? आबादी स्विकारेल काय? पापाचं पातक म्हणून दूर तर सारणार नाही, नाही! असं होणार नाही. ढोक मेल्यावरही मला सावरलं ह्या आबादीनं... जीवनदान दिलं. तिच आबादी माझ्यापासून दूर जाईल. आबा, आपल्या पाठिशी उभे आहेत तोपावेतो तरी...'

बयरीला आबाच्या निरोपाची आठवण झाली. तोंडावरणं पाणी घेतलं. कुणालाही शंका येणार नाही अशा पद्धतीनं विखुरलेल्या केसांचा अंबाडा बांधला. डोक्यावर पदर घेवून निघाली. वाटेत विचार करीत ती आबाकडे जात होती. मन उदास होतं. शरीर कमजोर झाल्यासारखं वाटत होतं.

"आबाला सारं काही सांगावं....नाही! आबाला काय सांगणार, पाटलीनबाईला सगळं खरं खरं सांगावं?" असाच विचार करीत ती गेली.

आबा वऱ्हांड्यासमोरील फुलझाडांना पाणी देत होते. नव्या रोपट्यांनी जन्म घेतला होता. पण फुले यायची होती. आबा त्या झाडाची सेवा करीत होते. किती प्रेम

होतं झाडावर? बयरीनं आबाकडे नजर टाकली. बयरीला स्वतःच्या उदरात वाढणाऱ्या अंकुराची आठवण झाली. आबाकडे कानाडोळा करीत घरात शिरली. स्वतःचं घर असल्याप्रमाणं.....

पाटलीनबाई साफसफाई करीत होती. बयरीकडे त्यांचं लक्ष गेलं. तिचा उदास चेहरा पाहून ती म्हणाली.

“बने, तब्येत चांगली नाही वाटत? आजच्या दिस पडून राहिली असतीस. तसं काही कामही नव्हतं.”

बयरी पाटलीनबाईच्या हातची झाडू घेवून झाडू लागली.

“तब्येत बी चांगली हाय पण....”

“पण काय गं?”

“एक गोष्ट सांगायची होती.”

“कणची.”

“मला...म..ला... दिवस... गेलेत.” मन घट्ट करीत ती बोलली.

पाटलीनबाईला धक्का बसला. काय बोलावं तिला सुचेना. बयरीनं सगळं काही एका झटक्यात सांगून टाकलं होतं. पाटलीन तिच्याकडं एकसारखी पाहातच राहिली होती. बनीला रडू कोसळले. हातातलं झाडणं बाजुला ठेवून पाटलीनबाईला जावून चिपकली. तिचा मायेचा हात बयरीवर फिरत होता. आणखी आधार मिळाला होता.

“काय होणार गं तुझं, तुझं नशीबच मेलं फुटकं बया....”

पाटलीनबाईला रडू यायला लागले. पण बयरीला तसं भासही होवू दिला नाही. पाटलीनने आबाला सांगितलं. सगळी आबादी बयरीकडे पाहू लागली. बयरीला दिवस गेलेत. मन्या ढोकाला बयरीने मारलं होतं. पण त्याचा आत्मा बयरीच्या उदरातून

अंकुररूपी वाढतच राहिला. मन्याची बायको बयरीसोबत कधी बोलत नव्हती. नवऱ्याची वासना किती भरकटली होती याची प्रचिती तिला आली. आबाला बयरीची काळजी वाटू लागली. आबादीतले काही मुलं बयरीला चिडवू लागले. एक एक दिवस जात होता. बयरीचं पोट वाढू लागलं. ती कमजोर होत गेली. चिंतेचं सावट पसरलं होतं. आबाच्या घरचं काम सुरूच होतं. कठीण काम तिला करावेही लागत नव्हते. बयरीला रात्रभर झोप येत नव्हती. स्वतःच्या उदराकडं पाहून स्वतःच्या नशीबावर रडू आलं. पण मंगऱ्याचं अधुर स्वप्नं.... तिचा वंशज चालवणारा दिवा उद्याला उद्यास येणार.... क्षणभर ती हसली. थोड्यावेळापूर्वीचं दुःख विसरून स्वप्नाच्या विश्वात तरंगू लागली. सगळी आबादी बयरीकडं कुतूहलानं पाहायची. बयरीला ही आबादी सोडून जावं वाटे पण तिचे नातलग कुणीही उरले नव्हते. माहेरला फक्त शिवा होता. तोही मानलेला चुलता. आता तिचं जीवनच आबादीच्या आबाशी जुडलेलं होतं.

आज सकाळीच बयरीला जाग आली. आपल्या घरची सर्व कामे आटोपून आबाच्या घराकडं निघाली. गायी वासरं रानात जायला निघाली होती. वासरांचा गायीनां पाहून हंबरडा फुटला. गायकी 'गाय सोडा' हंबरडा फोडू लागला. महाग्याचा मुलगा गायी हाकलत आला. त्याचं बयरीकडं लक्ष गेलं. बयरीकडं पाहुन तिच्या सौंदर्याची त्याला जाणीव झाली. खूप दिवसांनी त्यानं तिला पाहिलं होतं. सारखं रानात जाणं हेच त्याचं काम होतं. बयरी त्याच्या जवळून जाणार तेवढ्यात त्यानं बयरीला आवाज दिला.

"ये बयरे....."

बयरीचं लक्ष विचलित झालं. क्षणभर ती फिरून पाहू लागली.

"हे कुण्या गं रानटी माणसाचं......"

बयरीला त्याचा राग आला. पण बयरी काहीही बोलली नाही. सरळ निघून गेली. बयरीला स्वतःची चिड येवू लागली. स्वतः केलेल्या पापाची. महाग्याचा मुलगा

हसत हसत गेला. एका गायीला त्यानं पाठीत जोरदार दणका मारला. गाय पुढं पळाली. ‘गाय सोडा...’ हंबरडा फोडला, हातात शिदोरी घेवून तसाच निघून गेला.

आबा तालुक्याला जायच्या तयारीत होते. पायात चप्पल घातली. खांद्यावर लांब दुपट्टा ठेवित पहिल्या पायरीवर पाय ठेवताच बयरी आली. बयरी रडत होती. तिने आबाच्या पायावर डोकं ठेवलं. बयरी तशीच रडत राहिली. आबाला क्षणभर काहीही समजलं नाही. पाटलीनबाई तुळशिची पूजा आटोपून आत येत होती. आबानी तिला दोन्ही हातानी उचललं.

“काय घडलं गं असं रडायला?” आबा हळूच समजावित म्हणाला.

“झालं गेलं विसरून जा बने, रडून काय फायदा? नशीबात असतं तेच घडतं. पण तू आज एवढी का रडतेस.” पाटलीनबाई दुरूनच बनीला विचारीत होती.

आबानं तिला आजही आधार दिलं होतं. बनी महाग्याच्या पोराची घडलेली गोष्ट सांगू लागली. सगळी आबादी तिला टोमणं मारायची. आबाला थोडंफार माहीत होतं. पण आज तिला चिडवायची हिंमत केली होती. पाटलीनबाई तिला घरात घेवून गेली. आबाचा राग अनावर झाला. आबा तसाच रागात तालुक्याला निघून गेला. पायातली चप्पल आबाच्या पायाला किड्यामुंग्यानी चावावं तशी चावतच राहिली होती.

बयरी आबाच्या घरी दिवसभर होती. नदीवर कपडे धुवायलाही गेली नाही. सारखा रडण्यातच दिवस गेला. सूर्य मावळला होता. अंधार पडत आला. आबा अजून आले नव्हते. आज खूपच उशीर झाला होता. एवढा उशीर तालुक्याला गेल्यावर कधीच होत नव्हता. कधी मुक्काम करावं लागलं तर सांगून जायचे. घरचे गायी वासरही जंगलातुन परतले होते. दिवे लागणीची वेळ झाली होती. रंग्या सर्व कामे आटोपून घराकडे निघाला. पाटलीनबाईनं त्याला आवाज दिलं. रंग्या मालकीनकडे आला.

“रंग्या, मालक नाही आले रे!”

"येतील की इतक्यात, गावला गेले नं गवार झाले."

"पण एवढं उशीर...."

"हं! घ्या , नाव घ्यावं नं मालक यावं."

मालक आले म्हटल्याबरोबर पाटलीनबाईला धीर आला. आबा झपझप पावले टाकीत हातात धोतराचा शेला पकडून येत होते. चेहऱ्यावर विशिष्ट काळजी, कसल्यातरी विचारात गुंतल्यासारखे भासत होते.

"मालक सगळी काम झालं जी, म्या घराकडं जावून राहिलो."

रंग्या मालकाला म्हणाला, आबानं त्याच्याकडं लक्ष दिलं.

"रंग्या, तिथली कुऱ्हाड घे, लवकर आण, आणं चल माझ्याबरोबर."

आबाला खूप राग आला असावा. रंग्या आबाकडं पाहातच राहिला.

"रंग्या, चल लवकर."

आबानं खांद्यावरचा दुपट्टा काढून घेतला. पाटलीनबाई त्यांच्याकडं पाहातच राहिली. काहीतरी घडलं म्हणून तिचं मन थरथर कापायला लागलं.

"अहो, पण असे एकाएकी......."

"बायकानं मधात बडबड करू नये, तुम्ही आपली काम करा."

आबाचा राग वाढतच चालला होता. पाटलीनने खालती मान घातली. आबा झपाझप पावले टाकीत जावू लागले. रंग्या कुऱ्हाड घेवून आला. आबाच्या हातात दांडा दिला. पाटलीनबाईला काहीतरी विपरीत घडल्याचं मनात आलं. आबा पहिल्यांदाच असे रागावले होते. आबाला कधी एवढा राग येत नसायचा. पण

अचानक त्यांच्यात आज खूपच बदल झाला होता. पाटलीनबाई आबाकडे पाहातच राहिली. आबाच्या मागोमाग खांद्यावर कुऱ्हाड घेवून रंग्या चालत राहिला.

०००

"राम्या आरं बाहेर ये!"

राम्या घरात बसून बैलाचे कासरे विणत बसला होता. कुणाचा तरी आवाज ऐकून राम्या बाहेर आला. त्याच्या मागोमाग त्याचा बापही आला.

"कोण व्हय रं? का असं ओरडून राहिलास?"

राम्या बाहेर आला. बाहेर अंधार पडला होता. समोरील व्यक्ती कोण असावं त्याला दिसलच नाही. त्याची नजर आबावर गेली. राम्याचा चेहरा हिरमुसला. आबाला वेडावाकडा बोलला होता.

"आबा, तुम्ही! एवढया रात्रीला काय काम काढलजी? आम्हाला बोलावलं असतं म्हणजे झालं."

"राम्या माजलास का रं? गावातली गायढोरं राखून तुझ्याबी तोंडात शेण गेलं?"

आबाचा चेहरा भडकला होता. महाग्या राम्याचा बाप धावतच आबाकड गेला. आबाच्या पाया पडू लागला.

"आबा, काय चूक केली जी या पोरानं? माफ करा आबा, ह्या चपलेनं मारा मला ... आबा."

महाग्या आबाचे पाय धरून रडू लागला. आबाचा राग त्यानेही पहिल्यांदाच पाहिला होता. राम्याला धडकी भरली. महाग्याही थरथर कापू लागला. आबाचा करडा आवाज ऐकून घराजवळचे सगळे लोक जमा झाले. आबाने महाग्याला लाथेने दूर सारलं.

“दूर हो महाग्या... आज सोडणार नाय ह्याला. वाघानं गायीचा घोट घ्यावा तसा घोट घेणार हाय मी याच्या रक्ताचा.”

आबा जोरात राम्यावर धावून गेला. महाग्या लाथेनं बाजुला पडला होता. आबानं राम्याच्या पाठीवर ताकदभर काठी घातली होती. काठीचे दोन तुकडे झालेत. आबाच्या हातात लहानशी काठी राहिली होती. राम्याला जोरात काठी बसली तसाच खाली पडला. राम्या रडू लागला. आबानं एकावर एक दोन चार काठ्या पाठीवर हाणल्या. आबाचा चेहरा लालभडक बनला होता. समधी आबादी महाग्याच्या घरी उलटली. आबानं राम्याचा कपडा हातात धरला. खिचता-खिचत आबा खामदद्याकडे चालू लागला. मागोमाग खांद्यावर कुऱ्हाड घेवून रंग्या येत होता. सगळी आबादी आबाकडे पाहू लागली. काय झालं होतं कुणालाही कळलं नाही. सगळे एकमेकाच्या तोंडाकडे पाहू लागले. आबानं राम्याला खामदद्याजवळ ओढत आणलं. राम्याच्या कंबरेवर जोरानं लाथ मारली. राम्या रडतच राहिला. राम्या खामदद्याच्या दरवाज्यात पडला होता. महाग्या आबाच्या पाया पडत होता. महाग्याची बायको धावत आली. आबाचे पाय पकडून रडू लागली.

“आबा, सोडा जी माह्या राम्याला. काय गुन्हा केला जी त्यानं?”

आबा रागाने लालबुंद झाला होता. आबाच्या चेहऱ्यावर घाम आला होता.

“महाग्या बाजुला व्हयं आनं आपल्या बायकोलाही बाजुला कर, नाहीतर तुमचेही मुडदे पडतील इथं.”

आबानं दोघांनाही झटका दिला, दोघही बाजुला पडली होती. सगळी आबादी कावळ्याप्रमाणं कावकाव, चिवचिव करीत होती. पण कुणाचीही हिंमत आबाला अडवण्याची झाली नाही.

“रंग्या दे रे कुऱ्हाड इकडे, याचं धड कापून ह्या आबादीच्या खामदद्याला लटकवतो म्हणजे समजल ह्या आबादीला.”

रंग्यानं मुकाटपणे आबाच्या हातात कुऱ्हाड दिली. सगळी आबादी क्षणभर कापली. आबानं कुऱ्हाड उचलली. राम्या एकसारखं कुऱ्हाडीकडे पाहून रडत होता.

“नाय...आबा... नाय... मला मारू नका.. आबा मी काय गुन्हा केला?”

आबाने हवेच्या झोकात कुऱ्हाड उचलली. राम्याचं क्षणभर अंग शहारलं. आबादीच्या डोळ्याचे पारणे फिटले. आबाने ताकदभर हवेच्या झोकातून राम्यावर कुऱ्हाड सोडली. रंग्यानं क्षणभर डोळे बंद केले. आबाला कशाचेही भान उरले नव्हते. राम्याचे मायबाप क्षणभर एकसारखे पाहातच राहिले. आबाच्या हातून कुऱ्हाडसुटली होती. आबा भानावर आला. पाटलीनबाईनं आबाचं हात पकडलं होतं. आबाचं लक्ष पाटलीनकडे गेलं. रंग्यानं हळूच कुऱ्हाड उचलून घेतली होती. आबाला स्वतःच्या उग्रतेची जाणीव झाली होती.

“राम्या लक्षात ठेव, आजपासून त्या बयरीला काही म्हणलास तर!”

राम्याला स्वतःची चूक कळली होती. रानात जातांना बयरीला टोमना मारला मारला होता. एवढ्याशा कारणाची खूप मोठी सजा मिळाली होती.

“आणं, ह्या आबादीतल्या सर्वांना सांगून ठेवतो ह्यापुढं बयरीला कुणी काही म्हटलं तर मुडदे पडतील इथं... मुडदे.”

आबा घराकडे झपझप पावले टाकीत निघाला. त्याच्या मागे पाटलीनबाई आणि रंग्या होता. सगळी आबादी आज प्रथमच आबाचा राग पाहात होती. कुणीही अडवलं नव्हतं आबाला. आबाचा धाक होता आबादीवर, समदयांना समजलं होतं राम्यानं बयरीला डिवचलं म्हणून, सगळे आपल्या घराकडे जावू लागली. कुणी जेवण करता करता उठून आले होते. काय झालं म्हणून पाहायला. महाग्या त्याची बायको राम्याला उचलून घराकडे निघून गेले. राम्याला खूप मारलं होतं. राम्याच्या डोळ्यात आबाचा चेहरा सलत होता. त्यानं केलेल्या चुकीचं फळ मिळालं होतं त्याला. राम्या उपाशीच झोपी गेला. मार खावून त्याचं पोट भरलं होतं. त्याची आई गरम कापडानं अंगं शेकून देत

होती. तो ‘आई आई’ म्हणून ओरडतच राहिला. महाग्या आपल्या पोराची लाल पाठ पाहातच राहिला. त्याच्या आईच्याही डोळ्यात अश्रू येत होते. राम्याच्या पाठीवरील जखमेवर अश्रूचे थेंब पडले होते. राम्याला जखमेची जाणीव झाली होती. ‘आई, आई… .’

ooo

आबा खाटेवर पडून राहिला. आबाचं मस्तक पेटलं होतं. आबाचा राग शांत झाला होता. आपणच केलेल्या चुकीची आबाला जाणीव झाली, खूप मारलं राम्याला, असं करायला नको होतं. पण..समजावलं असतं कदाचित रागावलं असतं तरी राम्याने माफी मागीतली असती. आबा विचार करीत तसाच पडून राहिला.

“पात्र वाढली आहे जी.” पाटलीनबाईने आबाला जवळ येवून सांगीतलं.

“मला भूक नाही तुम्ही खावून घ्या.”

आबानं हळूच म्हटलं होतं. आबाला पश्चाताप झाला होता.

“राम्या असाच झोपी गेला असेल. आपण तरी का म्हणून खावं?”

पाटलीनबाईच्या डोळ्यात अश्रू आले होते. वाघासारखा डरकाळी फोडणारा ज्याला समधी आबादी भीत होती तोच वाघ माजंरीसारखा म्याव-म्याव करत जणू रडत होता. स्वतःची चूक कबुल केली होती. पाटलीन घरात गेली. पाटलीनबाईलाही

रडू यायला लागले होते. आबाचं स्वभाव विशेष पाहून बयरीला कळलं होतं. आबानी राम्याला मारलं म्हणून सकाळी तिला राम्याचा खूप राग आला होता. आबाची स्थिती पाहून बयरीलाही रडू कोसळलं. पाटलीनबाईने बयरीला आबाकडं बोलावण्यासाठी पाठवलं. आबा डोळे लावून शांत मनानं झोपी गेले होते.

“आबा, आबा जी, …पात्र वाढलीय जी.”

आबानं डोळे उघडले. बयरीच्याच विचारात आबा गुंग होते. बयरीकडे पाहून त्यांच्या डोळ्यात पाणी आलं. बयरीला सगळं कळलं होतं. अनवानी पायाला बोचणारं ढेकूल पावसाच्या एका धारेने कसं मऊ मऊ होवून जातं अगदी तसच आबाचही झालं होतं. बयरी आबाजवळ जावून रडू लागली. आबा उठला होता. बयरीसाठी, बयरीला जगायचं होतं. तिच्या बाळासाठी, आबानं बयरीचा मायेनं हात पकडला.

"बने तू आजपासून इथचं राहायचीस कायमची."

"पण आबा... गावातलं काय म्हणतील जी."

"काय बी म्हणणार नाय बने, तुह्याकडे पाहल्यावर माझं काळीज तुटल्यासारखं वाटते, बने तू इथच राहशिल ना!"

बयरी रडत होती. आबानं तिला प्रेमानं बनी म्हटलं होतं. पाटलीनबाई दारातून दोघांचही प्रेम पाहातच राहिली.

"बने, तू माझी बहीण ना बने.... बहीण भावाच्याच घरी राहिल ना! चल बने जेवण कराया...."

आबानं बनीला हातात धरून नेलं. आज बयरी आबाची बहीण बनली होती.

०००



# ७

आबादीचं सगळं पीक गेलं होतं. थोडंफार जे काही उरलं त्यावरच आबादी समाधानाने एक एक दिवस पुढे ढकलायची. रोजगार करून कुटुंबाची खळगी भरणं तसच सुरू राहिलं. आबादीला आबाच्या स्वरूपाची ओळख झाली होती. राम्याला आबाने खूप मारलं तेव्हापासून बयरीला कुणीही चिडवित नव्हते. चारपाच दिवस राम्या खाटेवर तसाच पडून राहिला. गावातली गायढोरं रानात नेणं सोडलं होतं. सकाळी 'गाय सोडा' आवाज नवीन भासायचा. आबादी झालं गेलं विसरून आपल्या कामात गुंग राहायची. त्या दिवसापासून महाग्याही आबाकडे गेला नव्हता. राम्याच्या मनात आबाविषयी चिड निर्माण झाली. राम्याच्या मनात सैतान पेटून उठला होता. आबासोबत बंड करण्यासाठी, आबाशी झुंज देण्यासाठी.....

आबा गावाकडे विशेष लक्ष देत नव्हते. आबाचं तालुक्याला अधामधात जाणं येणं चालुच होतं. बयरी आबाकडे राहू लागली. आबाची मानलेली बहीण होती ती. आबाने बयरीची झोपडी रंग्याच्या हाताने मोडून काढली. तिथं मोठं मैदान झालं होतं. बयरी तिकडे कधी फिरकूनही पाहात नव्हती. बयरीचं पोट वाढू लागलं होतं. बयरीला कामे जमेनासी झाली. बयरी थोडंफार काम करायची. तिचे सुखी दिवस परत आले होते. आबाने तिला आधार दिलं होतं. आबाची सुरेखा बयरीच्या अंगाखांद्यावर खेळू लागली होती. आबा घरी असले की मौजमजा करण्यात, हसण्यात सारं कुटुंब दंग

व्हायचं. सुरेखाला बघताच बयरीला आपल्या होणाऱ्या बाळाची आठवण व्हायची. कधी कधी जुन्या आठवणी उफाळून आल्यावर हिरमुसायची. एक एक दिवस सुखात लोळत होते. आबादीला बयरीचा हेवा वाटू लागला. बयरीला आबादीनं जेवढं सावरलं त्यापेक्षाही आबा तिच्यासाठी परमेश्वर रूपी भाऊ बनून आला होता. बयरी आबाची फक्त बनी होती.

आबाला आज शाळेत बोलावणं आलं होतं. आबा मास्तरासोबत शाळेत बसले होते. दरवर्षी शाळेतल्या सगळ्या मुलांना आबा शाळेचे कपडे घ्यायचे. आबानी दिवस ठरवायचा होता. तालुक्याला कपडे बनवायला दिली होती. मास्तरानी आबाला त्याकरीताच बोलावलं होतं. चार दिवसानं कपडे शिवून मिळणार होती. शाळेचे काम उरकून आबा गावातनं फेरफटका मारत जात होते. खामदच्याकडे आबाचं लक्ष गेलं. खामदच्यात चारपाच मुलं ओरडत पत्ते खेळत होती. आबा आले म्हणून कुणालाही कळलं नाही. आबा त्या मुलाजवळ गेले तिथं राम्याही होता. पत्याचा जुगार सुरू होता.

“राम्या काय करून राहिलास?”

आबानं हलक्या स्वरात विचारलं होतं. सगळी पोर उठून बाजुला झालीत. सगळ्यांची मान खाली वाकली राम्याचा चेहरा लालबुंद झाला.

“तुम्ही कोण विचारणार?”

“का? तुझी मस्ती अजून गेली नाही वाटत.”

“माही मस्ती नाय गेली पण तुमची दादागिरी खपणार नाय माह्याजवळ.”

“तोंडावर तोंड देतोस व्हयं, खूप माजलास का रं!”

“आबा तोंड सांभाळून बोला. म्या आपल्या बापाचं उडवितो, तुम्ही कोण बोलणार.यारे... चला बसा.”

राम्या आणखी खाली बसला कुणीही त्याच्या जवळ गेला नाही.

"भिता काय रं या पाटलाला, पैका आहे म्हणून पाटील बनलाय. नाहीतर कुत्री बी विचारली नसती याला."

"राम्या विरोधात जातोस काय रं?"

"धाक पडलाय का तुमचा?"

"धाक नाही पण खूप महागात पडेल रे तुला."

"जा रं पाटला, पाहून घेईन तुला बी..."

आबा भडकले होते. आबाच्या चेहऱ्यावर राग आला होता. आबाच्या विरोधात बोलणारा तो पहिलाच व्यक्ती होता. राम्याच्या जवळचे सगळेच मित्र पळाले होते. तिथं जुगार खेळणाऱ्या पैकी कुणीही राहिला नाही. आबाने नमते घेतले. आबा पुढं जाण्यास पाऊल टाकू लागला.

"जाताय आबा, लक्षात ठेवा आजपासनं तुमचं नि आमचं काहीही नातं नाय. आम्ही काहीही करू, तुम्हाला बोलण्याचा अधिकार नाही. लोकांना लुबाडून जगता तुम्ही. माहीत नाय का आम्हाला? बयरीची जागा शेत हडपण्यासाठी बहीण माणलं तुम्ही."

"राम्या तोंड सांभाळ नाहीतर..."

राम्या आबावर चालून येत म्हणाला, "नाहीतर काय?"

आबाला भयंकर चिड आली. त्यादिवशी त्याच्यासमोर पाया पडणारा वाघ चवताळला होता. आबाने राम्याला पुढं येताच जोरात हात उगारलं होतं. तेव्हाच राम्याने आबाचा हात संपूर्ण ताकत लावून पकडला होता.

"आबा, असे बहुत झालेत. ह्यापुढं तुमचं माह्यासमोर तरी काही चालणार नाय. म्या होणार ह्या आबादीचा दादा, तुमच्या सारखं पाटील."

"पाटील बनतोस काय रं? मी कुठ अडवलं तुला..."

"हं! पैशाची तेवढी अडचण भासलीय."

"पैसा पाहिजे काय रं! म्या देईन तुला."

"मेहनत करून खाणारी माणसं आम्ही, हरामाच्या कमाईवर जगत नाय."

राम्या आबाला खूप काही टोचून बोलला होता. आबा चिडला होता. खामदद्यात एक म्हातारा बसला होता. म्हातारा काठीचा आधार घेत आबाकडे गेला.

"आबा पोराबाराच्या नादी लागून कुणाचं भलं झालं व्हयं!"

आबाचं लक्ष म्हाताऱ्याकडे गेलं. आबाला स्वतःची जाणीव झाली. एका रानटी माणसाशी आपण बोलत होतो. आबानं स्वतःहून माघार घेतली. आबा झपझप पावलं टाकीत घराकडे निघून गेलें. रामा चवताळलेल्या कुत्र्याप्रमाणं उभं राहून आबाकडे पाहातच राहिला.

आबा रागातच घरी आला. पाळण्यावर जावून बसला. बयरी वऱ्हाड्यांत भाजी खुडत होती.

"बने पाणि घे प्यायला."

आबा रागातच म्हणाले. तिथं ठेवलेल्या लांब दुपट्ट्यानं घाम पुसू लागले. आबाचे डोळे लालबुंद झाले होते. बयरी आबाकडे पाहू लागली. बयरीनं घरात जावून पाणी आणलं. आबानं घटाघटा पाणी पिलं. दारूच्या घोटाप्रमाणं पाणी नरड्यातून चरचर झोंबीत गेलं होतं. एकाच दमात ग्लासभर पाणी प्यायला होता. आबाकडं पाहून बयरीनं विचारलं.

"आबा, काय घडलं जी असं?"

"काही घडलं नाय, तो महाग्याचा पोर चवताळला व्हयं."

बयरी राम्याचे नाव घेताच घाबरली.

"आजही मारल्यात काय जी त्याला."

"मारलं नाय...पण."

बयरी आबाकडे एकसारखी पाहू लागली. आबाचा राग उफाळून येत होता. आबानं बयरीला सगळं सांगून टाकलं बयरीनं आबाला आधार दिला होता.

"पोरगा हाय तो त्याचं मनावर घ्याचं काय जी."

"होय बने, मनावर घेतल्यानं काय होणार? पण एका आंब्यानं दुसरा आंबा सडतोय त्याचं काय?"

बयरीला आबाविषयी चिंता वाटू लागली. आबाच्या मनात विचार येवू लागले. 'एका आंब्यानं....'

आबाला आपल्या मुलाची आठवण झाली. आबाचा मुलगा आंब्यावरनं पडून मेला होता. क्षणभर राग कमी झाला. मनात दुःखाची जाणीव झाली. बयरी आपल्या कामात गुंतली. आबाची सुरेखा 'आबा... आबा' करीत बनी ने खुडलेली भाजी फेकत होती. बनी भाजी जमा करू लागली. सुरेखा भाजी फेकायची, ती जमा करायची. आबाचं लक्ष तिच्याकडे गेलं. आबाचा राग गेला होता. आबा हसू लागले. बयरी आबाकडे पाहू लागली. सुरेखाही हसत होती. बयरीचे डोळे पानावले होते. बनीच्या डोळ्यातून थेंब पडलेत, बनीचे आनंदाश्रू.... आबानं दिलेल्या आधाराचे... बनीही मनातच हसू लागली. पाटलीनबाई घरातून आली तीला काही एक उमगलं नव्हतं. त्याच्याबरोबर तिही हसली. वेड्यासारखी.... सगळेच हसू लागले. सुरेखा आबा... आबा करीत भाजी फेकण्यात गुंग होती.

राम्यानं आबाच्या विरोधात बंड पुकारला होता. आबाच्या समोर बोलायची हिंमत करणारा युगपुरूष झाला होता. जणू जन्मोजन्मी गुलामगिरी भोगणारा आज गुलामगिरीशी झुंज द्यायला निघाला होता. पिंजऱ्यात बंदिस्त पोपट उडण्यासाठी ओरडत होता. बंदिस्त समाजाच्या बाहुपाशातून जणू तो पाखरू उडणार होता. राम्याला स्वतःची, आबादीची जाणीव राहिली नाही. आबा देवासमान माणूस आबादीत जन्मला जणू आबादीचे ऋण फेडण्यासाठी. आबाच्या वडीलांनी हुकूमशाही केली होती. पण आबानं मी धुवून काढली होती. आबादीला सावरण्याचा बहुमान आबालाच मिळायला हवा होता. पण आबादीनं काय दिलं? अवहेलनाच केली होती त्यांची.

समध्या आबादीत राम्याच्या कर्तृत्वाची छाप उमटली होती. जणू पराक्रम केला होता. महाग्याला ही गोष्ट कळली होती. महाग्यानं राम्याला समजावलं पण तो ऐकायला तयार नव्हता. संध्याकाळ झाली. आबादीचा सूर्यास्त झाला होता. आबादी पुन्हा पुन्हा अंधारमय जगाशी सामना करणार होती.

“ऐका हो ऐका... आज वट्ट्यावर समध्या आबादीनं जमा व्हावं हो.”

आबादीत ढोलावर नेहमी प्रमाणे हुकूम दिला जात होता. काहीतरी विपरीत घडणार होतं. गावकऱ्यांना समजलं होतं. राम्याच्या दुष्कृत्याबद्दल आबानं बोलावलं असावं. महाग्याच्या मनात चिंतेचे सावट सुरू झाले. आबाचा जवळचा सवंगडी राहिला होता महाग्या. आबानं फक्त काम सांगावं, महाग्यानं जी आबा म्हणत करावं. पंधरा दिवसापासून आबाला भेटायची बोलायची हिंमतही झाली नव्हती. महाग्या घरी बसून होता. महाग्याची बायको भाकरी भाजत होती. राम्याही तिथचं बसून होता. राम्याची आई राम्यास म्हणाली.

“आरं मुडद्या... असा बसलास का इथं? त्या देवासमान माणसाचं पाय धरण सोडून त्यानलेच शिवीगाळ केलस. नशीब रे मायं मेलं! ऐनवेळेस चटणीभाकरीला आबा पैसे पुरवायचा, विसरलास का रं आबाचं उपकार.”

"तू मले शहाणपण सांगू नगस. म्या होणार ह्या गावचा पाटील. लोकांचं लुटून पोट भरणाऱ्याला देव माणतस व्हयं."

राम्या आपल्या आईवर भडकला होता. महाग्या विचारात गुंतला. पुढं येणाऱ्या संकटाला कसं तोंड द्यावं म्हणून.

"काय भेटलं रं तुला आबाशी वैर करून."

"म्या कुठं केलं वैर, समध्या गावाच्या समोर मारलं तेव्हा कुठं गेला होता त्यांच्यातला देव."

"आरं बयरीला असं बोललास नसतास तर...!"

"बयरीला म्हणलं ना! त्याच्या बायकोला तं काही म्हणलं नाही. बयरीचं घेवून फिरणार तो कोण? ढोकाचं पोटचं पोर सांभाळून ह्या आबादीत फिरते, तेव्हा लाज नाही वाटली का तिला.'

"आरं तिचं नशीब म्हणूनच जगत हाय अशी."

"आबादीत जगणार नाही तर काय? पाटलाला दोन-दोन बायका करताच येतात नव्हं."

महाग्याला राम्याचा राग आला होता. महाग्यानं उठून राम्याच्या थोबाडात मारली होती. त्याची आई पोरगं बिघडला समजून रडू लागली होती.

"तू मारलस व्हयं मला, तू बी त्या आबाकडून निघालास."

"आरं ती बयरी आबाची माणलेली बहीन हाय. विसरलास का रं! त्यांच्या घरी राहते ती."

"हं! म्हणे माणलेली बहीण, दाखवायला असल."

"राम्या..."

महाग्या राम्यावर चिडला होता. राम्या उठून जावू लागला. राम्याची आई रडू लागली. तव्यावरची भाकरी करपली होती. तिचं भाकरीकडे लक्ष गेलं. सरोत्यानं भाकर पलटवली. भाकर जास्तच विस्तव झाल्यामुळं जळली होती. आपल्याही मुलाचं मन असच करपलं होतं भाकरीप्रमाणं.'

जेवणं खावणं आटपून वट्ट्यावर सगळी आबादी जमा झाली होती. महाग्या, राम्याची आईही आली होती. राम्याशी भांडण झाल्यामुळं पोटात अन्नाचा तुकडाही टाकला नव्हता. आबा यायचे होते. गावातले पंच, मास्तर, वट्ट्यावर आबाची वाट पाहात होते. सगळी आबादी एकमेकांना विचारू लागली. राम्याचा कुठंही पत्ता नव्हता. मघाशी घरून कुठं गेला ते महाग्यालाही कळलं नव्हतं. आबा झपझप पावलं टाकत होते. आबाचा राग अजूनही शांत झाला नव्हता. आबाच्या मागोमाग रंग्या आला होता. हातात काठी घेवून समधी आबादी आबाकडे पाहू लागली. आबा पंचात जावून बसले. सगळे आपसात चर्चा करू लागले. देशमुख पंच उभा झाला.

“महाग्या आहे काय रं?”

महाग्या लोकातून उठून पंचाजवळ आला. सगळ्यांना हात जोडून नमस्कार केलं.

“जी!”

“राम्या कुठं हाय रं?”

“आतापर्यंत घरीच होता, म्या एक थापड मारलं तवापासुन तो घरून गेला जी. ”

देशमुखानं सगळ्या लोकाकडे नजर फिरवली अंधारात राम्या दिसावं म्हणून. ..

“समध्या आबादीला राम्याचा स्वभाव माहीतच झालय. राम्या गावाशी वैर करायला निघालाय. एका माणसानं सगळी आाबादी आंब्याप्रमाणं नासवावी तुम्हाला तरी पटलं काय रं?”

कुणीही बोललं नाही. सगळं कसं शांत होतं. आबा इकडे तिकडे नजर फिरवीत होता.

“समध्या गावाशी वैर केलं नाय पाटील… तुम्हीच माह्याशी वैर केलं हायं.”

राम्याचा मागून जोरात करडा आवाज आला. सगळे राम्याकडं पाहू लागले. राम्या वट्ट्यावर येत होता. पंचाजवळ येवून सगळ्याकडे नजर फिरवली. टपोऱ्या डोळ्यानं आग ओतावं तसा त्याचा रागीष्ट चेहरा जाणवू लागला.

“राम्या तुह्यासोबत कोण वैर केलं र!” देशमुखानं त्याला प्रश्न केला.

“कोण म्हणजे? म्या आपल्यानं धावून गेलो नाय आबावर…”

आबा राम्याकडे पाहू लागले.

“राम्या भलतच बोलू नगस.”

“नायतर काय करणार तुमी… पाटील हाय म्हणून धमकी देताय का?”

“आरं तुला धमकी का म्हणून देणार. सगळ्याशी चांगलं कसं वागावं. पण आपल्यापेक्षा मोठ्यांशी बोलतांना विचार तरी केलस का?”

देशमुखानं राम्याला म्हटलं होतं. राम्याचा राग वाढतच चालला होता. समध्या आबादीत पाटलाच्या समोर धीटपणे बोलणारा पहिला राम्याच होता. राम्याने बंडाची सुरवात केली होती.

“शहाणपण सांगू नका देशमुख… सगळे एकाच ताटात बसून खाणार तुम्ही, काय बोलायचं ते लवकर सांगा?”

“गावाशी वैर करणाऱ्याला समाजातून हाकलून दिलं जातं. एकटं जगावं लागलं तुला.”

“देशमुख तू गावातून हाकलणारं कोण रं?”

“तुह्या भाषेत आम्ही ह्या गावचे पाटील आहोत.”

“पाटील आहात म्हणून काय झालं? या गावाशी माझं वैर नाय, फक्त तुमच्याशी हाय.”

“तरीपण तुझं असं वागणं आबादीच्या हिताचं नाही त्याचं काय?”

देशमुख पंच उलटा प्रश्न विचारत होता.

“ये देशमुखा हा दोघाचा प्रश्न हाय. गावात सभा भरवून समध्या लोंकांना बोलावून तुम्ही स्वतःले का नेता समजता व्हयं.”

आबा राम्याच्या उलट्या उत्तरानं भडकला होता. आबाला खूप राग आला.

“राम्या तुला मुकाट्यानं राहायचं नाय ह्या गावात.... यापुढं ह्या गावात राहायचं नाय. तुह्या या गावाशी काहीएक संबंध नाही.”

“आबा लई झालं तुमचं नाटक. तुम्ही या गावातनं हाकलणारं कोण? मीच हे गाव सोडून जातूया. पण लक्षात ठेव पाटील. पुन्हा परत येईन तुम्ही अडवू शकणार नाही. वैर फक्त दोघात हाय. गावाशी नाय, स्वतःचं लफडं गावासमोर मांडून स्वतःले राजा हरिश्चंद्र समजू नका?”

राम्या फार कडाक्यात आबाला ठणकावत बोलला होता. क्षणभरही तिथं न थांबता सरळ निघून गेला. सगळी आबादी राम्याकडं पाहू लागली. आबाचं डोकं ठिकाणावर नव्हतं.

“महाग्या आपल्या पोराला समजाव. आज सोडलाय त्याला, पण एवढं गरम होणं चांगलं नाय म्हणावं.”

आबानी महाग्याला बोलताच महाग्या खाली मान घालून तसाच उभा राहिला. मागे असलेल्या महाग्याच्या बायकोला रडू आलं. आबा, देशमुख इतर पंच आपसात कुजबुजले. आणि उठून जावू लागले. सगळी आबादी गेली. थोड्या वेळापूर्वीचा संघर्ष ऐकणारा वटट्टा एकटा रडत होता. प्रत्येक वादविवादाशी त्यालाच समोर जावं लागे. आबाचं राम्याशी वैर झालं होतं. राम्याला समजावून सांगावंयासाठी आबाने सभा भरविली पण सारं निरर्थक ठरलं होतं. राम्याच्या डोक्यात बंडाची ठिणगी पेटली होती. गुलामगिरीशी, हुकुमशाहीशी केलेला बंड नव्हे तर एका सत्याशी दिलेली झुंज.......



# ८

‘ज्याचं करावं भलं तो म्हणे माझच खरं.’ याची प्रचिती आबाला आली. आबाचं आबादीवरणं दुर्लक्ष झालं. आबा एकलकोंडे बनले होते. चारपाच दिवसापासून वट्ट्यावर काय खामदद्यातही गेला नव्हता. कुणाच्या घराकडे जाणं तर दुरच राहिलं. स्वतःचं कामकाज आणि स्वतःचं कुटुंब ह्यातच आपलं हित समजू लागला. एकएक दिवस कसा जात होता हे आबालाच कळलं नाही. राम्याने केलेल्या संघर्षाला आबा विसरला. आबाने फारसं मनावरही घेतलं नाही. सुरेखा क्षणाक्षणाने मोठी होवू लागली. पाटलीनबाई सर्व कामकाज करू लागली. बयरीच्यानं काम करणं जमत नव्हतं. बयरीशी सुरेखा अंगाखांदद्यावर खेळू लागली. बयरीचा दिवस सुरेखाला खेळवण्यातच जायचा. सुरेखा बयरीची भाची होती. बयरी केव्हा केव्हा हिरमुसून जायची. आपल्याला होणाऱ्या मुलाचं काय? एका रानटी माणसाच्या वासनेचा बळी होता तो. पण आबानं प्रेमाने तिला तसं भासूही दिलं नाही. बयरीचं दारिद्र्य, दुःख आता विलिन झालं होतं. एका नव्या आशेच्या किरणाचा उद्‌य होणार याच विचारात गुंग असायची.

राम्या त्या दिवसापासून कुणालाही दिसला नाही. राम्या आबादी सोडून गेला होता. झुंज देण्याची स्वप्नफूर्ती करायला. महाग्या, राम्याची आई चिंतेत बुडाल्या होत्या.

'मुलगा शेंबडा असला तरी आईला प्रियच असणार ना!' असच झालं होतं त्याच्या आईवडिलाचं. महाग्या स्वतः कामधंदा करून पोट भरू लागला. जवळपास महिना उलटला. कुणीतरी महाग्याला सांगितलं. राम्याने धंदा टाकलाय. हातभट्टीची दारू विकून पोट भरू लागला. तालुक्याला राहायचा तो. जवळपास खेड्यातून दारू आणायची आणि कुणालाही न जुमानता स्वतःच्या हिमतीवर विकायची. राम्यानं कुणाच्या तरी हातानं मायबापाला पैसे पाठवले. महाग्याला आधार मिळाला होता. महाग्यानं राम्याला भेटायला जायचं ठरवलं पण राम्या तालुक्याला कुठं राहतो हेही माहीत नव्हतं. आज ना उद्या राम्या येईल ह्या आठवणीतच दिवस जावू लागले.

ooo

आबानी बयरीच्या जागेवरती घर बांधायचं ठरवलं. बयरीची झोपडी आबानी मोडून काढली. ती मंगऱ्याच्या वाडवडिलांची जागा होती. घराचं बांधकाम सुरू झालं. बयरीला मूल व्हायच्या अगोदरच घराचं काम पूर्ण करायचा विचार होता. कामाची गती वाढली होती. गावातल्या लोकांना रोजगार मिळाला होता. यावर्षीचे हिरवेगार शेत पाण्यानं सडून गेले. थोडंफार उरले तेही फारच कमी कुणाचं तर पुरं पोट भरणही जड गेलं असतं. आबानी या बाबीचा सारासार विचार केला होता.

आबाकडे पैसा आहे, पण कर्जावू देवून त्यांना दडपणात ठेवायचं नाही. तर त्याला मजुरी देवून सुखी करायचं. सतत आबा आबादीचं पुढं काय? विचार करीत राहायचा. आबाला कल्पना सुचली बयरीच्या जागेवर एक मोठं घर बांधायचं शहरी थाटाप्रमाणं. आबाचं घरही चांगलं होतं पण जुनाट वाडा वाडवडिलांचा होता. केव्हा केव्हा आबाला किळस यायची त्या वाड्यात राहायची. वडिलांनी पापाचा पैसा गोळा केला होता. शेजारील गावांना व आबादीला लुटलं होतं. खूप पैसा जमा केला, पण कुणावर अत्याचार नव्हता केला. आबाचे वडील गेले तेव्हा आबाला फार दुःख झाले. नंतर आबा आबादीचे

पाटिल बनलेत. खूप लोकांकडे कर्ज बाकी होतं. आबानी सगळ्यांना कर्जातून मुक्त केलं. ज्यांच्या जमिनी ताब्यात होत्या त्या परत केल्या. त्यांना जमीन नव्हती त्यांना शेताचे तुकडे वाटण्यात आले. त्यांनी दरवर्षी हंगाम झाल्यावर थोडं थोडं पैसा द्यायचा होता. आबादीला आबाचे ऋण कधीही फेडता आले नसते. पण त्याच आबादीतला राम्या त्यांच्याविरूद्ध बंड करायला उठला होता. एका सत्याशी बंड करायला. आबाचे डोळे पानावले होते. आबा सारखा विचार करायचा. आबादीचा... पुरूषांनी भावनाप्रधान असूच नये. आबा अगदी तसाच...

पाटलीनबाई, बयरी आबाजवळ बसून होते. सुरेखाशी खेळत मौज घेत होते. कधी बयरी खूप हसायची. जणू तिला कधी अश्रू आले नव्हते. कधी कधी आबा तिच्याकडे एकसारखा पाहात राहायचा. तिच्या जीवनात प्रफुल्लीत झालेलं हास्य, खूप खूप वेगळी दिसायची ती. तिच्याएवढं सुखी कदाचित कुणीच नसावं, तसच घडलं, बयरी खुप हसत होती. आबा तिच्याकडे एकसारखं पाहू लागला. पाटलीनचं आबाकडे लक्ष गेलं. आबाचं बयरीवर असणारं प्रेम पाटलीनबाईलाही रडू आलं. एवढी माया स्वतःच्या पत्नीवरही कधी केली नव्हती. बयरीचं आबाकडे लक्ष गेलं. बयरी सुरेखाशी खेळण्यात गुंग झाली होती. बयरी क्षणभर थांबली. आबाच्या मनात कसलातरी विचार येत होताच.

‘बने, तुझी खूप मोठी जागा आहे ना! तिथं एक वाडा बांधायचा विचार करतुया....तुझी सम्मती हाय का?’

‘आबा हे का विचारायला पाहिजे व्हयं.’

‘नाही बने, तसं नाय पण जागा तुझी...उद्या तुझी जागा तू काहीही करू शकतेस.’

‘पण आबा ह्यावर्षी पीक पाणी गेलं ना! एवढी घाई कसली जी.’

‘म्हणूनच तं घाई करतोय बने, आबादीचं पीक गेलं. पुढल्यावर्षी काय खावं? याचाच विचार करतोय.’

‘तुम्हाला पटतंय तसं करा, मला काय समजतं त्यातलं?’

‘बने, तुह्या जागेवर शहराप्रमाणं मोठा वाडा बांधायचा. समधी आबादी कामालं येईल. त्यांना पैसा मिळल. एकवर्ष त्यांना रोजगार मिळेल. मग पावसाचं हंगामही येणार, आणि थोडंफार खामदत्र्याजवळील मंदिराचही काम करायचं.’

बयरीनं आबाला होकार दिला होता. आबानं घराचं काम सुरू केलं. विटा, सिमेंट, गिट्टी, मुरूम सगळं साहित्य गोळा केलं. आबादी हातात हात घालून कामाला लागली. आबाचा मोठा वाडा तयार होणार होता. जवळपासच्या गावकऱ्यांनीही कधी पाहिला नाही असा आबाचा वाडा.... आबादीला आणखी एकदा आबाने आधार दिला होता. आबाचं मन बर्फाप्रमाणं वितळणारं होतं. त्यांचं मन मात्र स्वस्थच बसत नव्हतं. चार दिवस घराबाहेर पडले नव्हते. नंतर आबादीचाच विचार. महाग्या व त्याची बायकोही कामाल भिडली होती. आबानं महाग्याला वाड्यावर बोलावलं होतं. आबाचा सवंगडी होता तो. नेहमीच आबाच्या मागं पुढं राहणारा. खूप दिवसानंतर महाग्या आबाकडे आला. महाग्याला रडू आले. आबाच्या महाग्या पाया पडला. महाग्यासोबत खूप बोलला राम्याची चौकशी केली. राम्या अजूनही परतला नव्हता पण पैसे पाठविले होते. तालुक्याला राम्या राहतो असं आबाला कळलं.

“महाग्या, आरं एखादत्र्यादिवशी तालुक्याला जावून घेवून येरं त्याला.”

“पण तो कुठं राहतूया, मला नाय माहीत जी.”

“बरं! माहिती काढून पाहिन मी.”

आबानं महाग्याला आधार दिला होता.

एक एक दिवस जावू लागले. आबादी कामात होती. आबादी पुन्हा हसू खेळू लागली. बयरी आणि पाटलीन वाड्याचं काम पाहायला गेली. सगळी आबादी कामात गुंग होती. आबानं तालुक्यावरणं इंजिनिअर आणला होता. आबा इंजिनिअर

बोलत होते. बयरी, पाटलीन तिथून फिरत होत्या. बयरीच्या मनात विचार येवू लागले. जुनाट आठवणीचा तरंग.........

मंगऱ्याचं घर होतं तिथं. वादळपावसाने पडल्यावर आबानं झोपडी बांधून दिली. आबानं वादळा पावसापासून बयरीचं रक्षण व्हावं म्हणून झोपडी बांधून दिली. पण त्या झोपडीतच वादळ शिरलं होतं. मंगऱ्या तिला सोडून गेला होता. ती एकटी पडली होती. स्वत: काबाडकष्ट करून पोट भरू लागली. एकेदिवशी काळ तिच्यावर धावून आला. संथ वाहणारं नदिचं पाणी.... दुपारचं तळपणारं ऊन.... लुगडं.... वाडी... विखुरलेली भाजी.... खाटेचा कचकच आवाज... ढोकाचं हसणं.... काठी रक्ताळलेला अंगठा.... ती अंगठी, शिवा... संपूर्ण आठवणी जाग्या झाल्यात. बयरी शांत होती. पाटलीनबाईचं बयरीकडे लक्ष गेलं. बयरी भानावर आली होती. आबादीचे बाया माणसं बयरीकडे पाहू लागली. खूप दिवसांनी बयरीला बघितलं होतं. काही दिवसापासून घरातल्या घरातच राहायची. बयरीचं पोट मोठं झालं होतं. बयरीशी सगळ्या बाया बोलायच्या. पण कुणीही तिची थट्टा केली नाही. बयरी, पाटलीन आबाकडे गेली. आबा हसला. इंजिनिअरने त्यांना नमस्कार केलं. आबानं वाड्याविषयी थोडीफार माहिती दिली. बयरीला मूल व्हायच्या अगोदर वाडा पूर्ण होणार नव्हता. बयरी एकसारखी पाहातच राहिली. आबादीचं रक्षण करणाऱ्या जादुगाराची किमया......

ooo

आबादीचा सूर्य केव्हा उगवतो व केव्हा मावळतो याचं भानसुद्धा हरपलं होतं. प्रत्येक कुटुंबातील व्यक्तीला रोजगार मिळाला होता. आबा आबादीचा देव माणूस... खामदऱ्याच्या बाजुला असलेल्या हनुमान मंदिराचही बांधकाम सुरू झालं. आबादीत

फक्त एकच मंदिर होतं. सर्वधर्मसमभावाचं हे मंदिर. दरवर्षी तीथं उत्सव साजरा केला जायचा. हनुमान जयंती यायला फार उशीर होता. मंदिराचं काम तसच सुरू राहिलं.

बयरीचं शरीर कमजोर होत चाललं होतं. बयरीला तालुक्याला नेलं औषधोपचार चालू होता. आबाला बयरीची काळजी वाटू लागली. बयरीसाठी दोन दिवस आबा तालुक्यालाच राहिले. तरीपण घराचं काम तसच सुरू होतं. आबाचा विश्वास होता आबादीवर. आबानेच आधार दिलं होतं गावकऱ्यांना, बयरी आबादीला परत आली होती. बयरीचं बाळतंपण केव्हाही होवू शकलं असतं. आबाला भाचा किंवा भाची होणार, आबाला आनंद होणार, आबाची बहिन.... मानलेली बहिन होती ती. आबाला सख्खी बहिन नव्हतीच. म्हणूनच प्रेम होतं तिच्यावर, पाटलीनबाईनं बनीला कधीही दूर सारलं नव्हतं. आबाच्या स्वभावाची वळण तिलाही लागली होती. आबादीच्या भल्यासाठी संघर्ष करणारा आबा तिला नेहमी आवडायचा. सात जन्माचं पुण्य मिळालं होतं. आबाची पत्नी बनून वावरल्यामुळं पण बयरीचं काय? माहेरच्या वडाला तीन प्रदक्षिणा मारूनही ईश्वरानं तिला दूर सारलं. पण त्याला अखेर दयेची भिक बयरीच्या पदरात घालावीच लागली. आबारूपी ईश्वर तिचा भाऊ झाला होता......

चार दिवसावर होळी आली. आबादीनं पोळा साजरा केलाच नव्हता. वरूणाची अवकृपा झाली होती. आता होळी साजरी होणार होती. दोन दिवस आबाचं घरकाम बंद राहणार होतं. आबादी सगळी आनंदात वावरू लागली. आबा दिवसभर कामाची पाहणी करत असायचा. मनाजोगं काम होत होतं.

महाग्याही कामाला लागला होता. आबाचं महाग्यासोबत बोलणं सुरू होतं दुरूनच कुणाची तरी हाक आली.

“आबा....आबा...”

समधी आबादी तिकडे पाहू लागली. रंग्या आबाकडे धावतच येत होता. आबाला क्षणभर काहीच समजलं नाही. रंग्या आबाजवळ आला. रंग्याच्यानेही बोलणं कठीण झालं होतं.

"अ...आबा... ब...नी..ची तब्येत..."

काळीज गळून पडावं तसच आबाला वाटलं होतं. रंग्या पूर्ण बोलायच्या अगोदरच आबा घराकडे झपझप पावलं टाकत निघाला. बनी... बनी ला काय झालं असेल? आबाच्या चेहऱ्यावर घाम आला. हृदय धडधडू लागलं. आबाच्या मागे रंग्याही गेला.. बनीची तब्येत बिघडली होती. बनी खाटेवर तडफडत होती. बनीला तालुक्याला न्यावं लागणार होतं.

"रंग्या बैलगाडी आण रं!"

रंग्या बैलगाडी घेवून हजर झाला. आबानं बनीला तालुक्याला नेलं. सोबत देशमुख पंचालाही घेतलं. बैलगाडी तालुक्याकडे धावू लागली. बयरी तडफडत होती. पाटलीन तिच्या जवळ बसली होती. मागोमाग देशमुख व आबा गेलेत. इकडे घराचं काम तसच सुरू राहिलं. बयरीला दवाखाण्यात भरती करण्यात आलं. रात्रभर पाटलीनबाई सोबत होती. आबाला फार चिंता लागली होती. बयरीला काही झालं तर, बनीचं बाळंतपण सुखरूप व्हावं असच वाटायचं. आबा रात्रभर जागत राहिले. देशमुखानं आबाला आधार दिला होता. मित्रत्वाचा आधार, आबादीत आबाच्या घरी कुणीही नव्हतं. आबा सगळे कामं टाकून आले होते. महाग्या घराची देखरेख करायला आबाच्या घरी थांबला होता. समधी आबादी तर सोबतच होती.

आबानं बयरीला खूप जपलं होतं. एवढी माया मंगऱ्याही देवू शकला नाही. मायबापाचीही आठवण कधी झाली नाही.

बयरीला मुलगा झाला. पाटलीनबाई धावतच आबाकडे आली. आबाला आनंदाश्रू आले. आबाला भाचा होताच फार आनंद झाला होता. बयरीची तब्येत संपूर्णपणे बरी होती. देशमुखाला आबादीला पाठविलं, समध्या आबादीत ढोल वाजवून दवंडी देण्यात आली. बयरी स्वतःचा मुलगा पाहून हसली. तिचा मुलगा होता तो. आबाचा भाचा... आबादीचा वंशज, होणारं पाटील. आबादी होळी साजरी करू लागली. होळीच्या अगोदरच्या दिवशीच मुलगा झाला होता. ढोलकीच्या तालावर नाचगाणं सुरू

होतं. गावात एकच होळी पेटायची. आबाचा पहिला मान असायचा होळी पेटविण्याचा. दुसऱ्या दिवशी चिखलात माखल्याप्रमाणे रंगात भिजायचे. गुलाल उधळायचा. आबादीची होळी सुखात गेली. सगळी आबादी आनंदानं नाचत होती. आबाचा तर उत्साह गगनात मावेनासा झाला. जनूकाही आबाच्या घरी दिवाळीचा सण साजरा केला जात होता. आबानं मानपत्रिका छापल्यात. आबाच्या भाषाचं बारसं थाटामाटात साजरं होणार होतं. सगळ्या गावाला भोजन द्यायचं ठरलं. आबानी सगळी जय्यत तयारी सुरू केली. बनी आपल्या गोजीरवान्या बाळाकडे पाहून हसायची.

पाटलीनबाई हळूच म्हणाली.

“बापाच्या चेहऱ्यावर गेला वाटतं.”

बयरी ढोकाची आठवण होताच हिरमुसून गेली.

“वयनी शाळेत बापाचं नाव कोणतं द्यायचं?”

पाटलीनबाई विचार करीत बसायची. बयरीच्या दुःखाची, बयरीच्या पोटी रानटी वासनेचा पुत्र जन्माला आला होता. बारसं आलं. नाव काय ठेवायचं तेही सुचेना. गावातल्या जोतिष्याकडे कुंडली पाहिली, नाव ‘र’ अक्षरावरून निघालं. आबा पटकण म्हणाले ‘रवी’

आबाचा वाडा लग्न असल्याप्रमाणे थाटामाटात सजला. आबादीच्या संपूर्ण स्त्रिया वाड्यात गोळा झाल्यात. बनीच्या मुलाचा नामकरण सोहळा पार पडला. रवी आबादीचा उद्याचा उषःकाल होता. देशमुख पंचाची बायको पाटलीनबाईस म्हणाली, “दुसरं नाव कणचं ठेवायचं?”

रवी च्या कानात फूकंर मारायची आणि नाव घ्यायचं. पाटलीनबाईनं नाव घेतलं. ‘रोनट्या..’

बनीला क्षणभर हसू आलं. नवीनच नाव होतं कुणीही न ऐकलेलं. त्याला शोभिवंत असं. पाटलीनबाईलाच त्या नावातील अर्थ कळला होता.



"पाटलीनबाई तुम्हाला हे नाव कसं सुचलं?"

पाटलीनबाई क्षणभर गप्प राहिली.

"टोपण नाव असच असतं, रवी चा रोनट्याच करणार की मुलं."

सगळ्या स्त्रिया हसू लागल्या. आबादीत सूर्य उगविला होता. पंचपक्वान्य बनवण्यात आलं. सगळी आबादी वाड्यात भोजनाला उपस्थित झाली होती.

ooo

आबादीच्या वाटेनं संथपणे पावलं येत होती. नवा तेज, नवा उत्साह, नवीन कपड्याचा साज, दाढी वाढलेली, टपोर दिसणारं डोळं, पायात चामडी बुट, चालतांना येणारा टपटप आवाज, कुणीतरी तालुक्याचं असावं. पाटलाकडे आमंत्रित केलेला पाहुणा असावा. क्षणभर आबादीला बघून पाय थबकलेत. शाळेजवळ बयरीच्या जागेवर मोठं घर दिसलं. आबादी खूप बदलली होती. सांजवेळ झाली. थोड्यावेळातच अंधार पडणार होता. आबादीतील कुणालाही उसंत नव्हतीच. सगळे कसे आनंदानं गोठून गेले होते. कुणाचं तरी त्याच्याकडे लक्ष गेलं. फार बदलला होता. तो गुराखी, गुरे राखणारा महाग्याचा मुलगा राम्या होता. त्याच्या जीवनाला नवीन वळण लागलं होतं. स्वप्नफूर्ती करायला गेला होता. पाटलाशी केलेल्या बंडाची त्याच्या डोळ्यावर अजूनही धग उमटत होती. बयरीच्या जागेवरील घर पाहून राम्याचा श्वास जड झाला. आबाची आठवण झाली त्याला. क्षणात पूर्वीचं जीवन तरंगू लागलं. बयरीसाठी खूप मारलं होतं आबानं. पाया पडला होता महाग्या.

"ये बयरे, हे कुण्या रानटी माणसाचं गं."

पाठीवर वळ उमटले होते. चार पाच दिवस उठू शकला नव्हता. राम्याच्या मनात आबाविषयी क्रुरता निर्माण झाली. खामदच्यातही जुगार खेळतांना वट्टयावर सभा घेतली होती. गावातनं हाकललं होतं. राम्यानं विडी पेटवली. विडीचा दम जोरात घेतला.

आणि आठवणी नाहिशा व्हाव्यात तसा दम सोडला होता. राम्या घराकडे जावू लागला. राम्याची आई कुठतरी जायच्या घाईत होती. राम्यादारासमोर येवून थांबला. एकसारखं पाहात राहिला आईकडे. बदललेलं राम्याचं रूप पाहून क्षणभर तिही थबकली.

“राम्या... कवा आलास रं!”

राम्यानं आईला मिठी मारली होती. त्याच्या आईचे डोळे पाणावले होते. खूप दिवसानंतर राम्याला ती बघत होती. राम्याकडे एकसारखी ती पाहातच राहिली. त्यादिवशी उपाशीच निघून गेला होता. आबाच्या रागावरणं गावातून हाकललं होतं त्याला.

“आई बावा कुठं गेला वं.” राम्या आईला हळुच बोलला.

“आबाच्या घरी जेवायला गेला रं!”

राम्याचा चेहरा लालबुंद होवू लागला. डोळ्यातून रागीट भाव उमटलेत. पण राम्यानं तसं चेहऱ्यानं झाकून घेतलं.

“काय आहे वं आबाकडे?”

“बयरीला पोरगा झाला व्हयं, आबाचा भाचा, बारसं हाय की रं.”

बयरीचं नाव ऐकताच जुन्या आठवणीने काहुर मांडलं होतं.

“ये बयरे, कुण्या रानटी माणसाचं गं.”

बयरीला मारलेला टोमणा राम्याच्या हृदयात थैमान घालून होता. राम्याचं डोकं गरगर फिरू लागलं. राम्याचं भान हरपलं होतं. खोंकण्याचा आवाज आला. ‘खो..खो..’ राम्याचं लक्ष गेलं. महाग्या आला होता. महाग्या राम्याकडे पहातच राहिला. राम्या खूप बदलला होता. राम्या पैसा कमावू लागला. खूप श्रीमंत व्हायचे स्वप्न होते. त्याला धंद्याची कला अवगत झाली होती.

“राम्या जेवायला जा की आबाकडं.”

राम्याला राग आला होता.

“हं! आबाकडं, का? कुत्र बनून जावू तोंड दाखवायला, गावातुन हाकललं, आज आलो आहे असं माहीत जरी झालं तर चवताळून येईल तो वाघ, रंग्यासोबत.”

“नाय रं! आबा तसा माणूस नाय. त्यालाच तुही काळजी होती. आबानच दोन वेळा विचारलं, राम्या नाही आला का म्हून?”

राम्याचा राग शांत झाला होता. बापाकडं पाहातच राहिला.

“म्या भाकरी टाकून देतो की रं! खावून घेशिल.”

राम्याच्या आईला दया आली होती. राम्याचं मन समाधानी झालं. घरची चटणीभाकरी खावून, खूप दिवसापासनं आईच्या हातचं खाल्लं नव्हतं. आबादीत समध्यांना राम्या आलं म्हणून माहीत झालं. राम्या फक्त रात्रभर थांबला. सकाळीच उठून गेला होता. राम्याच्या आईनं खूप आग्रह केला होता. पण राम्या थांबला नाही. राम्यानं घर खर्चाला पैसेही दिले. राम्या कुणाही सोबत बोलला नाही. महाग्या पहातच राहिला. राम्या डोळ्यांना दिसेपावेतो. राम्याच्या डोळ्यात बंडाची आग अजूनही पेटतच होती.

वाड्याचं काम आणखी सुरू झालं होतं. आबादी सगळं काही विसरून कामाला लागली होती. महाग्याही कामावर आला. राम्या आला होता म्हणून तो आनंदी असायचा. आबाला माहिती मिळाली.

“राम्या आला होता रं, महाग्या.”

“व्हयं जी, बारसाच्या दिसी रातच्याला.”

“मग जेवायला का नाही आणलसं रं?”

“म्या म्हणलं पण तो यायलाच तयार नव्हता.”

“थांबला नाही का रं?”

"कामात आहो म्हणे, घाईगडबडीतच गेला जी."

"कोणतं काम करते रं."

"विचारलं तं म्हणे, तुम्हाला काय करायचयं, पैसे भेटते नवं, खावा नं रावा."

"अजून राम्याची जिद्द गेली नाय वाटतं."

महाग्या कामात भिडला होता. आबा पुढे गेला. वाड्याचं काम पूर्ण व्हायला वेळ होतं. मंदिराचं कामही बाकी राहिलं. संपूर्ण उन्हाळ्याची आग वाड्यावर ओकणार होती. बयरी आपल्या रवीसोबत हसत मुखाने जगत होती. पाटलीनबाईनं त्याचं नाव 'रोनट्या' ठेवलं होतं. रानटी वासनेने जन्माला आलेला पुत्र, आबादीचे सुत्र सांभाळायला आला होता. सुरेखा रोनट्याकडे पाहून हसायची. सुरेखा चालू बोलू लागली. बोबड्या बोलाने पाटलीन, आबाचं मनोरंजन होई. एकएक दिवस जात होते. आबाला मुलाप्रमाणं रोनट्याचा आधार मिळणार होता. कधी कधी आबाला स्वतःच्या मुलाची आठवण व्हायची. आबा हिरमुसून एकटाच रडत बसायचा. बयरीनं आबाला कित्येकदा एकट्यात रडतांना पाहिलं.

"मुलाची आठवण झाली व्हयं."

"नाही बने, कधी कधी आपल्याच नशीबाला रडावं लागतं."

"रोनट्या तुमच्या मुलासारखं नाय का?"

"व्हय बने, रोनट्या माह्या मुलासारखा हाय, माह्या भाचा... होणारा जावई, होणारा पाटील."

आबा हिरमुसून रडतांना बयरीसोबत हसू लागायचा.

"आबा, पण रोनट्याला सुरेखा कशी जमणार व्हयं."

"न जमायले का होईल?"

"सुरेखा रोनट्यापेक्षा दोन वरसानं मोठी हाय ना!"

"मोठी हाय म्हणून लग्न करू नये असं कोठं लिहलं हाय का?"

बयरी आबाचे बोल ऐकून मनातल्या मनात रमून जायची. एक एक दिवसांनी बयरीचा रोनट्या मोठा होवू लागला. घरात सर्वत्र आनंद पसरला होता. बयरी मागील जीवनाला विसरली होती. तिला कशाचीही काळजी उरली नाही. वाड्याचं काम सुरूच राहिलं. मंदिराचं काम पूर्ण झालं होतं. हनुमान जयंतीला आबानं गावभोजन दिलं. महाप्रसाद वाटला. आबासारखा देवमाणूस शोधूनही मिळाला नसता आबादीला. उन्हाळ्याचं ऊन तावू लागलं सूर्याचं तेज अंगावर घाम उगारत होतं. ऊन्हात काम करणं जड जावू लागलं. अंगाची लाही लाही होत होती. वाड्याचं काम पूर्ण होणार होतं. समधी आबादी नेहमी प्रमाणं कामात व्यस्त होती.

०००



# ६

**आबादी** जवळच दोन मैलावर तालुक्याचा रस्ता होता. येणारी जाणारी वाहणं वाढू लागली. आसपास दोन तीन खेडी होती. तालुक्याला जायचं झाल्यास तिथच मोटारगाडयांची वाट पाहावी लागे. तालुक्याला कोळश्याची खाण लागली. ट्रक गाड्या भरधाव वेगानं धावू लागल्या. आसपास तेवढ्या अंतरावर कुणाचही दुकान नव्हतं. रामाच्या मनात हॉटेल टाकायचं सुचलं. राम्याने हातभट्टीची दारू विकून खूप पैसा गोळा केला. तालुक्याच्या पोलिसाशी त्याचं घरगुती नातच निर्माण झालं. राम्याला आबाचा अर्धवट झालेला वाडा दिसू लागला. आपणही असाच वाडा तयार करावा. राम्यानं मनातही विचारही केला. पण पैसा अपुरा पडला असता. धंद्याची जेमतेम सुरवात झाली होती. राम्या सारखा विचार करू लागला. आबा प्रमाणं मोठं व्हायचं. आबाशी केलेला बंड...

आबाशी झालेली झुंज राम्याच्या मनात थरकाप सोडायची. राम्या खूप बदलला होता. पण स्वभाव मात्र कायम राहिला. राम्यानं तिथलं शेत विकत घेतलं. हॉटेलचं काम सुरू झालं. हॉटेलच्या समोर लहान बाग तयार केली. तालुक्यावरणं सामान खरेदी केलं. तीन माणसं नोकर ठेवली. राम्यानं हॉटेल सुरू केलं. ‘झुंज धाबा’ सुरेख नाव दिलं. आबाच्या सुरेखाप्रमाणं सुंदर असं नाव. येणारी जाणारी वाहणं तिथं थांबू लागली. दररोजचा धंदा वाढला. राम्या खूप पैसा कमावू लागला. सोबत दारूचा धंदाही सुरू राहिला. रोजची जाणाऱ्या येणाऱ्याची वर्दळ वाढली. काही दिवसांनी तिथं छोटसं गाव

वसलं असतं याच स्वप्नात राम्या होता. राम्याला आई वडिलांची आठवण यायची. आबादीत राम्या विषयी कळलं. राम्यानं हॉटेल सुरू केलं. महाग्याला आनंद झाला. महाग्या राम्याला भेटायलाही गेला. महाग्याला पैशाची चिंता उरली नाही. राम्याच्या मनात आबाचा सूड घ्यायचा विचार सलतच होता.

"बावा, आबाचा वाडा बांधून झाला का?"

"थोडंसं काम उरलं आहे, पण तू असं विचार का करतोस?"

"मीही असाच वाडा बांधीन म्हणतो."

"तू वाडा बांधणार का रं? एवढा पैसा कुठून रं आणणार."

"पैसा काय कमी आहे का आपल्याकडे, शिवाय रोजचा भक्कम धंदा होतेच नव्हं."

"मग इथचं हॉटेलजवळ बांध की रं वाडा."

"नाही, इथं वाडा बांधून काय करायचं, आबादीचा पाटील व्हायचयं मला."

"अजून आबाचा राग गेला नाही का रं?"

"हं.. म्हणे आबा...... तुच पाया पडलास त्याच्या... अजूनही माह्या पाठीवरचे वळ मिटलेले नाय."

"आरं त्यांनी तुला हाकललं नसतं तर तू इथं नसतास."

राम्याला राग आला होता. महाग्याने आबाची बाजू घेतली होती.

"आबा.... म्हणे आबा, माह्यासमोर त्याचं गुणगाण सांगू नकोस."

राम्याचा राग अनावर झाला. महाग्या चुपचाप राहिला. महाग्या त्या दिवशी तिथचं थांबला होता.

“गावला नाही येणार का रं?”

राम्यानं केसावर हात फिरवलं. डोळ्यावरील चष्मा काढून स्वच्छ करू लागला. जुनाट आठवणीने घायाळ डोळे चष्म्यात महाभयंकर वाटू लागले होते. स्वतःची त्याला जाणीव झाली. राम्या आपल्या बापाकडं पाहातच राहिला.

“येईन पण इतक्यात नाय जमणार.”

महाग्या राम्याकडं एकसारखं पाहातच राहिला. क्षणभर सारं काही विसरून गेला होता. राम्यानं दिलेली पिशवी त्याच्याजवळ होती. खर्चाला पैसेही दिले होते. महाग्या आबादीकडे चालू लागला.

“बावा...”

महाग्या थांबला, राम्यानं हाक दिली. दोनचार पावलं पुढे जावून अचानक राम्याकडं आला.

“तुमी दोघबी इथं येवून राहिले तं नाय जमणार का?”

“ज्या मातीत वितभर पोट भरलं त्यालाच विसरून जा म्हणतेस व्हयं.”

“तसं नाय पण.... आता तुमच्यानं काम ही जमणार नाय.”

“मरण पुढं असल तं आजची फिकीर करायची व्हयं, हातपाय सुखानं आहेत तोपावेतो जमलं तेवढं करावं म्हणतो.”

“पण त्या आबाच्या कामावर जाणं मला नाय आवडत.”

“आबाशी, आपलं काय आहे. काम ते काम, पोटासाठी कुठंबी भटकावं लागते, आणं आबा तं आबादीचा देवमाणूस हाय.”

राम्याचे डोळे लालबुंद झाले, बापाच्या तोडांवर आबाचं नाव येताच क्षणभर बर्फाप्रमाणं शांत थंड मन गरम व्हायला लागलं. त्याचं शरीर सूर्याच्या तेजात होरपळून निघावं तसं भडकलं होतं. पण राम्यानं संयमानं हाताच्या मुठी घट्ट दाबून घेतल्या.

"आबा...आबा.. जेव्हा केव्हा तुया तोंडात देवमाणुस असते व्हयं. मी काय नालायक हरामखोर हाय."

महाग्यानं राम्याच्या लालबुंद डोळ्याकडे पाहिलं आणि तसाच आबादीकडे जायला लागला. राम्याच्या मनात निरनिराळे विचार दाटून येत होते.

होळीच्या दिवशी आबाचा पाहिलेला अर्धवट वाडा... बयरी, आबा, खामदा, पाठीवरचे वळ, साऱ्या बाबी डोळ्यात भिरभिरत होत्या. राम्या क्षणभराणे भानावर आला. इकडे तिकडे पाहू लागला. महाग्या फार लांबवर गेला होता. पाठमोरी आकृती पुसटशी झाल्यागत वाटू लागली होती. दोन तीन ट्रक रस्त्यावर थांबले होते. सकाळच्या चहापानाची वेळ झाल्यानं गिऱ्हाईक टेबलावरती बसून होते. राम्याच्या हॉटेलाची भट्टी कोळशानं धगधग पेटत होती. लाल लाल अंगार आणि काळा धूर कुठतरी दूरवर जात होता. राम्या एकसारखा त्या भट्टीकडे पाहातच राहिला. एवढ्यात कुणीतरी पाच रूपयाची नोट टेबलावरती ठेवली. 'हं.. चार रूपया ' नोकर ओरडला. राम्याचं तिकडे लक्ष गेलं. एक रूपया सुटा देत त्या पाचच्या नोटाकडे पाहातच राहिला. आणखी क्षणभराने आबाचा चेहरा नजरेसमोर तरळू लागला.

कोळशाची भट्टी धगधग पेटतच राहिली. विस्तवाच्या काळ्याकुट्ट धुसर धुरातून राम्याचं अंतःकरणही विस्तवाचे चटके सोसल्यागत काळसर धुसर बनलं होतं.

धुराप्रमाणं पैशाचं पाऊस पडत होतं. जणू लक्ष्मीच त्याला प्रसन्न झाली होती. एक एक क्षण, एक एक दिवस उलटत होतं. गावकऱ्यांशी त्याचे संबंध वाढत होते. तालुक्याला जाणारा प्रत्येक व्यक्ती धाब्यावर येत असे. राम्या उत्सुकतेने आबादीची माहिती विचारून घ्यायचा. पण अंतःकरणात पेटलेली द्रष्टेपणाची ज्योत तशीच पेटत राहिली. आबाच्या विचाराने कधी कधी कंटाळायचा. डोकं गरम व्हायला लागायचं. रात्री

न झोपता एकसारखा विचार करीत बसायचा. एकच स्वप्नं त्याच्या दृष्टीसमोर होतं. 'आबादीचा पाटील व्हणार मी!'

०००



# १०

**एक** वर्ष उलटलं होतं. आबादीत आबाचा टोलेजंग वाडा उभा झाला होता. संपूर्ण गावभोजन दिलं होतं. गावोगावचे लोक वास्तुपूजेला आले होते. समधी आबादी आनंदानं माखली होती. आबादीच्या नदीला मागल्या वर्षी आलेल्या पुराप्रमाणं सगळ्यांचा आनंद ओसंडून वाहत होता. आबादीला काम मिळालं होतं. मंदिराचही काम केव्हाच पूर्ण झालं होतं. बयरी सारं काही विसरून नव्या जीवनाच्या वाटेवर, नशीबाच्या लाटेवर नव्या जोमानं, नव्या उत्साहानं खंबीरपणे उभी राहिली. आधार देणारा आबाही भावाच्या रूपानं परमेश्वर बनून तिच्या जीवनात आला होता. बहिन भावाचं प्रेम असच फुलत राहणार होतं. अखेरच्या क्षणापर्यंत.

बयरीचा चुलता शिवा वास्तुपूजेला आला होता. आबाच्या आग्रहाखातर दोन चार दिवसापासून तिथच होता. बयरीचा वाडा पाहून शिवा चकित झाला. बयरीचं भाग्य उजाडलं होतं. खरचं! आबाची मानलेली बहिन बनी आपली बयरीच आहे काय? क्षणभर विचारात गुंतून जायचा. शिवाच्या डोळ्यात अश्रू आलेत. शिवा डोळे पुसत होता पण पाणावलेल्या डोळ्यात आणखी पाणीच येत होतं. आनंदाचं.

सुखदुःखाच्या वाटेवरचं मन अथांग विचारात असतांना आबाचं आगमन झालं. शिवाचं लक्ष जाताच स्वतःला सावरत आबाकडे पाहून उभा राहिला.

"बस रं! उभा होवून मान दयायला तू आबादीचा पुरूष नाहीस, आणि तुह्यापरीस मी एवढा वयानं मोठाही नाही."

आबा किचिंतसा हसला. शिवा पाळण्यावर बसला. आबासोबत काय बोलावं त्याला सुचेना. सगळे विचार मनातच रेंगाळत राहिले.

"काय म्हणते तुमची बनी? आवडलं की नाय बनीचं घर."

"आबा माही बनी म्हणून लाजवता व्हयं."

"आरं पण तुही पुतनी हाय, नंतर माही बहिन..."

शिवा निरूत्तर झाला होता.

"आबा, बनीला तुम्ही एवढं सावरलं तुमचं उपकार....."

"आरं! उपकाराची भाषा बोलून माह्यं ऋण फेडतेस व्हयं. बनी पण अशीच बोलत असते. काहीतरी मनात अडखळल्यागत... माणूस काय आज नि उदया? कुठं संबंध जुडतील, कुठं संबंध तुटतील ह्याची कृपा ईश्वरावर असते."

"आबा, तीन चार दिस झालं गावाकडं जावं म्हणतो."

"गावाकडं! कुठल्या रं गावला?"

"आपल्याच गावला की नवं."

"आणं हे गाव का दुसऱ्याचं हाय? तिथं जावूनही कामधंदा करशिल का नाय? मग इथच राहिलं तं फरक कुठं पडतं. आणि बनीचा वाडा सांभाळायला कुणी ना कुणी पाहिजे की नाही."

"तुमी असल्यावर कुणाची गरज भासणार जी."

"व्हयं, तुझं बी म्हणनं खरच हाय. आम्ही असल्यावर... पण आता आम्ही वेगळच ठरवलयं. तू गावला जाणार म्हणून..."

"आबा, आत्ताच रावाही म्हणता आनं जावाही म्हणता. असे हाकलून राहिले का जी."

"आरं! मी कुठं हाकलतो आहे. ठरवलं तेच सांगतोय. उद्या तू गावला जावून बायकोला घेवून परत यायचं. कायमचं इथं राहाण्याकरीता."

"आबा, काय म्हणता तुम्ही, मला हे नाय जमणार, लोक काय म्हणतील जी."

"लोकांचं घेवून चालतोस व्हयं. आरं आपलं काम करूनच पोट भरणार ना! मग एवढं सारं काही माह्यं काम पाहायला कुणाची तरी गरज हाय का नाय."

"रंग्या हाय नं जी."

"रंग्या हाय म्हणून काय झालं. बाकीची काम तू सांभाळायची."

शिवा मनोमन फुलला होता. आबाचं देवत्व त्याला दिसून आलं होतं.

"मग तयारी हाय नं इथं राहायची?"

शिवा गप्पच राहिला. पुढचं काय? या विचारात पाटलीनबाई, बनी हसत हसत मंदिरातून आल्यात. आबा, शिवा काहितरी बोलत आहेत ह्याकडे त्यांचं लक्ष गेलं. पाटलीनबाई शिवाकडे नजर टाकीत म्हणाली.

"वादावादी तं नाही झाली ना, अचानक असं गप्प बसायला."

बयरीचं काळीज क्षणभर असं थक्क झालं. तिच्या चुलत्याला आबानी काही म्हणावं. कसं सहन केलं असतं पण तसं घडणारही नव्हतं.

"बने, शिवाला इथचं ठेवायचं म्हणतो मी, सांगूनही तो ऐकत नाय. तुझा हा वाडा सांभाळील, तुला तुह्या जवळचं माणूस मिळेल, मन रमल तुह्यं."

"माही परवानगी घ्या लागते व्हय."

“नाहीतर काय? एवढ्या टोलेजंग वाड्यात एकटी राहणार व्हयं. सोबत हवं की नाही?” पाटलीनबाईनं बनीला म्हटलं होतं.

“आनं तुम्ही का देवदर्शनाला चाललाय.”

बनी ने पाटलीनबाईला टोला लगावला होता. सगळे कसे बनीच्या बोलण्यानं हसायला लागले होते. शिवाही मनात खूश झाला होता.

“मग काय रं शिवा, कायमचं इथं राहायचं आलं का ध्यानात?”

“आबा म्हणतात तं राहून का नाय जात.”

बनीनं शिवाला म्हटलं. शिवाने आबाला मानेनेच होकार दिलं होतं. पाटलीनबाई आत गेली होती. बनी तिथच उभी होती. शिवाला पाहात. क्षणभरात ती पूर्वीच्या आठवणी साकारीत बसली. आबाच्या माणसांनी तिला शिवाच्या गावावरून आणलं होतं, वडाला तीन प्रदक्षिणा पण मारल्या होत्या. आज तिला आशीर्वाद मिळाला होता. कधीही न मिटणारे दुःख सुखात कसे रूपांतरीत झाले तिलाही कळलं नव्हतं. मंगऱ्यासोबतच्या सहवासाने ती बेजार व्हायची. राबराब राबून भरलेलं पोट आठवायचं. जुन्या आठवणी रेंगाळतांना क्षणभर राम्याची आठवण व्हायची.

‘ये बयरे, हे कुण्या रानटी माणसाचं गं!’

बनी हात कानावर ठेवून डोळे मिटायची. कुणीतरी कानात वारंवार किंचाळतोय असच वाटायचं. क्षणाचा का भास असेना, समोर सुरेखा, रोनट्याशी अंगणात खेळतांना दिसायची. दोघाचं हसनं बघून बनीचं मन नदीच्या निर्मळ पाण्याप्रमाणं स्वच्छ व्हायचं. वाड्यासमोरील बागेत फुललेल्या फुलाप्रमाणं रोनट्या सुरेखा दिसायची. आबानी म्हटलेलं वाक्य तिला आठवत असे. आणखी क्षणभर ती क्षणिक स्वप्नात ती गुंग व्हायची. इतक्यात सुरेखा अक्का.. अक्का... म्हणत भुकेच्या कळकळीने बनीच्या पायाशी चिपकली होती. बनीच्या डोळ्यातून अश्रू तरळले. तिच्या जीवनाचे सुखाश्रू ..... आबानी दिलेल्या आधाराचे.....एका देव माणसाच्या मंदिरातील सेवेचे. पाटलीनबाई

घरकामात गुंतली होती. चारपाच दिवसातील पाहुण्यांच्या वर्दळीमुळे अजूनही वाड्याची सफाई चालू होती. रोनट्याच्या रडण्याचा आवाज आला.

“बने, त्या दोघांना खायला आनून दे.”

“व्हयं जी.”

बनी दोघांनाही सोबत बसवून एक एक घास चारून देत होती. आणखी जुनाट आठवणी..... मंगऱ्यासोबत चटणीभाकर खातांना किती समाधान मिळायचं.

“बने, तुह्या हातची चटणीभाकर कशी सहदावाणी गोड लागते.”

“मग माह्या हातचं चाय बिना साखरेचं बनवलं तं चालणार नाय का?”

“कडूलिंबाचं रस पेलं तरीपण चव गोडच वाटलं. मग बिना साखरेचं चाय गोडच वाटल नवं.”

“तुमी काहिबी बोलता नवं, कुणी आयकल तं.”

“एवढ्याशा बोलण्याला काहिही कसं म्हणतेस.”

बयरी मंगऱ्याच्या बोलण्यानं हसायची. लग्नानंतरचे मंगऱ्याचे शब्द नं शब्द आठवून प्रफुल्लीत व्हायची. तिला अजूनही आठवत होतं, मंगऱ्याचं लांबसर नाक, गव्हाप्रमाणं दिसणारा त्याचा चेहरा मरतांना पिकल्या काकडी सारखा झाला होता. छातीचा पिंजरा दमा दाटून वाळलेल्या येळवासारखा दिसायचा. बनी विसरू शकली नव्हती मंगऱ्याला.

बयरी आबाच्या टोलेजंग वाड्यात खुपच सुखी दिसायची. पूर्वीचं गोरं गोमटं कामानं खचलेलं अंग बहरून आलं होतं. नव्या नव्या पातळानं तिचं रूप सोनं झालं होतं. वाड्यातील पाटलीनबाई म्हणून मिरवतांना कधी कुणाचा हेवा केला नाही. बनीचा स्वभावही शांत, कोमल, मृदूच राहिला. आबाच्या अपार मायेनं ती सुखावून गेली होती. रानटी वासनेला बळी पडलेली बनी, सारं काही आबादी विसरून गेली होती. बनीनं कधी

कुणाविषयी वाईट विचारही आणला नाही. पाटलीनबाईशी तर असमजपणा कुठून येणार, पण आबानं बनीवर काही बंधन निर्माण केलेत. गावात कुणाच्याही घरी ती जात नव्हती. कुणी बोललं तर बोलायचं. गेलच तर देशमुखाच्या पत्निशी मनमोकळं बोलायचं तिही यायची वाड्यात, एकेदिवशी देशमुखबाई अशीच येवून बसली. आबा, पाटलीनबाई कुणीही नव्हतं घरात. मनमोकळं बोलातांनाच.

"बने, तुया रोनट्या आता मोठा झाला बघ!"

"व्हयं जी."

"दोनचार वर्षात शाळेत बी जाईल, खूप शिकव गं त्याला, आबाप्रमाणं खूप मोठा होईल तो."

"शहरात पाठवू म्हणे आबा."

"पण रोनट्याच्या बापाचं काय नाव टाकायचं ठरवलस?"

बनी हिरमुसली, रोनट्याच्या बापाचं नाव घेताच जुन्या आठवणी दाटून आल्या. 'मंगऱ्या की मन्या' बनीला पुढं काय बोलावं तेही कळत नव्हतं. देशमुख बाईला तिचं मन दुखवायचं नव्हतं. पण बोलतांना सहज विषय निघाला होता. देशमुखबाईने बनीचे अश्रू पुसले. तिला मायेचा आधार दिला. बनीला खूप राग आला होता. पण सत्य कुठं लपणार होतं. याचीही जाणीव तिला होती. देशमुखबाईने माफी मागीतली. व घराकडे निघून गेली. बनी दिवसभर याच विचारात होती.

'माह्या रोनटयाचा बाप.....!'

हिरमुसून हिरमुसून सारखी रडली. आबा आल्यावर आबाला सांगावं असही तिला वाटलं. पण आबाला तिने काहिही सांगितली नाही. त्या दिवसापासून देशमुखबाई बनीकडे पंधरा दिवस आलीच नाही. वास्तुपूजेलाच आली होती. बनीशी भीत भीतच बोलली. बनी सारं काही विसरून तिच्याशी गप्पा करीत होती.

आबा नव्या वाड्यात राहू लागला, सोबतीला शिवाही होता. शिवाची बायको येणार होती. बनीला तिची काकी मिळणार होती. खूप दिवसापासून पाहिलं नव्हतं तिला. लग्नापासून दोन तीनदाच माहेराला गेली होती पण मन्याच्या मरणानंतर गेली ती कायमची राहायला. आबानी तिला माणसांच्या हातांनी आणलं होतं. नाईलाजास्तव यावं लागलं तिला. तेव्हापासून आता काकी दिसणार होती, वास्तुपूजेलाही आली नव्हती. अंगात ताप भरल्यानं तिच्याच्यानं चालणं झालं नसतं असं शिवा म्हणत होता. आबाची गावोगाव ओळख होती. दररोज वाड्यात नवे-नवे लोक यायचे. त्याचं चहापाणी करतांना लोकांनी विचारायच्या अगोदरच आबा बनीची ओळख करून द्यायचा. बनीशी खूप लोक मानानं बोलायचे. पाटलीनबाईला बनी असल्यावर कोणतं कामंही कराव लागत नव्हतं. तरीपण दोघीही मिळून काम करायची. असेच एक एक दिवस पालटत होते. आबादीचं स्वरूपही बदललं होतं. नवा हंगाम आला होता. नव्यानं हिरव्यागार डोंगराप्रमाणं मऊमऊ गवतांनी आबादी सजून बसली होती. सारं काही सुरळीत सुरू होतं. सुरेखा, रवी एक एका दिवसानं एकमेकात हात मिसळून मोठे होवू लागले. आबाही समाजासाठी संघर्ष करून मानानं मोठा होत होता.....

ooo



# ११

दोनतीन वर्ष उलटली. समधी आबादी आबाच्या कृपेनं आनंदी होती. दोन तीन वर्षात पीक पाणीही चांगलं आलं होतं. आबा स्वतःच्या कामात नेहमी गुंग असायचा. गावाच्या भल्यासाठी लढणारा हा देवमाणूस. आबादीत रस्ते, नाल्या बांधण्याचं काम करू लागला. आबादीचा खामदाही टुमदार दिसू लागला. दिवसभर आबादीची मुले तिथं मनोरंजन करीत आबाला पूर्वीइतकाच मान अजूनही मिळत असे. आबाचा शब्द आबादीसाठी प्राण होता. सुरेखा शाळेत जावू लागली. रूपानं सुंदर गोरीगोमटी, बुद्धीनं चतुर असलेली सुरेखा... आबानं रवीशी लग्न करायचं असही निर्णय अगोदरच घेतला होता.

नुकताच आबादीत ढेकल्याचा मुलगा मास्तर बनून आला होता. सुशिल नाव होतं. नावाप्रमाणं गुणवान निघाला होता. आबानी अनेकदा त्याला शिकायला पैसे दिले होते. नोकरीला लागलेला पहिला मुलगा होता. अजूनपावेतो शिकून कुणीही मोठा झाला नव्हता. आबाला थोडं गर्व वाटलं. आपल्याच गावातील मुलगा आपल्याच गावात मास्तर झाला. ढेकल्याचाही मान वाढला होता. ढेकल्याची परिस्थिती सुधारली होती. आबानं

सुशिलचा सत्कार केला. गावोगावचे मास्तर शाळेमध्ये कार्यक्रमाला आले होते. सुशिल गावकऱ्यासमोर आबाच्या पाया पडला. 'मी आज इथं उभा आहे तो आबामुळे.'

माझे आई वडील म्हणून आबाला संबोधताच आबाच्या डोळयातून अश्रू पडले होते. स्वतःच्या जिद्दीचं त्यानं सार्थक केलं होतं.

राम्या आबादीला दोनदा आला होता. रात्रभर राहून पहाटेलाच निघून जायचा. पण आबाची त्यानं कधीही भेट घेतली नव्हती. राम्याचा धाबा खूप चालायचा. दररोज कितीतरी गिऱ्हाईक तिथं ट्रक गाड्या थांबवीत. हातभट्टीची दारू विकतानांच त्यानं हॉटेल टाकलं होतं. राम्याची जिद्द त्याला यशाच्या मार्गावर नेत होती. आबाशी तो झुंज द्यायला निघाला होता.

'मला आबादीचं पाटील व्हायचं हाय.'

एवढच एक स्वप्न होतं. आबासारखा वाडा बांधायचा विचार केला पण धंद्याच्या व्यापानं दोनतीन वर्षापासून खूप अडचणी आल्या होत्या. राम्याची माय आजारी असतांना तालुक्याला घेवून गेला होता. खूप दिवस ती त्याच्याकडेच राहिली होती. पण कायमचं तिथं राहण्यास तिने नकार दिलं तेव्हासुद्धा.....

'आई मी पाटील होणार.... आबादीचं.'

एवढच तो बोलायचा. राम्याला पाटील व्हायचं वेड लागलं होतं. मनाने तर तो आत्ताच पाटील होता. 'गाय सोडा' हंबरडा फोडीत गायी राखणारा गुराखी पॅन्ट, शर्ट, बुट, गॉगल लावून खुर्चीवर बसून पैशाची दररोज रेलचेल बघेल असं स्वप्नातही वाटलं नव्हतं. सगळं काही घडलं ते आबामुळं, राम्याचे नशीब उजडले होते. पण आबाशी केलेला संघर्ष, एका सत्याशी केलेला बंड तो कायमच अखेरपर्यंत चालू ठेवायचं एवढच त्याला पटत होतं.

आबानी खूप दिवसापासून त्याला पाहिलं नव्हतं. तालुक्याला जातांना त्याच्या धाब्याकडे कधी लक्षही केलं नाही. आबा आज तालुक्याला जायला निघाला. ध्याब्याकडे

आबाचं लक्ष गेलं. 'झुंज धाबा' आबा क्षणभर मनातच हसला. खूप मोठं हॉटेल होतं, हॉटेलच्या मागे रहायला घरही बांधलं होतं. राम्या जणू जीवनाशी झुंज देत आहे असचं आबाला क्षणभर भास झाला. आबाचे पाय धाब्याकडे वळलेत.

दोन तीन गिऱ्हाईक जेवण करीत होती. काही चहापाणी घेत होती. राम्या टेबलावरती डोळ्यावर चष्मा लावून बसला होता. सुगंधी अगरबत्तीचा सुवास आबाच्या शरीरात रोम रोम फुलवत गेला. जणू राम्याचं जुनं रूपच काय स्वभावही बदलला असा किंचित भास झाला. राम्याचं आबकडे लक्ष गेलं. राम्या एकसारखा पहातच राहिला. डोळ्यावर गॉगल काढून लालबुंद टपोऱ्या डोळ्यांनी एकसारखं आबाकडे नजर ठेवून होता. आबा राम्याजवळ टेबलावर येवून बसले.

क्षणभर राम्या विचलित झाला. आबादीचा सूर्य कुठे उगवतो तेही त्याला कळलं नव्हतं.

"काय रं रामा धंदा जोरात चालू आहे वाटतं?"

राम्याला तर आबाची किळस आली होती. पाठीवर उमटलेले वळ राम्या अजूनपावेतो विसरला नव्हता. पण साध्यापणातच तो बोलला.

"चालतं थोडं फार."

"गावाकडं खूप दिवसापासून आला नाहीस, अजून राग गेला नाही का रं आमच्यावरचं."

"पाटीवरचं वळ शाबुत हाय पाटील, मग राग कसा जाणार... काय म्हणतेय आबादी? आता पुरे सुखी झाालात वाटतं."

"कशाबद्दल बोलतोस रं तू!"

"मी कशाबद्दल बोलणार, गावचं पाटील तुम्ही, गावचं खाणार, आमचं थोडचं खाणार."

"राम्या असा पागलासारखा डिवचून काय मिळतय रं?"

"तुम्हाला काय मिळालं मला हाकलून."

"तुला हाकलून मला पश्चाताप नक्कीच झाला. पण आज समाधान वाटतं बघ. "

"एवढं जळता व्हय माझ्यावर?"

"आरं तुला हाकललंच नसतं तर तू रानातच कुठंतरी भटकत असतास, जिथं कुठं जायचं भानही रहात नाही तिथचं तू खडतर जीवन जगत राबराब-राबतच शेवटपर्यंत जगला असतास. त्याचं काय?"

"तुमचही बरोबर हाय, नशीबच असतं, बयरीचं नाय का नशीब फडफडलं तसच माझंही."

आबाला क्षणभर राग आला. बनीचं नाव घेवून डिवचलं होतं. पण किंचितसा भासही निर्माण होवू दिला नाही.

"नशीब घडवणं आपल्याच हाती असतं रं!"

"म्या कुठं नाही म्हणतो."

राम्या आबाकडं पाहतच राहिला. मनात थोडसे दयाभाव उमटले.

"चहा घे इकडे."

राम्यानं नोकराला आवाज दिला. नोकरानं चहा आणला.

"आबा चहा घेता नव्हं, की आमचं गरिबाचं जमणार नाय."

"गरीब, श्रीमंत कोण रं! सगळी माणसच आहोत आपण, फक्त जंगलातल्या रानडुकरानं चवताळणं सोडलं तर तोही माणूस म्हणून जगू शकेल."

“उदाहरण खूप चांगलं येतं पाटील, आमचं काय? जनावरात राहून गाय सोडा हंबरडा फोडणं हीच सवय झालीय.”

आबानं बोलता बोलताच चहा संपवली.

“आबा आज इकडं कुठं निघालात?”

“तालुक्याला जावं म्हणतो थोडसं काम होतं.”

“हं! सहा रूपये.”

नोकर ओरडला होता. कुणीतरी गिऱ्हाईकाने टेबलावर दहाची नोट ठेवली होती. राम्यानं पैसे वापस दिलेत. गिऱ्हाईक खिशात पैसे कोंबीत बाजुने जाणाऱ्या स्त्री कडे पाहातच राहिला. आबाचं लक्ष त्या गिऱ्हाईकाकडे काटेकोर होतं.”

“काय रं राम्या लग्न करणार का नाय?”

“लग्न करून काय मिळतय. असाही सुखी आहेच की मी.”

“मन रमतं रं संसारात, विचारही बदलतात माणसाचे.”

“माह्चे अधुरे स्वप्न पूर्ण झाल्याशिवाय विचारच करायचं नाय.”

“आणखी कसले रे स्वप्न राहिलेत तुझे.”

“तुमच्यासारखा वाडा बांधायचा आबादीत.”

“पैसा तं भरपूर आहे, बांध की वाडा... वाटल्यास मी मदत करीन.”

“मला नको कुणाची मदत, माझं मीच करीन की.”

“गावात राहायचं तर गावाशी संबंध ठेवावच लागतो.”

“समधं पैशानही विकत घेता येतं पाटील.”

"मला नाही पटत तुझं म्हणनं."

"एके दिवशी सारं काही पटेल तुम्हास."

"राम्या वाट पाहणार रं त्या दिवसाची."

आबाशी राम्या असचं काहीतरी वेडंवाकडं बोलत राहिला. आबाशी झालेली ही खूप दिवसानंतरची भेट, आबा मनातल्या मनात राम्याचं बोलणं त्याची जिद्द पाहून हसतच तालुक्याला गेला होता. राम्या आबाकडे एकसारखं पाहातच राहिला. आबाचा स्वभाव पूर्वीसारखाच होता. राम्यानं खूप पैसा जमा केला.

आबादीत कोणत्याही परिस्थितीत वाडा बांधायचं ठरवलं. एक भव्य दिव्य वाडा.आबाच्या वाड्यापेक्षाही खूप मोठा वाडा... राम्यानं आबाशी जीवनाची पैजच जणू लावली होती. आबाशी दिलेली झुंज, आबाशी असलेलं वैर, राम्याला आज सारखी बयरीच दिसत होती.

'कुण्या रानटी माणसाचं गं हे!'

पाठीवरचे उमटलेले वळ, वड्यावरची सभा, हातभट्टी, 'झुंज धाबा'. खूप प्रवास केला होता. जीवनाचं पेच असच असतं पतंगासारखं, धागा धरायचा तर कधी तुटल्यावर पकडायचा, कधी हसत तर कधी रडत समोर जाणं, राम्या वेगवेगळ्या विचारानं भारावून जायचा. ट्रक मोटारीचा वेगवेगळा आवाज त्याच्या हृदयात जणू सलत आहे असच त्याला वाटायचं. कोळश्याच्या भट्टीतून निघणारं लालसर काळसर धूर कुठेतरी वरवर आभाळाकडे पोहचलेलं दिसायचं. राम्याचही जीवन असच आभाळागत पोहचलेलं होतं.

राम्यानं घरकामाला शेजारील गावची बाई ठेवली होती. घरकाम करता करताच तिचे संबंध राम्याशी जुळले होते. आजकाल ती राम्यासोबतच राहात होती. राम्याची मैना होती ती. राम्यापेक्षाही वयानं मोठी, गोरीगोमटी. दारिद्रयानं तिला घरकाम करायला लावलं होतं. तिचं लग्नही झालं होतं. पण पहिल्या नवऱ्यासोबत तिचं कधीही पटलं नाही. सोडचिट्टी झाल्यावर असच दुसऱ्या ठेकेदारासोबत तिचे प्रेमसबंध जुळले

होते. काही दिवस त्याच्यासोबतच राहिली. पण ठेकेदारी संपताच तो पसार झाला होता. मैनेचं सारं शरीर पोखरून .....

रात्रंदिवस दारूच्या नशेत झिंगत असलेल्या ठेकेदाराला मैना आपला पती मानत असे. साऱ्यागावानं तिच्यावर शिंतोडे उडवले. पण हिंमतीनं ती जगतच राहिली. दोन वर्ष मिळेल ते काम करून कधी शरीराचं दुसऱ्यांना सुख देवून... काही दिवसानं राम्या मिळाला होता. पहिल्याच दिवशी राम्या तिच्या नजरेनं घायाळ झाला होता. राम्याला घरकाम करावयास बाई पाहिजे होती. राम्याला मैनेबद्दल सारं काही कळलं होतं. तरीपण राम्यानं तिला आधार दिलं. मैनेचा स्वभाव राम्याशी मिळता जुळता होता. मैना राम्याच्याच हॉटेलात राहायची. गिऱ्हाईकांची नजर तिच्यावर असायची. कधी राम्या फार चिडायचा.

'सालं गिऱ्हाईकबी बेईमान आहेत आबासारखं.' असच समजून तो वागायचा.

एकदा मैनेसाठी ट्रक ड्रायव्हरशी भांडण झालं. हॉटेलात जेवतांना खूप दारू पिऊन तिचं हात धरलं होतं. मैना राम्याला कामात मदत करीत असे.

"काय रं हॉटेलवालं, बाटलीसोबत बाई नाही का मिळणार इथं?"

"माजलास काय रं इथलं खावून?"

"कुणाला माजला म्हणतोस रं!"

राम्याला खूप राग आला होता. ड्रायव्हरच्या थोबाडीत मारलं होतं त्यानं. दारू पिल्यामुळं गलंडला होता. त्याच्या सोबत्यानं त्याला उचलून नेलं होतं. मैना राम्याचा राग पाहून घाबरली होती. राम्या रात्रो मैनेजवळ गेला.

"राग आला व्हयं."

"धाब्यावर असलं चालायचंच, कसलं जी राग त्यात."

"मैने माह्यं प्रेम आहे गं तुझ्यावर."

“असं नका म्हणू जी, तुम्हास माझं पूर्वीचं........”

“माहीत आहे गं सारं, हे जीवनच असं असतं.”

“तरीपण विचार करा व्हयं.”

“कसला विचार करू म्हणतेस, आबादीन टाकलं तेव्हा माझ्या माय बापानंही दगा दिला. आबानं हाकललं, पाठीवरचे वळ अजूनही शाबूत हायेत. मला फक्त पाटील व्हायचं हाय आबादीचं.”

राम्याचे डोळे लालबुंद झाले होते. मैना राम्याकडं पाहून विचलित झाली होती.

“मैना तू देणार का मला साथ.”

“रामा...” म्हणित त्याच्या बाहुत सामावली. मैनेला आनंदाश्रू आले होते. राम्यानं जणू तिला कवेत आकाश घेवून प्रेमानं कुरवाळलं होतं. दोघेही मनोमिलनात धुंद झाले होते. त्यांना कशाचही भान राहिलं नव्हतं. मैनेला खूप दिवसांनी राम्या मिळाला होता. दिव्याचा अंधुकसा प्रकाश.... आभाळात पडलेलं मिणमिणारं टपोरं चांदणं..... रात्रीच्या काळोखात सारं जग झोपी गेलं होतं. मैना लालसर अंधूक प्रकाशात खुलून आली होती. तिचे कुरळे-कुरळे केस तिच्या चेहऱ्यावर आले होते. राम्याला पाहून तिची स्मितहास्यानं खळी बहरून आली. राम्यानं तिला घट्ट मिठी मारली. मैना राम्याकडं एकसारखी पाहातच राहिली. त्याचा हात तिच्या अंगावर सतेज फिरत रोम रोम फुलवित होता. दोघेही रात्रभर तसेच पडून राहिले होते.

राम्या पहाटेलाच उठला. धाबा चालू केलं. मैनेलाही जाग आली. मैनेचं मन प्रफुल्लीत झालं होतं. रात्रीच्या गुजगोष्टीनं ती राम्याची सर्वस्वी झाली होती. राम्याची अर्धांगिनी झाली होती. त्याच्या मनातील मैना होती ती. राम्याचं मैनेशी पतीपत्नी प्रमाणं वागणं सुरू झालं होतं. मैनेच्या गावातही बातमी पसरली. पण तिला म्हणणारं नि

बोलणारं कुणीही नव्हतं. राम्यानं सुद्‌धा आबादीशी टक्कर दिली होती. राम्यानं आपल्या मायबापालाही कधी सांगितलं नाही. एकेदिवशी मैनेनच राम्याला विचारलं.

“तुम्हासोबत राहते तं तुम्ही मला कवा मंगळसुत्र बांधणार जी?”

“मैने माह्यं प्रेम आहे तुह्यावर, म्या तुला वाऱ्यावर सोडणार नाय. माझं स्वप्न आबादीचं पाटील व्हायचं हाय. वाडा बांधायचाय, तोपावेतो तू थांब.”

“तुमच्यासाठी सात जन्मही थांबायला तयार हाय जी.”

राम्यानं खूप प्रेम केलं तिच्यावर, राम्याच्या जीवनात आलेली पहिली स्त्री होती ती. रात्रंदिवस त्याच्या समोर राहायची. राम्या दिवसभर अधून मधून तीच्याकडे पाहात असायचा. मैना गालातल्या गालात हसायची. राम्याही हसायचा. कधी गिऱ्हाईक नसलं की ती त्याच्याजवळ येवून बसायची. राम्या मैनेशी चावटपणे बोलून हसण्यात गुंग व्हायचा. सारं काही तो विसरून जायचा. राम्याचे नोकर त्याकडे डोळे चोरून बघायचे. पण राम्याच्या धाकानं तसं तो मालक असल्यानं कुणीही काही बोलत नव्हतं.

“तुमच्या आई वडीलांना इथं का बरं आणत नाय जी.”

“ते यायलाच तयार नाय. तिथंच मरायचं म्हणतात.”

“आपण जावू का आबादी बघायला.”

“आबादी कधी पाहिली नाहिस का?”

“नाही, कधी जायचं कामच आलं नाय.”

“त्या हलकट गावात जायचं कोणतं काम हाय.”

“मग तुम्ही वाडा कसं बांधताय जी तिथं, इथचं बांधलं तं खूप शान वाढल धाब्याची.”

"तुह्यं बरोबर हाय, पण आबादीशी वैर हाय माझं, त्याच्या विरोधात वाडा बांधायचाय. पाटील व्हायचंयं तिथलं."

"आबादीचं पाटील झाल्यावर धाबा कोण सांभाळील जी."

"पाटलाला काय गावातच राहावं लागतं व्हयं."

"तसं नाय, पण गावातील लोकांनी तुम्हास पाटील करावयास पाहिजे की नाय.

"मैना, पैसा हाय आपल्याकडं, पैशावर नाचणारं तीथलं लोक हाय."

"पैशानं काय सगळच विकत घेता येतं होय."

"सारं काही विकत मिळतं पाहशिल की तू."

"इज्जत, प्रेम नाय मिळत कुठं?"

"इज्जत पैशानच मिळतं मैना, चार पैसं आलं तवापासून कितीतरी आबादीचं लोक नमस्कार करतेत पायलीस ना तू."

"तुमचंही खरचं...पण प्रेम....."

"प्रेमाचं काय? आज आहे उद्या नाय. मायबापाचं नाय तं दुसऱ्याच्या प्रेमाची कुठून अपेक्षा करू म्हणतेस. "

"का? मी नाही का प्रेम देत तुम्हाला."

"मैने प्रेम द्यावं लागत नाय. प्रेम तुह्या माह्या विचारातून आपोआप मिळते. "

"एवढं कुठून शिकलय जी."

"चार वर्ग शिकलो होतो, कुठल्या तरी मास्तराकडनं."

"मग शिकणं का बरं सोडलं."

“शिकून कोणता फायदा होतं. असं माह्या बाप म्हणायचा. दोन वेळचं जेवन मिळावं म्हणून ‘गाय सोडा’ हंबरडा फोडीत गायी राखायला जाणं एवढच समजत होतं तेव्हा.”

“आबाशी झालेल्या वैरामुळं इथपावेतो आला वाटतं.”

“मैने..”

राम्याला राग अनावर आला होता. मैनेला स्वतःची चूक कळली. आबाचं नाव घेताच. मैना क्षणभर स्तब्ध बसली. कुणीतरी गिऱ्हाईक आलं होतं. मैना उठून गेली. राम्या मैनेकडं एकसारखं पाहात बसला. मैनेचं बोलनं पाहून त्यालाही कशाच भान उरलं नव्हतं. मैना हिरमुसून तशीच निघून गेली होती. राम्याला पश्चाताप झाला. मैनेशिवाय आपल्याशी प्रेमानं बोलणारा कुणीही नाही. विचार रेंगाळत होते. समोर असलेल्या हिरव्यागार पिंपळाकडे एकसारखं पाहातच राहिला. खूप खूप उंच झाल्यागत वाटत होतं ते झाड. डोळ्यावर गॉगल चढवला. गिऱ्हाईकानं ऑर्डर दिली. कोळश्यानं भट्टी धगधगत होती. खमंग श्वास येत होता. त्यालाही भूकेची जाणीव झाली......



# १२

**आबानी** बांधलेल्या वाड्यानं आबादी नव्या नवरीप्रमाणं सजलेली वाटायची. शाळेचं बांधकामही केलं होतं. रस्ते, नाल्या, वट्टा, मंदिर, आबानी खूप काही केलं आबादीकरीता. दरवर्षी शाळेतील मुलांना कपडेही घेवून द्यायचे. आतातर ढेकल्याचा सुशिलच तिथं मास्तर होता. सर्वांचं पीकपाणी बरं व्हायचं. आबादीला नवीन वळण लागलं होतं. आबा आबादीसाठी सतत झुंजत राहिला पण आबाचं धिप्पाड शरीर थकत चाललं होतं. तीन चार दिवसापासून आबाला ताप येत होता. शाळेतल्या मुलांना कपडे वाटपाचा कार्यक्रम होता. पण आबाची तब्येत बरोबर नसल्यानं सुशिलने कार्यक्रम पुढं ढकलावं असा बेत आखला. आबा तयार नव्हता. कार्यक्रम ठरल्याप्रमाणचं होणार होता. सगळी तयारी झाली होती. पाटलीनबाई, बनी शाळेतल्या मुलांना कपडे द्यायला जाणार होती. आबा घरीच पडून राहणार होते. सगळे गावकरी शाळेत जमले होते.

बनी, पाटलीनबाई सगळं काम आटोपून सुरेखा, रवीला सोबत शाळेत घेवून गेल्या. सुशिलचं भाषण सुरू झालं. त्याने आबाचे आभार मानले. आबा न येवू शकल्यानं गावकरी हळहळले होते.

बनीनं आपल्या हातानी मुलांना कपडे दिले. सगळी मुलं बनीच्या पाया पडत होती. बनीचा रोनट्या बनीकडं एकसारखं पाहातच होता. अजून लहान होता तो. पुरेपुर समज आली नव्हती त्याला. आईचं पूर्वीचं दुःखही जानू शकला नसता. सुशिल प्रत्येक मुलांची ओळख करून द्यायचा. पाटलीनबाई बनीकडे कपडे द्यायची. बनी मुलांना कपडे देत होती. सगळी आबादी आबाच्या किमयेकडे पहात होती.

ढेकलाप्रमाणं झिजणारा देवमाणूस नव्हता एवढच दुःख होतं. बनी पुढं पुढं कपडे देत होती. एवढ्यात ती थांबली. मनात अफाट विचाराच काहुर आलं. फाटक्या कपड्यात, वाळलेल्या जंगलात काडीप्रमाणं वाळावा असा तो मुलगा दिसला. डोक्याला चार पाच दिवसापासून तेलही लागलं नव्हतं. हातपाय कुत्रं मुतल्यागत दिसत होतं. पायाच्या जखमेवर पिवळ्या लुगड्याची पट्टी बांधली होती. बनी एकसारखी पहातच बसली. पाटलीनबाईचं लक्ष गेलं. मुलगा ओळखीचा वाटला पण नीट आठवत नव्हतं. लहान मुलांना ती फारशी ओळखत नव्हती. बनीनं त्याच्या डोक्यावरनं हात फिरवलं.

“काय झालं रं पायाला?”

“खेळतांना पडलो जी खामद्यात.”

“खूप लागलं काय रं?”

“थोडंस पाय कापलं जी.”

बनीनं मास्तरकडे पाहिलं. मास्तर बनीकडे आलेत. पाटलीनबाईनंही मास्तरकडे नजर टाकली. तिला दया आली.

“मास्तर, शाळेतल्या मुलांना औषधपाणी नाय देत काय?”

पाटलीनबाईनं रागातच विचारलं होतं. सगळे मास्तर तिच्याकडे पाहातच राहिले.

“आम्हाला कळलंही नाही, तो कुठे पडला ते.”

"मग शाळेत लक्ष असतं की गावातच फिरता व्हयं."

"कधी कधी घडत असं, मुलं आम्हाला सांगत नाहीत म्हणून, मग आम्ही तरी काय करणार?"

पाटलीनबाईच्या प्रश्नाचं उत्तर मिळालं होतं. सुशिलने जवळ येवून त्या मुलाला बनीच्या हातातून घेतलं. त्याच्या जखमेवरील पट्टी सोडली. बनी, त्याच्याकडे पहातच राहिली.

"कुणाचं रं मुलगा तू?" बनीनं त्याला विचारलं होतं.

"मनोहर ढोकाचं जी."

बनी क्षणभर थक्क झाली. मन्या ढोक नाव घेताच.... तिचं डोकं गरगर फिरू लागलं. पूर्वीच्या जुनाट आठवणी.... पाटलीनबाईला बनीची व्यथा कळली. पाटलीनबाई बनीला पहातच बसली. बनी हिरमुसून कसल्याशा विचारात त्या मुलास निरखत होती. मन्या ढोकाचा मुलगा होता तो. जनीचा मुलगा. परिस्थितीनं त्याला अधू बनवलं होतं. दोन वेळचं जेवणही मिळत नव्हतं. जनी कशीबशी मुलांचं पोट भरत होती. राबराब राबून काबाडकष्ट करून मुलासाठी झिजत होती. मन्या रानटी वासनेला बळी पडला होता. बनीने त्याला मारलं होतं. खाटेचा किचकिच आवाज... बनीचं ओरडणं ... उन्हाळ्याची आग, मन्याची वासना... ती काठी सारं काही आठवत होतं तिला. शिवासोबत आबादीत आली तेव्हा....

"काय शिक्षा द्यायची रं हिला."

आबाचा न्याय, जनीचं माणसासारखं वागणं, सारं काही तिच्या डोळ्यासमोर तरळत होतं. पूर्वीचे दिवस पालटले होते. बनी आबाची बहिन झाली होती. पाटलीनबाईचं प्रेम मिळालं होतं तिला. रवी, सुरेखा समोर उभे होते. रवी मन्या ढोकाचा मुलगा होता. मन्याच्या रानटी वासनेचा बळी, मंगऱ्यानं तिची कूस भरली नव्हती. मंगऱ्याची इच्छा पूर्ण झाली होती. बनीचं दुसरं लग्न झालं होतं. पाटलीनबाईनं तिच्या

खांद्यावर हात ठेवला. बनी भानावर आली. पाटलीनबाईचे डोळे पाणावले होते. समधे गावकरी पहात होते. जनीही कुठंतरी बसली होती.

“बने, त्याला कपडे दे की.”

पाटलीनबाईनं बनीला म्हटलं. बनीनं पदर हातात धरलं. त्याला जवळ करीत त्याचा चेहरा पुसला. त्याच्या डोक्यावर हात फिरवित केस कुरवाळले, बनीनं त्याला कपडे दिले. तो बनीच्या पाया पडला. मास्तर आणि गावलोक बघतच राहिले.

“आई कुठं हाय रं?” बनीनं विचारलं.

“इथचं बसली हाय जी.”

पाटलीनबाईनं मास्तराकडं लक्ष देताच जनीला बोलावणं गेलं होतं. पाटलीनबाई बनीचं सारं काही मनात समजून घेत होती. जुनाट, मळकट, फाटकं लुगडं, काबाडकष्टानं झिजलेलं शरीर.. जनी बनीसमोर आली. जुनाट आठवणी आणखी स्पष्ट दिसत होत्या. जनीनं बनीला दयेचा हात दिला. वट्टयावर सभेत जनीनं नवऱ्यालाच दोष दिला. सगळी आबादी कशी गप्प बसली होती. प्रत्येकालाच बनीचं पूर्वीचं जीवन आठवत होतं. पाटलीनबाईनं जनीकडे पाहिलं.

“जने, कोणतं काम करतेस व्हयं.”

“शेतकामाला जाते व्हयं, दोन तीन दिवसापासून घरीच हाय”

“मग घराकडे काम मागायला का आली नाहीस.”

“तुमच्याच कामावर होती जी.”

“आमच्याच कामावर होतीस, मग दोन तीन दिवस कुठं गेली होती व्हयं.”

“माह्या पोरीस ताप येत हाय म्हूण घरीच हाय.”

“किती मुलंमुली हाय तुला.”

"एक मुलगा, एक मुलगी ह्यापेक्षा मोठी हाय जी."

"शाळा नाय शिकवत का तिला."

"ह्यावर्षी पैसा आडका नव्हता जी, म्हूण घरीच राहात हाय."

"तुला शेत होतं नवं."

"आहे थोडसं पण बटईनं दिलं हाय, माह्या एकटीनं कुठं जमणार हाय शेतीचं काम?"

"मुलास थोडंफार चांगलं ठेवित जा."

"व्हय जी."

"सायंकाळी वाड्यावर येवून भेट." बनीनं जनीला म्हटलं होतं.

"व्हय जी."

जनी जायला निघाली, तिचा मुलगाही तिच्या मागे मागे गेला होता. बनीचं सारं काही जीवन एकाच ठिकाणी सामावलं होतं. ह्याच आबादीनं बनीला आधार दिलं होतं. बनीनं सर्व मुलास कपडे दिले. काही मुलांना आर्थिक मदतही दिली. समधी आबादी आपआपल्या घराकडे निघाली. आबाच्या उपकाराचं ऋण फेडण्याचा संकल्प करीत.

आबा पाळण्यावरती उठून बसले होते. रंग्या आबाचे पाय चेपत होता. बनी, पाटलीनबाई शाळेतून घरी परतल्या होत्या. रंग्या उठून उभा राहिला. रवी, सुरेखा आबा. .. आबा करीत धावत आले. पाटलीनबाई घरात चहा आणायला गेली.

"झालं व्हयं कपडे वाटून."

"व्हयं जी." बनीनं आबाला उत्तर दिलं होतं. बनी आबाचे पाय चेपायला लागली.

"आता बरं वाटतं व्हयं तब्येत."

“थोडसं ताप उतरला, वाटलं यावं शाळेकडं पण तुम्ही असल्यावर माह्यं कोणतं काम? रंग्याचेही काम उरकले होते. म्हणून बसलो दोघही इकडं तिकडंच्या गोष्टी करीत.”

“पाय दुखतात व्हयं तुमचं.”

“राहू दे गं बने, कुठले पाय दुखतात. थोडं ताप आहे एवढच.”

“मग रंग्या पाय चेपत होता नवं.”

“रंग्याले बिना कामानं जमते व्हयं, बिचारा बसला पाय चेपित.”

“खूप साधा माणूस आहे जी तो, तुमच्यासाठी खूप राब राबतोय.”

“अशी देव माणसं भेटतात व्हयं. मागच्या जन्माचं पुण्य असल बघ.”

पाटलीनबाई चहा घेवून आत आली. रवी, सुरेखा बाहेर पळाली होती. त्यांनाही हाक मारली. रंग्या अंगणात गुरांना चारा टाकीत होता. तोही आला. सगळे आबा समोर बसून चहा घेवू लागले.

“नवं मास्तर कसं हाय.”आबानं विचारलं.

“ह्यांचं आजकाल शाळेवर लक्ष दिसत नाय.” पाटलीनबाईनं म्हटलं.

“का बरं! काही वाईट तर नाही घडलं.”

“तसं नव्हे जी, पण मुलांची तब्येत, त्यांचं वागणं, बोलणं ह्यावर लक्ष ठेवायला पाहिजे.”

“उद्या जावं लागेल, मास्तरांना भेटायला.”

“आबा, आज जनीला वाड्यावर बोलावलं जी.”

बनीनं आबाला हिरमुसत म्हटलं होतं. आबानं खूप दिवसानंतर जनीचं नाव ऐकलं होतं. आबालाही जुनाट आठवणी आल्यात. काहीतरी विपरीत तर घडलं नाही ना! असा किंचितसा भासही झाला पण मनाने धीरगंभीर होत बनीलाच विचारलं.

“काही काम होतं का?”

“व्हय जी, ती खूप गरीब हाय, तिची मुलगी तापानं हाय म्हणे. मुलगा कसा काडीसारखा वाळला. म्हटलं थोडीफार मदत कराल म्हणून बोलावलं.”

“एवढंसच काम? वाटेल तेवढी मदत कर व्हयं.”

“थोडेफार खर्चाला पैसे देवून द्याल तर बरं होईल.” पाटलीनबाईनं म्हटलं होतं.

“जनीच्या मुलाचे खूप हाल झालेत. जनीला वाड्यावर बोलावण्यापेक्षा तिच्या घरीच जायला पाहिजे होतं.”

“पण आता बोलावलच आहे तर येईलच.” पाटलीनबाईनं म्हटलं.

“गरिबाच्या घरी गेलं....थोडंफार बसून चार गोष्टी केल्या की त्यांना समाधान मिळतं.

आता इकडे येणारच आहे तर ठिक आहे.”

सुरेखा आबाकडं धावतच आली.रोनट्याही तिच्यामागणं धापा टाकत येत होता.

“एकमेकामागं धावता, पडाल की रं.” सुरेखा आबाकडं धावतच आली.

“बाबा...आम्हास अक्काने शाळेत कपडे दिले नाही.” आबा क्षणभर हसला.

“तुला खरचं कपडे पाहिजे व्हयं.”

“सर्व मुलास दिलं, आम्हास का बरं नाही.”

“आता अक्कालाच विचार.”

सुरेखा बनीकडं पाहू लागली. बनी, पाटलीनबाई, सुरेखा, रोनट्यास पाहून हसत होते.

“तुला कपडे पाहिजे व्हयं, आबा तालुक्याला गेले की आणतील हं!”

“मला शाळेतलं कपडे पाहिजे.”

“सुरेखा, कपडे शाळेतल्या मुलांचे होते. तू शाळेत गेली ना की तुलाही भेटतील तिथं. शिवाय तुला भरपूर कपडे आहेत. असं हट्ट नाही करायचा बरं का!”

“नाही मला आत्ताच कपडे पाहिजे.”

“सुरेखा...” आबाला राग आला. सुरेखाचा हट्ट वाढतच चालला होता.

“बरं! आमच्या लाडक्या सुरेखास उद्या नवे कपडे घेवून देवू मग तर झालं.”

“खरच आई, घेवून देशिल का?”

“हो, जा आत्ता खेळायला.”

सुरेखाच्या मागे रवीही खेळायला पळाला. बनी त्याच्याकडे एकसारखी पहातच राहिली. सुरेखाला अजूनही बऱ्याचशा बाबी कळत नव्हत्या. तिच्या आईनं तिला होकार दिलं होतं. बनी, पाटलीनबाई आतमध्ये गेली होती. आबा पाळण्यावर बसून तसेच विचार करीत बसले. रंग्याही आपल्या कामात गुंग झाला होता. शिवाची बायको आता घरकाम करायची. शिवा समधं शेत सांभाळायचा. आबाला कशाचीही काळजी उरली नाही. असचं हसत घरच्या मंडळीशी जगावं लागणार होतं. आबाला झोप येत होती. आबा पाळण्यावरच झोपी गेले. दोन तीन दिवसापासून आज ताप कमी झालं होतं. पण थकवा आल्यासारखं वाटत होतं.

सायंकाळी जनी आपल्या मुलास घेवून आली होती. आबा झोपलेले होते. जनीसोबत बनी पाटलीनबाई मनमोकळ्या बोलत होत्या. जनीला खर्चाला पैसे दिले. जनी पाटलीनबाईचा निरोप घेवून गेली. मन्याच्या वासनेनं जनीचं घर उद्ध्वस्त झालं होतं. जनीही मन्याच्या वासनेमुळे अखेरची झुंजत राहिली होती. मुलांबाळासाठी....... बनीनेही जीवनाशी झुंज दिली. आबानी सावरलं होतं तिला पण जनीला कोण सावरणार होतं? आबादीचा आधारच तिचं जीवन होणार होता. अखेरपर्यंत जनीला जीवनाशी झुंज द्यावी लागणार....

ooo



# १३

आबादीचं हिरवगार शेत हवेत तरंगत होतं. आबादीवरून वाहणारी नदी नागमोडी वळण घेत दूरवर कुठंतरी जात होती. आबादीत आज राम्या मायबापाची भेट घेण्यास आला होता. आबाच्या वाड्यासमोरच राम्याची जुनी जागा होती. राम्यानं तिथं वाडा बांधायचं ठरवलं. काडीकचऱ्यानं ती जागा माखली होती. राम्या जागा पाहून गेला. जातांना आबाच्या वाड्याकडे पाहिलं. आबाशी भेटावं असा विचारही न आणता जुन्या आठवणी मनात साकारत तसाच निघून गेला. महाग्याला मुलास बघून बरं वाटलं. राम्यानं महाग्यास सांगितलं.

“बावा, वाड्याचं काम सुरू करायचं हाय.”

“कवा करतस रं.”

“दोन चार दिवसात सुरू करेन, कामावर माणसं मिळतील व्हयं.”

“आबादीत माणसाची काय कमी हाय रं?”

“म्या आबाच्या वाड्यापेक्षा मोठा वाडा बांधणार हाय.”

“पैसा लागलं रं खूप.”

“पैशाला कोण विचारतं व्हयं, आपल्याकडं भरपूर पैसा हाय.”

राम्या मनातल्या मनात सुखावला होता. राम्या खूप मोठा झाला होता. जिद्दीनं जीवनाशी झुंज देत समोर गेला पण राम्याचा स्वभाव तसाच राहिला. कडू कारल्यांना गोडपण कधीही येणार नव्हतं. एवढचं महाग्याला समजायचं.

राम्यानं दोन तीन दिवसातच सगळं सामान तालुक्यावरनं बोलावलं. इंजिनिअरला हातात घेवून काम सुरू झालं. आबादी कामात गुंग झाली होती.

आबानं आबादीला रोजगार मिळावं, उपासमार होवू नये म्हणून वाडा बांधला. रामा स्वतःच्या प्रतिष्ठेसाठी, आबाशी दिलेली झुंज, आबाशी असलेलं वैर, बयरीशी झालेली चकमक ह्या करीता वाडा बांधत होता.

‘मला आबादीचं पाटील व्हायचं हाय!’

एवढच भान उरलं होतं. आबाच्या वाड्यापेक्षाही सुदंर वाडा तयार होत होता. आबा एकदा वाड्याचं कामही बघायला गेला. पण राम्या तिथं नव्हता. राम्या अधूनमधून यायचा. सध्या धाबा मैना सांभाळायची. महिना उलटला होता. वाड्याचं काम तसचं सुरू राहिलं. राम्या खूप मोठा माणूस झाला होता. समधी आबादी त्याला नमस्कार करायची. राम्यालाही मान पाहिजे होता. आबादीत राम्याला इज्जत मिळवायची होती. राम्यानं एकदा मैनेलाही सोबत आणलं. मैनेनं पहिल्यांदाच पाऊल ठेवलं. मैना राम्याचं पूर्ण होणारं स्वप्न पहातच राहिली. समोर दिसणारा आबाचा वाडा पाहून राम्याचे टपोरे डोळे लालबुंद झालेले पाहतांना क्षणभर ती घाबरायची. समध्या गावाला माहित झालं होतं. राम्यानं मैनेला घरात ठेवलं पण कुणीही त्याला काहिही बोलू शकला नाही.

“ही कोण रं तुह्यासोबत?” महाग्यानं विचारलं.

“माही बायको हाय, तुमची होणारी सून.”

महाग्या राम्याची आई मनातच प्रफुल्लीत झाली होती. राम्यानं गोरीगोमटी सुंदर मुलगी बघितली होती. पण तिचं पूर्वीचं जीवन कुणालाही माहीत नव्हतं. मैना तीन

चार दिवस आबादीतच राहिली. सासुसासऱ्यांची मनोभावे सेवा केली. राम्या धाब्याकडे गेला होता. सध्या धाब्याकडे दुर्लक्ष झालं होतं. नोकरांच्या भरोशावर धाबा चालायचा. पण राम्याचे नोकर कधीही त्याला दगा देत नव्हते. आबादीत कडाक्याची थंडी पडली होती. मेंढरानही कुडकुडावं अशीच थंडी असायची आबादीत.

वाड्याचं काम सुरूच होतं. उन्हाळ्यापर्यंत काम पूर्ण व्हावं, एकच ध्यास होतं राम्याला.

‘आबादीचं पाटील व्हायचं हाय मला.’

खामदद्यात झालेला संघर्ष अजूनही राम्याला आठवत होता. सारी आबादी राम्याच्या पाठीवर पडणारी लाथ पहात होती. राम्याच्या डोळ्यात अजूनही आबासलतच होता. आबाशी केलेलं बंड, एका सत्याशी दिलेली झुंज. आबाला कायमचं नष्ट करायचं होतं. राम्यानं तसा बेतही आखला होता. आबादीसमोर आबाची इज्जत घालवायची, त्याशिवाय राम्याच्या मनाला शांती मिळणार नव्हती. राम्याचं स्वप्न पूर्ण होणार होतं. विटांशी विटा जोडून इंच-इंच वाडा उंच होत होता. राम्यानं जणू आकाशाला गवसणी घातली होती. एक गुराखी जीवनाशी झुंज देत समोर जात होता. मैनेच्या प्रेमात गुंतलेला राम्या टपोऱ्या डोळ्यात लालबुंद जिद्द घेवून हिरव्यागार आबादीत असाच वावरत राहणार. आबा मनोमन सुखावला होता. राम्याचं ध्येय फळास येतं एवढच समाधान त्यांना मिळणार होतं.

महाग्याचा आधारस्तंभ मजबुत होणार होता. बनी, राम्याने केलेली चूक विसरून पाटलीनबाईशी त्याची प्रशंसा करायची. राम्या धाबा चालवूनही वाड्याकडे लक्ष देत होता. मैनेचा आधार त्याला मिळाला होता. वाडा पूर्ण व्हायला थोडेफार दिवस लागणार होते. राम्या पहिलं स्वप्न पूर्ण करणार होता. एकएक दिवस हवेच्या झोकात तरंगत जात होते. हिवाळा संपण्याच्या वाटेवर आला.

आबादीचा आबा देवमाणूस, गावचं पाटील पण राम्या आबाच्या बरोबर जावून बसणार. आबा प्रमाणं राम्याही श्रीमंत झाला होता. आबादीचं एक गुराखी

नशीबानं जीवनाशी झुंज देत समोर जातो. एवढच आबादीकर बघत होते. आबादी पूर्वीपेक्षा खूप बदलली होती. पण जुन्या रूढीपरंपरा अजूनही चालत होत्या. आबादीला पोळा, होळी आनंदाचा सण असायचा. संपूर्ण आबादी एकजुटीनं नाचायची, गुंग व्हायची. पोळ्याचा उत्साह केव्हाच संपला होता. कधी तर पावसाच्या पाण्यानं आबादीचा आनंद पुराप्रमाणं निउत्साहात वाहात जायचा. पण होळीला तसं कधीही होत नव्हतं. होळी जवळ आली होती. वाड्याचं काम दोन दिवस बंद राहणार होतं. राम्या होळीला आबादीलाच राहणार होता. होळी पेटवण्याचा पहिला मान आबाला असायचा. आबाच्या हातानं पूजापाट व्हायचं. राम्याच्या डोळ्यात होळीचं चित्र स्पष्ट दिसू लागलं.

‘आबादीचं पाटील व्हायचं हाय.’

होळी पेटवण्याचा पहिला मान आपल्यालाच असावा, पण आबादी ह्याला तयार झाली नसती. राम्याच्या मनात काहुर माजलं. पाटील व्हायचं तर होळी पेटवावीच लागेल. आबाशी झुंज द्यावीच लागणार एवढच त्याला पटत होतं.राम्यानं मैनेला तसं बोलूनही दाखवलं.

“मैना, ह्यावर्षी होळीला आबादीतच राहायचं व्हयं.”

“तुमचं मत असल तं मलाही राहायला आवडेल जी.”

“दरवर्षी आबानी होळी पेटवावं, मला नाय पटत. ह्यावर्षी म्याच होळी पेटवणार हाय.”

“पण आबादीचं लोकं.....”

“लोकांशी काय? आबाशी झुंज द्यायचं म्हणतो.”

“पण प्रेमाने आबाला हक्क मागितले तर...”

“हरामी माणूस तयार होईल व्हयं.”

“का नाही? पण आबानं काही बरं वाईट केलं तर.”

"पूर्वीसारखं गुराखी नाय आता. माह्यं मनगट लोखंडाप्रमाणं झालं."

"पण आबाचे माणसं..."

"पुढचं पुढं पाहू."

मैनेच्या मनात सारखी काळजी वाटायला लागली. मैनेचं मन त्या बाबीला तयार नव्हतं. जिद्दीनं संघर्ष करणारा कोंबडा मैदानातून थोडच पळून जातो व्हयं. अखेर पर्यंत झुंजतच राहणार. राम्याचा स्वभाव मैनेलाही खूप आवडायचा. आबाने पाठिवर दिलेले वळ राम्या विसरायला तयार नव्हता.

आबादी सकाळपासून वेगळीच भासत होती. वाड्याचं काम होळीमुळं बंद होतं. राम्या दुपारीच मैनेबरोबर आबादीला आला होता. राम्याचा धाबा दोन दिवस बंद राहणार होता. राम्याचं नोकरही होळीला जाणार होते. लहान-लहान मुलंबाळ प्रत्येक घरातनं लाकडं जमा करीत होते. त्यांच्यात वेगळाच उत्साह संचारला होता.

'एक एक लकडी गुलाब बाबा की झोपडी.' म्हणत सगळे मुलं मोठमोठी लाकडे उचलून खामदघासमोर आणून टाकत होते. रातच्याला तिथंच होळी पेटणार होती. आबादीच्या सगळ्या स्त्रिया सण करण्यात गुंग होत्या. आबादीची समधी माणसं गप्पा करीत हसत बसले होते. मैना घरकामास मदत करीत होती. पण तिचं मन विचारात गुंतलं होतं. राम्या खूप आनंदित होता. बनी, पाटलीनबाई, शिवाची बायको घरकामात गुंतल्या होत्या. आबानं गरिबांना होळी साजरी करण्यास पैसेही दिले होते. आबादीच्या शाळेलाही सुट्टी होती. आबा गावात फेरफटका मारण्यास शिवा सोबत गेला होता. आबाच्या मागेमागे शिवाही जात होता. खामदघात काही मुलं खेळत होती. आबाचं लक्ष गेलं. आबाला वाटलं जुगार चालू असावं. आबा मुलाजवळ गेले. मुलं सगळी चुपचाप बसली. सगळं शांत शांत झालं. जणू तिथे कुणीही नव्हतं.

"काय खेळताय रं?"

"आबा, 'पो' खेळतोय जी." कुणीतरी हलक्या स्वरात म्हटलं, आबा किंचितसा हसला. आबा लहान असतांना 'पो' खेळायचे, तेव्हा खूप मजा यायची.

"मी खेळावं म्हणतो."

"या खेळा जी." कुणीतरी म्हटलं, आबा हसले.

"घाबरता व्हयं. तुम्हीच खेळा रं!"

आबा तिथून जाणार एवढ्यात खामदच्यासमोर पडलेल्या लाकडाकडे आबाचं लक्ष गेलं.

"लाकडं गोळा झालीत का रं?"

"झाली जी, ह्यावर्षी पाच दिवस होळी पेटणार हाय."

"खूप लाकडं जमा केलीत वाटतं."

आबा मुलांचा निरोप घेवून शिवासोबत देशमुखाच्या घराकडे गेला. थोडा वेळ देशमुखाशी बोलायला. घरीही राहून करमणार नव्हतं. आबाच्या मनात मुलांचा चालू असलेला खेळ डोळ्यासमोर तरंगत होता. पांडवांनी कौरवासोबत खेळलेला तो 'चौसर' आबाला आठवू लागला. कौरव पांडवांचा तो संघर्ष, कौरव पांडवांची ती झुंज, अखेर सत्याला विजय मिळाला होता. मुलंही तोच खेळ खेळत होती. पण त्याचं स्वरूप फार बदललं होतं. आबाला पूर्वीच्या अशाच आठवणी येत होत्या.

खामदच्यासमोर समधे आबादीचे लोक जमा झाले. खंड्या, नंद्या, झिंगऱ्या होळीचे लाकडं रचत होते. आबा नववस्त्र परिधान करून, कपाळावर लांब भगवा टिळा, उंच धिप्पाड, दाढी, भरदार मिशा, जाड भुवया, हातात धोतराचा शेला घेवून झपाझप पावलं टाकीत आले. हातात काठी घेवून मागेमागे रंग्या येवून उभा राहिला. होळीची लाकडं रचून झाली होती. आबादीचा सूर्य अस्ताला गेला होता. अंधुकसा अंधार

आबादीत सर्वत्र पसरत होता. घरोघरी दिव्याचा मंद प्रकाश मिणमिणत होता. आकाशात पौर्णिमेचं चंद्र आबादीचं स्वागत करीत होता.

“आबा देवळात नारळ फोडण्यास चला की.”

खंड्यानं आबाला म्हटलं होतं. आबा पूजेचं सामान घेवून हनुमंताच्या देवळात पूजा करण्यास निघाले.

“थांबा पाटील! आज पूजा म्या करणार हाय.”

लोकांच्या मागून राम्या पुढं येत वाघासारखी डरकाळी फोडत ओरडला होता. राम्याचा संपूर्ण वेश बदलला होता. राम्याही नवीन धोतर, कुडता, कपाळाला लांब टिळा, हातात पूजेचं सामान घेवून आबा समोर आला. समधी आबादी राम्याकडे पाहून कुजबूज करू लागली. काहीतरी विपरीत घडणार होतं. आबा राम्याकडं एकसारखं पाहात राहिला. आजपावेतो आबाच्या वडिलानंतर आबानीच होळी पेटवली होती. पहिल्यांदाच असं विपरीत घडलं होतं. आबा पूजेला जातांना राम्याने त्यांना थांबविलं. आबाला राग आला पण आबादीसमोर बोलून दाखवायचं नव्हतं. आबाला माजरीनं आडवं जावं नि दुधात माशी पडावी अगदी असच अपशकून घडलं होतं.

“पाटील, आज मी होळी पेटवणार हाय. आठवतं व्हयं पाटील, ह्याच खामदयासमोर मारलं होतं मला, खूप रडलो... तुमच्या पायाही पडलो, पण तुम्हास दया नव्हती आली. वट्ट्यावर सभा घेवून गावातनंही हाकललं.”

क्षणभर राम्या उंच आवाजात बोलतांना थांबला, आबा त्याच्याकडे पाहातच राहिला.

“तू होळी पेटवणार व्हयं, मग कर की पूजा. तुही माणूसच हाय आबादीचं.”

“माणूस नाय आबा, आजपासनं मी पाटील हाय आबादीचं.”

समधी आबादी कुजबूजत होती. रंग्याला राग आला होता. मुठीने काठीला घट्ट पकडून दात ओठ खात राहिला. राम्या देवळाकडे वळला. आबाच्या जवळून मंदिरात पूजेस निघाला. सगळी आबादी कुजबुजत होती. कुणीही राम्याशी बोलण्यास तयार नव्हते. आबा राम्याकडे बघत पूर्वीचं सारं काही आठवत राहिला. महाग्याही क्षणभर दचकला. आपल्या पोराचं कृत्य पाहून ......

“थांब राम्या! तू या गावचं पाटील नाय, होळी आबाच पेटवणार.”

देशमुख पंच जोरानं राम्यावर ओरडला. राम्या देशमुखाकडं वळून पाहू लागला. राम्याचं टपोरं डोळं लाललाल झाल्यागत वाटत होतं.

“मला अडवणारं कोण रं तू? ह्या आबादीची हिंमत असल तर हात लावून दाखवावं. एक एकाचं मुडदे पाडल्याशिवाय राहणार नाय.”

समधी आबादी भयभित झाली होती. राम्या कावरल्या कुत्र्यागत चवताळला होता. आबा क्षणभर स्तब्ध राहिले.

“राम्या, गावचं पाटील होता येत नसतं, लोकच करतात व्हयं.”

“आबा, मला शहानपण नको शिकवूस. गावाला लुबाडून मोठं झालास. माह्यासारखं हिमतीवर कमावलं असतं तवा समजलं असतं.”

आबाला राग आला होता. आबानं हाताच्या मुठी घट्ट आवळल्या.

“असल हिंमत त्यानं अडवावं. काय रं आबादीवालं? आजपासून म्या हाय तुमचा पाटील!”

आबादी एकमेकाशी कुजबूजत होती.

“राम्या माजलास व्हयं. आबादीशी लढतोस काय रं?”

“देशमुखा मधेमधे टरटर करतोस, हिंमत असेल तर आबादीच्या सर्व माणसांना बोलाव.”

राम्या हातात पूजेचं सामान घेवून दोन पावलं पुढे गेला. राम्यानं सगळ्याकडे नजर टाकली. देशमुख, आबा स्तब्ध उभेच दिसले. आबा राम्याकडे पाहातच राहिला. रंग्याचा राग अनावर होत होता. आबानं फक्त हुकूम द्यावं एवढच बाकी राहिलं होतं.

“राम्या, होळी आबाच पेटवणार.”

लोकांमधून कुणाचा तरी आवाज आला. आबादी एकाच आवाजात ओरडत होती.

“राम्या थांब, होळी आबाच पेटवेल.”

राम्या थांबला, वळून लोकाकडे पाहू लागला. सगळे आपसात कुजबुजत होती.

“हो....आबाच होळी पेटवेल.” असं सगळे ओरडू लागले. आबाचं मन प्रसन्न वाटायला लागलं. आबा स्तब्धपणे राम्याची करामत पाहू लागले. राम्याचा राग भडकला होता. संपूर्ण आबादी त्याच्या विरोधात बोलू लागली. राम्यानं हातचं पूजेचं ताट आबावरती भिरकावलं. श्रीकृष्णाच्या चक्राप्रमाणं गरगर फिरत आबाच्या मानेवरती येवून बसणार, आबा भयभित झाले. आबाच्या डोळ्यासमोर गरगर फिरणारं ताट दिसलं.

क्षणभर डोळयांच्या पापण्या बंद झाल्या. किंचितही बाजुला व्हायला वेळ मिळालानाही. देशमुख पंचाच्या तोंडून ‘आबा’ जोरदार किंकाळी फुटली. समधी आबादी आबाकडे स्तब्ध पण टपोरे डोळे फाडून पाहातच राहिली. राम्याचे लालबुंद डोळेही त्वेषाने आबाकडे पाहातच होते. रंग्या डोळे रोखून पाहातच राहीला. हातात घट्ट पकडलेली काठी, चेहऱ्यावर फुटलेला घाम, डोळ्यावर पसरलेला अंधकार, रंग्या जोरात ओरडला.

‘राम्या........’

क्षणभरही डोळ्याची पापणी उघडझाप न करता गरगर फिरणारा पूजेचं ताट आबाच्या मानेवरती आलं. रंग्यानं हातातली काठी आबाकडे आडवी केली. चक्राप्रमाणं फिरणारं ताट 'छण.....' आवाज करीत खाली पडलं होतं. समधं पूजेचं सामान विखरलं होतं. रंग्यानं आबाला जीवदान दिलं होतं. समधी आबादी आबाकडं पाहातच राहिली. राम्याचे टपोरे डोळे आबाला निरखत होते. रंग्या हातातली काठी घेवून त्वेषानं धावला. राम्याला क्षणभरही बाजुला सावध व्हायचा वेळ मिळाला नाही. राम्या खाली पडला. रंग्यानं जोरदार राम्याच्या डोक्यावर वार केला. समधी आबादी क्षणभर स्तब्ध होती. सार काही शांत झाल होतं. राम्याला गुंगी आली होती. महाग्या लोकामधनं धावत आला. 'राम्या' म्हणत त्याला पकडलं. राम्या तसाच पडला होता. रंग्याला कशाचही भान उरलं नव्हतं. रानडुकराप्रमाणं चवताळून धावला होता. स्वतःच्या मालकावर, देवमाणसावर केलेल्या हल्ल्यानं तो राग आवरू शकला नाही. आबाला क्षणभर काहीही कळलं नाही. डोळ्यासमोर चक्राप्रमाणं गरगरणारं ताट, रंग्याची काठी, पडलेला राम्या, आबा भानावर आला. रंग्या हातात काठी घेवून तसाच पाहात राहिला. आबाचं मन गहिवरलं.

"राम्या" म्हणत महाग्या पाठोपाठ आबाही धावला.

"पाणी घे रं!" आबा भितीने हळूच बोलले.

कुणीतरी पाणी दिलं होतं. आबानी राम्याला हाताशी धरून पाणी पाजलं. महाग्याला अश्रू आले. महाग्या एक शब्दही बोलू शकत नव्हता. देशमुखही आबाच्या मदतीला आले. सारी आबादी गारवड्याचा खेळ पाहल्यागत आबाच्या सभोवती जमली होती. आबाला घाम आला. दगडा सारखा कणखर, झाडासारखा उंच धिप्पाड शरीर, ढेकलासारखा विरघळला होता. आबाच्या डोळ्यातून अश्रू पडत होते. राम्या शुद्धीवर नव्हता. रंग्याची काठी जोरात लागली होती. आबा राम्याकडं पाहातच राहिला. राम्याचा कण्हण्याचा आवाज आला. आबाला थोडसं बरं वाटलं. महाग्या रडत होता. आबानं बाजुला पाहिलं. रंग्या एखादया चोराप्रमाणं हातात काठी घेवून उभा होता. आबा उठून उभे झाले. आबाचा राग अनावर झाला. डोळे लालसर दिसू लागले. रंग्याला आबाचा राग कळून आला. त्याचं हृदय धडधडायला लागलं. आबानं रंग्याच्या थोबाडात मारली

होती. रंग्याला आबानी मारलं होतं. रंग्याची मान खाली वाकली. देवासमोर मान टाकावी तसाच रंग्या उभा होता. आबाकडे पाहून रंग्या घाबरला. समधी आबादी आबाकडे पाहात होती. क्षणातच गहिवरलेलं मन कठोर बनलं. आबाच्या जीवावर उठलेला राम्या तसाच पडून होता. आबानं राम्याकडे पाहिलं.

"उचला रं याला."

आबानी गावकऱ्यांना म्हटलं होतं. आबाचं आवाज येताच रंग्यानं राम्याचे पाय उचलले. खंड्या, नंद्यानं राम्याला त्याच्या घराकडे घेवून गेले. महाग्या पोरासोबत रडत रडत जात होता. आबा झपाझप पावले टाकीत राम्याच्या घराकडे गेले. समधी आबादी राम्याच्या मागोमाग जात होती. राम्याची झुंज वाऱ्यासारखी आबादीत पसरली. समधी आबादी राम्याच्या घराकडे येत होती. प्रत्येक घरातून मिणमिणते दिवे दिसत होते. बराच उशीर झाला होता. अजूनही होळी पेटली नव्हती.

राम्याला खाटेवर ठेवलं. राम्याला पाहाताच मैना रडू लागली. राम्याची आईही ढसाढसा रडू लागली. महाग्या आपल्या आधारस्तंभाकडे उदास नजरेने एकसारखा पाहात होता. आबानं धोतराच्या शेल्याने राम्याचं घाम पुसलं. मैनेने आबाकडे पाहिलं. मैनेचं मन आज दिवसभर विचारात गुंतलं होतं. राम्याला बघताच आबाचा तिला राग आला होता. पण राम्याशी संघर्ष करणारा माणूस राम्याची सेवा करतोय, तिचा स्वतःवर विश्वासही बसत नव्हता. कुणीतरी वैद्याला बोलावून आणलं. वैद्यानी राम्याच्या डोक्यावर पांढरं लेप लावलं. वाळलेल्या पानाचा काडा करून पाजला. आबा एकसारखं वैद्याकडे पहातच होता. राम्याचा कण्हण्याचा आवाज आला. 'आई....आई...'

राम्याला पाणी प्यायला दिलं. राम्या शुद्धीवर आला होता. हळूहळू डोळ्याच्या पापण्या उघडल्या. क्षणभर त्याला काही कळलचं नाही. दिव्याच्या मंद प्रकाशात धिप्पाड भरदार मिशा असलेला आबा दिसला. क्षणभर डोळे बंद केले. हळूहळू आणखी डोळे उघडले. आईचा रडण्याचा आवाज येत होता. समोर आबा बसले होते. बाजुला वैद्य, रंग्या, खंड्या उभे होते. राम्या आबाकडं एकसारखा पाहातच राहिला.

आबानी हनुमंताची पूजा केली. नारळ फोडलं. खामदद्यासमोरील होळीच्या पाया पडून होळीला पेटवलं. आबा एकसारख्या विचारात होळीला प्रदक्षिणा मारत होता. पहिली प्रदक्षिणा पूर्ण झाली होती. सतत आबाच्या डोळ्यासमोर राम्या दिसत होता. राम्यानं केलेलं बंड, राम्यानं भिरकावलेलं चक्राप्रमाणं येणारं ताट, रंग्याची काठी, राम्याचं बेशुद्ध पडणं, सारं काही आठवत होतं. समधे आबादीकडे पाहात होते. होळी धगधग पेटत होती. अग्नीच्या उंच-उंच ज्वाला जात होत्या.लाकडाचा धूर उंच जातांना दिसत होता. आबाच्या पाच प्रदक्षिणा पूर्ण झाल्या, होळीला नैवेद्य दान दिलं. होळीला परत नमस्कार केला.

“हे अग्नीदेवता, माझ्या अंगी दुष्ट प्रवृत्ती, द्वेष, मत्सर, राग, लोभ कधीही येवू देवू नकोस. आलच तर हे अग्नीदेवते तू या शरीराची होळी कर.”

समधी आबादी आबाकडे पाहात होती. आबानं होळीला असं पहिल्यांदाच वरदान मागीतलं होतं. आबा गावकऱ्याकडे पाहात बाजुला झाले. बराच उशीर झाला होता. समधी आबादी होळीची पूजा करत होते. शिवानं सगळयांना पुरणपोळीचा प्रसाद दिला. आबाला राम्याची आठवण झाली, राम्या नव्हताच. पुरणपोळीचं गोड प्रसाद खावून गोड बोलायला. आबाचे पाय घराकडे वळले. झपाझप चालणारे पाय अंधुक प्रकाशात थकल्यासारखे, संथ वाहणाऱ्या नदीप्रमाणं हळूहळू पडत होते. मागेमागे शिवा, रंग्या चालत येत होते.

आबादीची होळी संघर्षमय झाली होती. राम्या शुद्धीवर आला. मैनेनं त्याला गोड पुरण चारलं. मैना त्याकडे पाहून हसली. राम्या मैनेकडं पाहातच राहिला. राम्याच्या आईचे डोळे पाणावले होते. राम्या दुःखी मनाने एक एक घास गिळत होता. राम्यास कुणीही काही बोलले नाही. राम्याचं डोकं दुखत होतं. राम्यानं डोक्यास हात लावलं. पूर्वीपेक्षाही डोकं थोडसं जड वाटलं. राम्याला झोप येत होती. राम्या झोपी गेला. महाग्या, राम्याची आई, मैनाही झोपी गेली. तिघांच्याही मनात विचारांचा समुद्र लाटांचे लव्हाळे घेत होता.

आबानी दुःखी अंतःकरणाने जेवण केलं. जेवतांना सारखी राम्याची आठवणयेत होती. बनी, पाटलीनबाईलाही सारंकाही शिवाकडून कळलं होतं. रंग्यानं आबासोबत जेवतांना एकदाही वर पाहिलं नाही.

“रंग्या, रागाला आलास काय रं?”

“नाही जी, रागाच्या भरात माह्या हातून काठी सुटली, मलाही समजलं नाही. ”

“आरं! पिसाळलं कुत्र चावलं म्हणून आपण त्याला चावू नये.”

आबाचे बोल ऐकुण रंग्याचे डोळे पाणावले.

“तुम्ही त्याला होळी पेटवू दिली असती का जी?”

पाटलीनबाईनं आबास विचारलं होतं.

“वारंवार आपणच होळी पेटवितो, ह्यावर्षी त्यानं होळी पेटवली असती,

पण गावाचं काय? देशमुखानं ओरडावं नं गावानं राम्याचा विरोध करावं.....”

“आबा, राम्या प्रेमानं बोलून वागण्यापेक्षा रागातच लय असते जी.”

शिवाच्या तोंडून अचानक शब्द बाहेर आले.

“असतं रे कुणाचा स्वभाव, थोडसं अनुभव आलं की आपोआप बदलतो व्हय. ”

बनी, पाटलीनबाई, रंग्या, शिवा आबासोबत गप्पात रंगले होते. आबाला दुःख झालं. राम्याला होळी पेटवू दिली असती, त्यानं अगोदर कळवलं असतं तर... त्याला बोलावून होळी पेटवण्याचा मानही दिला असता. अशाच विचारात आबा गाड झोपी गेले.

पौर्णिमेच्या चंद्रानं आबादीत पांढरा-पांढरा प्रकाश पडला होता. आबादीचे मंद दिवेही रात्रोच्या काळोखात विझले होते. समधी आबादी गाढ झोपली होती.

खामदव्यासमोर होळी धगधग पेटत होती. होळीचं धूर आकाशाकडं वर वर जात होता. धगधगत्या ज्वाला उदव्याच्या उषःकालाची वाट पाहात होत्या. आबादीत उदव्याही सगळीकडे आनंद रंगानं उधळला जाणार होता. आज नव्या कपड्याचा साज चढलेली आबादी उदव्या जुनाट फाटक्या कपडयात एकमेकावर रंगाची उधळण करणार होती. खामदव्यासमोर वट्ट्यावर आबादीचे मुलंबाळं, बायामाणसं, नाच गाणं करणार. हसत-हसत आबादी अशीच पुढही जगत होती.

०००



# १४

आबादी अंधुकशा प्रकाशात कोंबड्याच्या आरवण्यानं जागी झाली. होळीवर आबादीच्या स्त्रियांनी पाणी तापवण्यास भांडं ठेवलं होतं. होळीच्या गरम पाण्यानं अंग धुण्याची प्रथा आबादीत पूर्वीपासून चालत होती. सूर्याची किरणं आबादीवर पडली. आबादी खूप वेगळीच भासत होती. कावळ्या चिमण्यांच्या आवाजाप्रमाणं आबादीत उत्साह संचारला होता. लहान मुलबाळं एकमेकाच्या अंगावर सकाळपासून रंग उधळू लागले. आबादीच्या स्त्रिया आपआपली काम आटोपत होती. सकाळीच 'गायी सोडा' हंबरडा फोडीत गुराखी रानात गायी हाकलून आला होता.

आबा पहाटेलाच उठला. नव्या जोमानं, नव्या उत्साहानं आबा आबादीशी रंगपंचमीचं रंग उधळणार होता. सकाळीच गावातील लोक आबास रंग लावण्यास आले होते. आबाचे कपडे रंगानं भरून गेले. आबानंही त्यांच्यावरती रंग टाकला. गावकऱ्यासोबत आबा खामदद्याकडे निघाले. आबा खामदद्याजवळ जाताच होळी पेटवण्याचं राम्याचं स्वप्न आठवलं. राम्याची पाटील होण्याची जिद्द आबाला सारं काही आठवत होतं. आबानं राम्याच्या घराकडे जावून भेट घ्यायचं ठरवलं. पण समधी आबादी खामदद्यासमोर रंग खेळत असतांना आबा भान हरपून गेला होता. लहान मुलंबाळं

खुशीनं नाचत रंग उधळीत होती. सुरेखा, रवीही रंगानं माखले होते. आबादीतील जीर्ण वस्त्र पळसाच्या फुलागत खुलून दिसत होते.

आबादीच्या स्त्रिया पाटलीनबाईस बोलावण्यास आल्यात. पाटलीनबाई सगळं उरकून शिवाच्या बायकोसोबत खामदयाकडे निघाली. बनी कधीही रंग खेळीत नव्हती. विधवा स्त्रियानं रंग खेळणं पाप समजलं जायचं. बनी उरलेसुरले घरकाम करण्यात गुंग राहिली. वाड्यात तिला कसंतरी एकाकी वाटत होतं. एकटीच हिरमुसल्यागत कामात गुंग झाली होती. स्वतःच्या जीवनातील घडलेल्या गोष्टी आठवीत.

राम्याला झोपून उठावयास उशीर झाला होता. मैनाने त्याला रात्रीच्या प्रसंगामुळं त्याला उठवलच नाही. शेजारच्या स्त्रियानीही मैनेवर रंगाचा रंगीबेरंगी शालू परिधान केला होता. महाग्याही आबासोबत रंगानं माखला. राम्याची आई घरकामात गुंग राहिली. रंग उधळण आता तिच्याच्यानं जमणार नव्हतं. जीवनभर काबाडकष्ट करून सारं शरीर थकलं होतं. राम्या उठला. राम्या पुर्णपणे शुद्धीवर आला होता. डोळ्यावर मार बसल्यानं थोडसं जडपणा वाटत होता. डोकं भणभण करायला लागलं. राम्याला रात्रीचा प्रसंग आठवला. आबा.... आबाशी दिलेली झुंज..... देशमुखाचं ओरडणं.... गावकऱ्यांची ऐकी... पूजेचं गरगर फिरणारं ताट.... रंग्याची काठी... सारं काही मनात आठवत होतं. राम्यानं आरशात स्वतःला बघितलं. डोळ्यात कसलीशी उदास भावना होती. स्वतःकडं पाहातच आबाचा चेहरा आठवू लागला. जुनाट आठवणी मनात नदीच्या पुरातील फेसाळ पाण्यागत येत होत्या.

“बयरे, हे कुण्या रानटी माणसाचं गं?”

सारं काही बयरीमुळं घडलं होतं. आबानं खामदयात दिलेलं वळ वट्टयावरची सभा ..... गावातून हाकलनं... हातभट्टी....झुंज धाबा.. वाडा .....गावचं पाटील...

राम्याचे टपोरे डोळे फुगल्यागत दिसू लागले. आबाच्या कृत्यामुळं डोळे लालबुंद होऊ लागले. राम्याने आईकडे पाहिलं. तव्यावर भाकरी भाजत होती. मैना कुठंही दिसली नाही.

“आई, मैना कुठं गेली?”

“बाहेर असल रं, रंग खेळत!”

राम्याला रंगाची आठवण झाली. आज रंगपंचमी होती. राम्यानं पायात जोडे घातले. डोळ्यावर चष्मा लावला. आईकडे एक नजर फिरवली. आईनं सरोत्याने तव्यावरील भाकरी पलटवली. अधामधात जास्त विस्तवामुळं भाकर करपली होती. आईनं विस्तव कमी केलं. राम्या घरातून झपाझप पावलं टाकत बाहेर निघाला.

राम्याचं मैनेकडं लक्ष गेलं. शेजारच्या स्त्रियानीं तिला भरवून टाकलं होतं. रंगानं माखलेलं तिचं गोरंगोमटं रूप, चेहऱ्यावरील हास्य फार खुलून दिसत होते. मैनेचं त्याकडे लक्ष नव्हतं. मैना खूप वेगळी भासत होती. तिच्या मुखड्यावर खुलणारं हसू, गुलालानं माखलेलं रूप, जणू तिचा शृंगार ज्वानीच्या ज्वाला भडकावीत होता. जणू सारं काही क्षणातच घायाळ व्हावं असच वाटत होतं. तिच्या ओल्याचिंब अंगावर जुनाट वस्त्र खुलून दिसत होते. वक्षस्थळ फार उमटून दिसायला लागले.जणू पुरूषोत्वाला वेड लागावं, इतर स्त्रियांचे कर रंगात भरून मैनेच्या मुखड्याचा घात तर करत नव्हती ना! मैनेच्या धुंदपणामुळं तिचे हवेच्या झोकात कुरळे केस डौलात डुलत होते. फार वेगळी दिसत होती ती. राम्यानं तिला अपार सुख दिलं होतं. यापूर्वी तिला कधीही एवढं सुख मिळालं नव्हतं. जिथंतिथं तिला देहाचा बाजार मांडून स्वतःची खळगी भरण्यासाठी स्वतःलाच विकावं लागलं होतं. मैनेला जणू स्वतःच्या सौंदर्याची जाणीव न ठेवता, देहाशी झुंजावं लागलं होतं. तरीपण सारं काही विसरून ती रंगपंचमीचा आनंदा, उत्साहात लोळण घेत होती. राम्या तसाच पुढे गेला. मनात रागीट भाव......

“ह्या आबादीचं पाटील व्हायचं हाय मला.”

सगळा बेत फसला होता. वाड्याचं थोडंफार कामही बाकी राहिलं होतं. बयरीमुळं आपलं वाईट झालं. चेहऱ्यावर रागीट भाव उमटले. आबाच्या रंग्यानं वार करावं, राम्याला पटणार नव्हतं.

"आता एकएकाचं मुडदं पाडल्याशिवाय घरी परतायचं नाय."

अशीच कल्पना साकारत पुढे-पुढे जात राहिला. समधी आबादी खामदयासमोर रंग उधळत होती. मनात असंख्य विचार आले. बनी कुठं असावी? राम्या आबाच्या वाड्याकडं वळला. वरांड्याच्या बाजूला गुरं बांधली होती. जुनाट आठवणीनं मनात काहुर मांडलं होतं. राम्या सरळ वाड्यात घुसला. बनी साफसफाई करत होती. राम्यानं बनीकडे पाहिलं. राम्याच्या मनात द्वेषाचा भडका उडाला. राम्या किंचितसा हसला. बनीचं लक्ष समोर गेलं. कुणीतरी आल्याचा भास झाला होता. मान वरती करून तिनं बघितलं, राम्या होता तो. बनीचं अंग शहारलं. हातातली झाडू खाली पडली. बनीच्या हृदयाचे ठोके वाढले होते. राम्या बनीला एकटी पाहून घरात शिरला होता. राम्या एक एक पावलं पुढं टाकत होता. बनी एक एक पावलं मागे टाकत होती. राम्या बनीकडं पाहून हसू लागला. बनीला घाम फुटला होता. अंग थरथरायला लागलं होतं.

"रा...म्या...रा...म्या...थां..ब... रा.....म्या......!"

बनी घाबरत-घाबरत मागे सरकत होती. राम्याच्या शरीरातील सैतान जागा झाला होता. त्याला कशाचेही भान उरले नव्हते. राम्याचा मर्दाणीपणा पेटून उठला होता. स्वतःवर झालेल्या अन्यायाचा डाग पुसून काढणार होता. राम्या जोरजोरात हसू लागला.

"बयरे, तुह्यामुळं माह्या पाटीवर वळ उमटले. तुह्यामुळं मला रंग्याचा मार खावा लागला. बयरे आता सोडणार नाय तुला."

राम्याच्या डोळ्यात राक्षसाचं राज्य दिसू लागलं. बनीचं सारं अंग घामानं ओलंचिंब झालं होतं. बनीला राम्याची रानटी वासना भडकलेली दिसली. मन्याढोकाप्रमाणं.... बनीला पूर्वीचं सारं काही आठवलं होतं. बनी मागे-मागे सरकत होती. चवताळल्या कुत्र्याप्रमाणं राम्या समोर येत होता. बनी थबकली, मागे सरकायला जागाच उरली नाही. बनीचं अंग शहारलं, राम्यानं बनीला घट्ट मिठीत पकडलं. बनीच्या डोळ्यासमोर अंधार पसरला. जणू राम्या खूपच दिवसांनी स्त्री सुखाचा आस्वाद घेणार

होता. राम्यानं क्षणभर पापण्या मिटवल्या. जणू खूप वेळचा बनीच्या कुशित विसावला होता. राम्यानं आनंदाचा श्वास सोडला होता. बनी तडफडत होती.

"राम्या, सोड रं कुऱ्या...."

बनी जोरात ओरडली होती. राम्यानं लोखंडाप्रमाणं कणखर हातानी घट्ट पकडलं होतं. बनी वाघाच्या हातात मेंढरानं सापडावं तशीच तडफडत होती. राम्या खूप हसत होता.

"आबादिचं पाटील व्हायचं हाय, बने तुह्यामुळं माह्यं स्वप्न अधुरं राहिलं. बने तुला सोडणार नाय...."

राम्यानं बनीला खाली पाडलं. बनी उठण्याचा प्रयत्न करू लागली. राम्या तिच्यावर मन्याढोकाप्रमाणं निजला होता. बनी सापाप्रमाणं सरपटत आजूबाजूला होत होती. बनीचं पदर फाटलं. बनीच्या गोऱ्या गालावर राम्याचा हात गेला. मैनेप्रमाणं नाजूक गालाला राम्यानं स्पर्श केला होता. राम्या आपले ओठ बनीच्या गालावर ठेवणार... बनीनं राम्याला लाथ मारली होती. राम्याच्या पोटावर जोरदार लाथ लागली होती. राम्याची पकड सैल झाली. राम्या बाजुला पडला. बनी कशी बशी सावरत उठली. राम्यानं तिचे पाय पकडले. बनी आणखी पोटाच्या भारावर पडली होती.

"सोड रं कुऱ्या...."

बनी खूप घाबरली होती. बनीचं लुगडं फाटलं, पदरही विस्कटलं. राम्या परत हसायला लागला. बनीनं जोर लावला. थोडीशी सावरत आणखी लाथ मारली. राम्या हलला सुद्धा नव्हता. बनीनं राम्याला कुऱ्यागत चावलं. राम्या बनीच्या चावण्यानं ओरडला. बनी उठली. राम्या तिच्याकडे पाहातच राहिला. बनी दारावर जावून आपटली. राम्यानं घट्ट पकडलं. राम्याची रानटी वासना आणखी भडकत होती. एक रानटी गुरं राखणारा 'गायी सोडा' हंबरडा फोडणारा एका गरीब गायीवर तुटून पडला होता. बनीचे अश्रू वाहात होते. बनी खूपच भयभीत झाली होती. बनीचं लक्ष बाजुला पडलेल्या

कोयत्याकडे गेले. बनीनं मान फिरवली. राम्या तिच्यावर निजला होता. बनीनं कोयत्याने वार केला.

राम्याच्या पाटिमागून पोटाकडच्या भागावर वार झाला होता. बनी उठून उभी झाली होती. लाल रक्ताचे शिंतोडे उडाले होते. बनीनं रंगपंचमीचं रंग राम्यावर उधळलं होतं. बनी थबकली... संपूर्ण घाबरट घाम फुटलेला चेहरा.. हृदयाची धकधक वाढली होती राम्या दोन्ही हात पोटावर ठेवून कण्हत होता. बनीला काहीही सुचलं नाही. सारखा समोर राम्याचा क्रूर चेहरा दिसत होता. राम्या संपूर्ण ताकत लावून उठला. बनीच्या अंगावर धावला. बनी एकसारखी त्याकडे बघतांना घाबरली. बनीनं कोयता तिथचं फेकला. बनीनं राम्याकडे पाहिलं. राम्या पुढं पुढं येत होता. बनीने दाराकडे पाहिले. दार खुलं होतं. बनी घाबरत वेगात दारातून धावत गेली. मागे क्षणभरही वळून न पाहता तशीच धावत राहिली.

राम्या तिथचं तडफडत होता. बनीच्या अंगावरही रक्ताचे शिंतोडे उडाले होते. डोळ्यातून अश्रू वाहात होते. बनी खामदयाकडे धावली. समधी आबादी रंग उधळीत होती. खामदयाजवळ धावत जाताच सर्वांचं लक्ष बनीकडे गेलं. आबानं बनीला पाहिलं. आबाला काहिही सुचेना. आबा बनीकडे धावत आला. बनीने आबाला मिठी मारली होती. तिच्या तोंडातून एकही शब्द निघत नव्हता. बनी 'राम्या' म्हणीत खाली कोसळली. रंग्या, शिवा, समधी आबादी बनीकडे एकसारखी पाहातच राहिली. पाटलीनबाईनं, आबादीच्या स्त्रियांनी बनीला सांभाळलं. क्षणाचाहीविलंब न करता आबा वाड्याकडे धावत सुटला. मागे रंग्या, शिवा धावतच आले.

राम्या कण्हत हिंमतीनं चालत वऱ्हाड्यांत आला होता. राम्याचे कपडे रक्तानं भरले होते. राम्या पायरीवर कोसळला. आबानं त्याला उचललं. पोटाकडच्या भागावर कोयत्यानं वार केलं होतं. आबादीचं लोक राम्याची रानटी भावना पाहून थक्क झाले होते. आबानं राम्याला मांडीवर धरलं होतं.

"राम्या, असं वेड्यासारखं वागून काय भेटलं रं तुला?"

“आबा…आबा हया रा..म्या…स क्षमा करा …व्हय.”

आबाच्या डोळ्यात पाणी आलं. शिवानं राम्यास पाणी प्यायला दिलं.

“रंग्या, वैद्याला बोलाव रं!” आबा ओरडले होते. आबाच्या बनीवर धावलेला वाघ आबाच्या हातात असा निस्तेज पडला होता. समधं गाव तमाशा बघितल्याप्रमाणं एकसारखं पाहात होते. राम्या आबाच्या मांडीवर डोक ठेवून बोलत होता.

“आ..बा.. माह्या… हातून..चूक… झाली…. व्हयं… तुमच्या.. सारख्या… देव.. माणसाशी… वैर… केलं..”

“राम्या बोलू नगस रं! तुला काहीही होणार नाय. ह्या आबादीचा आबा तुला काहीही होवू देणार नाय.”

वैद्य रंग्यासोबत धावतच आत आला होता. राम्याला तिथचं निजवलं होतं. राम्याचं खूप रक्त जात होतं. त्याचे रक्ताच्या शिंतोड्यांनी माखलेले कपडे काढण्यात आले होते. राम्या कण्हत होता.

“आ…ई…गं…! ”

राम्याच्या डोळयात अश्रू होते. वैद्यानं हिरवट पूड जखमेवर लावली. काळ्या पावडरचं पाणी करून पाजलं. खंड्यानं बनीला हातात धरून आणलं होतं. पाटलीनबाईही सोबत होती. राम्याची आई, मैना, महाग्या माहिती मिळताच धावत वाड्याकडे आले होते. वाघाप्रमाणं डरकाळी फोडणारा वाघ निस्तेज अर्धमेला पडून होता. राम्याची आई रडावयास लागली होती.

पाटलीनबाई बयरीला हातानं थोपटत होती. बयरी शुद्धीवर आली होती. थोड्यावेळापूर्वी भडकलेला वाघ आबाला क्षमा मागतोय… बनी राम्याकडे पाहातच राहिली. तिच्या मनात वेगवेगळे विचार येत होते. पुर्वीचं सारं जीवन आठवत होतं. थोड्यावेळापूर्वी राम्याशी झालेली झुंज बनीच्या डोळ्यासमोर तरंगत होती.

मैना राम्याजवळ गेली.

“काय केलं हे तुम्ही?” राम्यानं डोळे उघडले.

“मैना मला माफ कर.”

मैनेचे डोळे पाणावले, राम्या मैनेच्या डोळ्यात अर्धवट स्वप्न पाहू लागला. वैद्यानं सुटकेचा श्वास सोडला. राम्याचं रक्त बांधलं होतं. जखमेवर लेप लावला. राम्या शुद्धीवर आला. राम्यानं मैनेला मिठी मारली होती. राम्याचं टपोरं लाल बुंद डोळे पाणावले होते. राम्याने आबाकडे पाहिलं होतं. संपूर्ण ताकदनिशी जोर लावून दोन्ही हात एकमेकास जोडून नमस्कार केला. राम्याच्या मूकभावना आबा समजला होता. मैना बाजुला झाली होती.

“आ..बा..आबा...”

‘राम्या.’

आबाचं मन गहिवरलं. राम्याचं डोळं पाहून ढसाढसा रडणारी बनी, आबासारखी ढेकलाप्रमाणं विरघळली होती.

“बने, ह्या राम्यास माफ करशिल व्हय.”

राम्यानं बनीला क्षमा मागीतली होती. बनी राम्याकडं एकसारखी पाहातच राहिली.

“बने ह्या राम्यास.......”

राम्यानं बनीकडे हात केला. आबानी बनीकडे पाहिलं. बनी राम्याजवळ गेली. बनीनं मैनेककडे पाहिलं. मैनेच्या डोळ्यातून अश्रूचे थेंब टपकत होते. बनीनं राम्याचं हात पकडलं.

“बने, माह्या कुंकवास क्षमा कर.....”

मैनेनं बनीला हळुच म्हटलं होतं. बनी राम्याच्या डोळ्याकडे पाहत राहिली. तिला स्वतःच्या जीवनाची झुंज आठवली. महाग्याही आपल्या मुलाकडे पाहातच राहिला. आबाने बनीच्या पाठीवर हात ठेवलं. आबाच्या डोळ्यातून अश्रूचे थेंब बनीच्या हातावर पडले. राम्यानं आबाकडं नजर फिरवली. समधी आबादी आबाची किमया पाहात होती. कडू कारल्यास गोडपण आलं होतं. कधीही न उमलणारं उमरीचं फूल जणू बहरून आलं होतं.

०००

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.

"Language is the blood of the soul into which thoughts run and out of which they grow."

– Oliver Wendell Holmes

www. esahity. com वरून डाऊनलोड करा .

esahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा .

करून या नंबरला तुमचे किंवा7710980841हा नंबर सेव्ह नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा .

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहेते .download करा .

हे सर्व मोफ़त आहे.